# डॉ. नितीन मोरे

# व्यक्ती आणि कथा

ठेंग्यादादा..
पेद्रू..
अँड्र्यू..इ.



# व्यक्ती आणि कथा

## ठेंग्यादादा.. पेद्रू.. अँड्र्यू इ.

डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

# व्यक्ती आणि कथा

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

### दाम नाही मागत. मागत आहे दाद.
### साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# व्यक्ती आणि कथा

लेखक :डॉ. नितीन मोरे

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखककाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : १२ डिसेंबर २०१९

©esahity Pratishthan®2019

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

## डॉ. नितीन मोरे यांची ईसाहित्यसंपदा:

1. चक्रमादित्याचा दरबार १(नाटक)
2. चक्रमादित्याचा दरबार २(नाटक)
3. केल्याने शीर्षासन,
4. नाच जमूरे नाच,
5. अहम ब्रह्मास्मि,
6. मच्छर टाईम्स,
7. संवादोनी प्रकटावे
8. या कोल्हटकरांच्या घरात (नाटक )
9. प्रेमातुराणां (नाटक)
10. सांगतो ऐका (एकपात्री)
11. प्रिय पत्रास
12. शिभ्रष्टाचार!
13. आधुनिक कहाण्या
14. अवलोकन..अनुभव..मनोव्यापार
15. राग दरबारी (एकांकिका )
16. वाळूतल्या रेघा
17. संधी साधू (नाटक )
18. न.बा.च्या (प्रेम) कविता
19. व्यक्ती आणि कथा - ठेंग्यादादा.. पेद्रू.. अँड्र्यू इ.

ही सर्व पुस्तके ई साहित्यच्या वेबसाइटवर

विनामूल्य उपलब्ध आहेत.

# डॉ. नितीन मोरे यांच्या पुस्तकांच्या लिंक्स

नाटके

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/ragdarabari_nitinmore.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/aam_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/sangato_aika_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/chakramadityacha_darbar__nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/chakramaditya_2_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/prematuranam_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/ya_kolhatakaranchya_gharat_nitin_more.pdf

विनोदी साहित्य

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/adhunik_kahanya_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/valutil_regha_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/bhrashtachar_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/machchhar_times_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/nach_jamure_nach_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/aham_brahmasmi_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/kelyane_shirshasan_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/samvadoni_prakatave_nitin_more.pdf

इतर


http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/letters_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/na_ba_kavita_nitin_more.pdf


डॉ. नितीन मोरे


राग दरबारी
डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
अहम् ब्रह्मास्मि


डॉ. नितीन मोरे
नाच जमूरे नाच



डॉ. नितीन मोरे
वाळूतील रेषा


डॉ. नितीन मोरे
न.वा.च्या (प्रेम) कविता


डॉ. नितीन मोरे
संधी साधू



डॉ. नितीन मोरे
आधुनिक कहाण्या



डॉ. नितीन मोरे
केल्याने


डॉ. नितीन मोरे
चक्रमादित्याचा दरबार



डॉ. नितीन मोरे
प्रिय पत्रास,



डॉ. नितीन मोरे
HOSTEL-I
प्रेमातुराणां



डॉ. नितीन मोरे
अ..अ..म..
अवलोकन.अनुभव.मनोव्यापार



डॉ. नितीन मोरे
मच्छर टाईम्स


डॉ. नितीन मोरे
या
कोल्हटकरांच्या
घरात


डॉ. नितीन मोरे
चक्रमादित्याचा दरबार
२


डॉ. नितीन मोरे
संवादोनी
प्रकटावे


डॉ. नितीन मोरे
एकपात्री नाट्यछटा
सांगतो
ऐका


डॉ. नितीन मोरे
भ्र
शिष्टाचार

# अर्पणपत्रिका

ज्यांचे त्यांना

सादर अर्पण

**डॉ. नितीन मोरे**



डॉ. नितीन मोरे हे व्यवसायाने डॉक्टर असून वसई येथे छातीरोग तज्ज्ञ म्हणून प्रसिद्ध आहेत.

त्यांना मराठी व इतर भाषा विषयांची आवड असल्याने आणि त्यातूनच लिखाणाची आवड निर्माण झाली.

सामान्यत: आजूबाजूच्या दैनंदिन घटनांतील विसंगती व त्यातून निर्माण होणारा विनोद हा त्यांचा आवडता विषय आणि त्यातून उपरोधात्मक लिखाण आणि मर्मभेदी टिप्पणी करण्यात ते माहीर आहेत. यावेळचे हे पुस्तक “व्यक्ती आणि कथा” मात्र जरासे वेगळे आहे. आहे खुसखुशीत. पण त्याला गांभिर्याची खोली आहे. या कथांतूनही डॉक्टरांच्या स्वभावाचे पैलू दिसतात.

नेहमी दिवाळी अंकातून डॉक्टरांच्या विनोदी कथा प्रकाशित होत असतात. ई साहित्यवर त्यांचे हे एकोणिसावे पुस्तक प्रकाशित होत आहे. त्यांचा स्वतःचा असा एक वाचकवर्ग आता निर्माण झाला असून तो त्यांच्या पुस्तकांची वाट पहात असतो.

**Mobile No. 98209 37490, 98696 73415.**

**Email -** drnmore@yahoo. com

**अनुक्रम**

१ अँड्रू

२ पिं पँ.. पिं प.. ते  पिं पँ पा

३ ठेंग्यादादा

४ फ्लेम!

५ पेद्रूची गोष्ट

६ सल्लूमिया

७ कलाकार!

८ शारंगबाई

९ सदा सर्वदा

१० लेखक राव

११ बय माझी

**चार(च) शब्द**

ह्या संग्रहातल्या लेखांना व्यक्तिचित्रे म्हणावे..

शब्दचित्रे म्हणावे की कथा म्हणावे की व्यक्तीकथा?

की एखाद्या व्यक्ती वर आधारित व्यक्तीलेख?

कुणास ठाऊक!

डॉ. नितीन मोरे

## अँड्डू!

अँड्डू आणि अँड्डू पिझ्झावाला म्हणजे आमच्या कॉलेज कट्ट्यावरचा सर्वात प्रसिद्ध खाऊवाला! खाऊवाला म्हणजे कोण्या लहान मुलांच्या शाळेतला वाटत असेलही पण हा आमच्या कॉलेजच्या आमच्यासारख्या मोठ्या पोरांत तसाच  प्रसिद्ध होता. अँड्डू खाऊवाला म्हणून!

लहानपणी आमच्या शाळेबाहेर चिक्की, चिंचा, बोरेवाली आजी बसे, ती एक खाऊवाली. तसाच हा! कुणास दोघांत साम्य ते काय असा प्रश्न पडला असेल पण त्यांच्यात साम्यच जास्त. चिंचावाली आजी बसायची शाळेबाहेर तसा हा अँड्डू पण बसायचा कॉलेजबाहेर. आजी आमची आवडती होती.. गप्पा मारायला चांगली.. फक्त काही घेतल्यानंतर पैसे 'आज रोख उद्या उधार' असेच चुकवावे लागत. अँड्डू पण तसाच. 'नो क्रेडिट याटॉल..' म्हणत नकद रोकड मोजून घेई. शाळेत डबा नेल्यामुळे आजीचे 'आज रोख'चे अर्थशास्त्र खपून जाई पण कॉलेजात कुणी डबा नेत नसायचे. आणि त्यात अँड्डू नि त्याचा वीस रूपयांचा पिझ्झा कित्येकांचा वीक पॉईंट होता. त्यात अँड्डूचा आडमुठेपणा पोरांच्या भुकेने आणि त्याच्या पिझ्झ्याच्या वासाने व्याकुळलेल्या पोटास खुपत असे. तेव्हा आडमुठेपणा वाटत असे पण आज विचार केला तर अँड्डूचे तसेही बरोबरच वाटते. बाहेर ऐंशी नव्वदाखाली न मिळणारा पिझ्झा तो वीस रूपयांत देई नि पोरांना तेही बुडवावेसे वाटत.

लहानपणी आजी आमचे संदेश वाहक होती. ती इमानेइतबारे एकाचे संदेश दुसऱ्यास देई. तसाच हा अँड्डू. जोवर त्याच्या पिझ्झ्याचे नकद पैसे चुकवले जात तोवर त्याला त्याचे काही वाटत नसे. मग तो आमचे संदेशवाहक म्हणून आनंदाने काम करी. आज मोबाईल आल्यावर या संदेशवहनाची मातब्बरी नाही कळणार कुणास कदाचित. पण त्या ना - मोबाईल जमान्यात तो आमचे महत्त्वाचे काम करत असे. अँड्डू या संदेशवहनात स्वतः चिखलातल्या कमळासारखा अलिप्त.

शाळेत नि कॉलेजमध्ये संदेशांत फरक तर असणारच. म्हणजे शाळेत असतानाचे निरोप म्हणजे.. कधी क्रिकेट मॅचचे फारतर कधी अभ्यासा वा कुठल्याशा शाळेतल्या प्रोजेक्टशी संबंधित वगैरे असत. कॉलेजमध्ये आलो तर त्यात बदल होणारच. पण त्यामुळे अँड्रूला काही फरक पडत नसे. कुणी.. उद्या लेक्चर सात वाजता असा संदेश द्यायला सांगा.. की नाटकाची तालीम रात्री आठ ऐवजी सातला आहे असा.. की मुग्धा मी तुजवर मुग्ध .. तुला पाहिले नि हे दिल जाहले दग्ध.. असा संदेश असो. तो सारख्याच निर्विकारपणे तो देई. अर्थात मला असे तेव्हा वाटे.

हा अँड्रू नावात दोन अँड्रू का लावत असावा? कदाचित त्याचा भाऊ असेल त्याचा पार्टनर म्हणून? कधी दिसला नव्हता त्याचा भाऊ कारण नेहमी अँड्रू एकटाच दिसायचा. अँड्रू पोरांशी थोड्याच गप्पा मारे.. पोरांच्या कित्येक बॅचेस त्याच्या पिझ्झ्याखालून गेलेल्या. कुणाच्या हाताखालून जावे तशा. दुपारी भूक लागली की पोरं गर्दी करत कट्ट्यावर नि ती करता करता अँड्रूला पिझ्झ्याची ऑर्डर सुटे. अँड्रू तापल्या तव्यावर पिझ्झा भाजत सुटे नि एकेक करून त्यावर चीज किसत बसे.

आज पिझ्झा किती प्रसिद्धी पावलाय, मोठमोठी दुकाने आलीत पिझ्झ्याची पण आमच्या कॉलेजच्या दिवसात तसा प्रसिद्ध नव्हता पिझ्झा. अजूनही नवलाईचाच पदार्थ होता. त्यातही आमच्या सोडून कुठल्याच कॉलेज कट्ट्यावर असा पिझ्झावाला नव्हता. त्यामुळे आमच्या अभिमानाचा विषय होता अँड्रू. आडदांड शरीरयष्टीवाला. काळसर वर्ण आणि त्यावर उठून दिसणारे पांढरे शुभ्र कपडे.. म्हणजे शर्ट आणि लुंगी. त्या लुंगीमुळे तो दाक्षिणात्य असावा असे वाटे. बोलताना तो इंग्रजीतच आंडूगुंडू हेल काढत बोले. अँड्रूचे एक होते. त्याच्याकडे सारे काही चकाचक आणि साफसूफच असायचे. तसा तो ही रोज साफसूफ शुभ्र पांढरे कपडेच घालायचा. त्यामुळे स्टॉल म्हणजे कळकट्ट प्रकार आणि घोंघावणाऱ्या माशा वगैरे त्याच्या बाबतीत नसे. त्यात तो पिझ्झा प्रसिद्ध व्हायला त्या स्वच्छतेबरोबरच त्याच्या हाताची चव कारण असावी. त्याचा

पिझ्झा चविष्ट होताच आणि बाकी कॉलेजांतही प्रसिद्ध होता. त्याच्या बाजूला हरी चहावाला कटिंग चहा विकत असे.. तोही तसा लोकप्रिय होता. पण त्यातही अँड्रू भाव खाऊन जाई. आमच्या कॉलेजच्या कँटिनपेक्षा अँड्रू खाऊवाला आणि त्याच्यासमोरचा कट्टा जास्त प्रिय होता पोरापोरींत.

आजूबाजूला गलका असला तरी अँड्रू स्वतः शांत असे. जास्त बोलत नसे तो. सामान्यतः असले कॉलेजबाहेरचे स्टॉलवाले पोरांशी मिळूनमिसळून असतात पण हा काहीसा फटकून असे. मितभाषी असल्यासारखा. त्याच्या स्टॉलवर सदा गर्दी, एक परीक्षेचा सिझन सोडला तर. दिवसाकाठी शंभर दोनशे पिझ्झे नक्कीच विकत असावा तो.

सकाळी आम्ही कॉलेजमध्ये शिरताना त्याचा स्टॉल बंद असे. अकरा वाजता त्याच्या स्टो ची धुगधुगी सुरू होई. मग बारा साडेबारापासून चुकला कॉलेजकुमार अँड्रूच्या स्टॉलवर सापडत असे. आणि अँड्रू आपला चीजचा कीस पाडत दिवसभर उभा राही.

कॉलेजच्या कित्येक जोड्या जमतानाचा किंवा तुटतानाचा ही एकमेव साक्षीदार अँड्रू होता. कोण कोणाबरोबर कधी कॉलेजबाहेर दिसले .. नि कोणाचे कशावरून फाटले.. त्याचबरोबर बाकी पोरांच्या इतर कहाण्याही त्याला ठाऊक असायच्या. कोण कोठे नोकरीस लागणार.. ते कोणास कोठून कॉल येणार.. सगळी बित्तंबातमी त्याला असायची. हे थोडे त्याच्या फटकून वागण्याशी विसंगत होते. पण मला ते योगायोगानेच कळले एक दिवस.

अर्थात त्याआधी त्याची नि माझी दोस्ती कशी झाली ते सांगितले पाहिजे. आम्ही काही अ-मुंबईकर जवळच्याच एका रूममध्ये भाड्याने राहायचो. मग सगळे सामसूम झाले की पाय

मोकळे करायला परत कट्ट्यावर यायचो. सकाळचा बिझी अँड्रू आता बऱ्यापैकी मोकळा असे नि कधीमधी चार शब्द बोले. त्यादिवशी मी एकटाच. आत्यंतिक कंटाळा आलेला. तो आत्यंतिक म्हणजे कसा येतो हे कुणाही आपल्या मूळ गावाहून दूर सुट्टीतही हॉस्टेलमध्येच सदैव राहणाऱ्यास सांगावयास नको. तर असा कंटाळून मी कॉलेजजवळ आलो तर अँड्रूच्या स्टॉलवर काही गडबड दिसली. अँड्रू गडबडीत स्टॉल तसाच सोडून निघू पाहात होता. बाजूला एक छोटा मुलगा रडत होता.. एका बाईच्या मांडीवर बसून. अँड्रू गडबडला होता. मला पाहून कुणी ओळखीचे भेटल्याचा आनंद झाला असावा त्याला.

"गुड यू केम.. क्यान यू सीटॉन द गल्ला फॉर्सम टाईम?"

मला काही कळले नाही. पोरगा रडत होता.. त्याला घेऊन ती आलेली बाई.. बहुधा याचीच बायको असावी ती..

मी असा पण रिकामाच होतो. 'हो' म्हणेपर्यंत अँड्रू त्या मुलाला कडेवर घेऊन दिसेनासा झाला. मी तात्पुरता पिझ्झावाला बनलो.. अँड्रू येण्याची वाट पाहात.

बाजूच्या हरी चहावाल्याकडून कळली याची कहाणी थोडीफार. ती त्याची बायको. गावाकडची. तिला ना हिंदी समजते ना मराठी. तिची ती तुळू भाषा कोणालाच न समजेल अशी. आज त्याच्या पोराच्या पोटात एकाएकी खूप दुखल्याने ती घेऊन आलेली पोराला इकडे. आणि तो पोर रडताना पाहून गोंधळलेला अँड्रू. माझ्यावर तो स्टॉल सोडून गेलेला. किती वेळ लागेल नि केव्हा येईल कसलाच पत्ता नाही. बाजूला गल्ल्यात मी पाहिले. तो उघडा सताड नि हा तसेच पैसे सोडून गेलेला. पोराच्या रडण्यापायी तो ते घ्यायलाही विसरला नि माझ्याकडे सोपवून गेलेला. आता माझी जबाबदारी वाढली. गल्ला सांभाळण्यात गल्लत करून कशी चालेल?

येणारा कुणी पिझ्झा मागावयास येई नि स्टॉल बंद ऐकून पुढे जाई.

एखादा तास झाला असावा. अँड्रू घामाघूम होत परत आला. पोराला घरी सोडून आला असावा. म्हणाला, "थ्यांक्यू.. माय अँड्रू फेल शिक.. हॅड टू गो क्विकली.."

मी म्हटले, "युवर अँड्रू?"

त्यावर तो हसला थोडा.

"यस्स यस्स.. माय सन अँड्रू.."

"मग तू कोण?"

"मायसेल्फ ऑल्सो अँड्रू.."

म्हणजे ते अलेक्झांडर १, २ , ३ सारखी नंबरिंग सिस्टीम आपल्याकडे पण आली की काय?

"वो क्या हय ना, अमारे इदर ऐसाच नाम रखते. बापकाहीच नाम फॉर सन. सिर्फ थोडा और रखते.."

"मीन्स?" मी गोंधळून विचारले.

"सी, माय सन्स नेम इज अँड्रू जॉन.. मायसेल्फ अँड्रू अँड्रू.. माय फादर अँड्रू रॉबर्ट.. हिज फादर अँड्रू हिल्टन.. ऑल आर अँड्रूस.."

"ते जाऊ देत.. हाऊ इज युवर सन.."

"वो के.. टुमॉरो विल टेक हिम ब्याक टू हॉस्पिटल. अंड थ्यांक्यू फॉर टेकिंग केअर ऑफ गल्ला.."

"अँड्रू.. तू पैसे असेच सोडून गेला.."

"सो.. यू वेर देअर.. आय नो टुम हॅंड भी नै लगायगा.."

"हाऊ डू यू नो?"

"विल टेल्यू लॅटर.."

तो माझ्याकडे पाहात म्हणाला नि परत आपल्या गल्ल्यावर बसला. मी कट्ट्यावर बसून होतो तोवर त्याने पिझ्झा बनवायला घेतला. गिऱ्हाईक कुणी नसताना. थोड्यावेळाने पिझ्झा माझ्यासमोर ठेवत म्हणाला, "हॅव इट.."

"बट अँड्रू.. पैसे नाहीत.. यू नो ऑलवेज कडकी.. आता संध्याकाळी पिझ्झा खाल्ला तर उद्या भुकेला राहिन.."

"इट्स ओके.. फ्री फॉर यू.. थ्यांक्यू फॉर टेकिंग केअर!"

तर अँड्रूने आपले रोखीचे तत्व मोडून मला पिझ्झा खाऊ घातला. मी रात्रीच्या जेवणातल्या वाचलेल्या पैशांचा हिशेब लावत तो खाऊ लागलो. अँड्रूला त्या मदतीबद्दल खरेच भरून आले असावे. पण गल्ल्याची गॅरंटी का वाटावी त्याला?

लवकरच त्याचे उत्तर मिळाले मला.

अँड्रू आता माझा मित्रच झाला होता. बाकीच्यांशी किमान बोलणारा तो माझ्याशी संध्याकाळी गप्पा मारत असे. त्याच्या गावाकडच्या नि घराकडच्या. कुठेतरी आंध्रप्रदेशातला तो. त्याची काळी कुळकुळीत बायको पण तिकडचीच. याचे शिक्षण बेतासबात पण कसा कुठूनतरी पोहोचला मुंबईत. आता पंधरा वर्षे झाली त्याला. कुठेतरी ही पिझ्झ्याची रेसिपी शिकला. त्यात आपली मॉडिफिकेशन्स करत राहिला. मुंबई सगळ्यांना जगवते तर हा कसा अपवाद राहिल? एकदा म्हणाला देखील मला, "धिस बॉम्बे इज ग्रेट.. इट टीचेस यू हाऊ टू डील विथ लाईफ.. जस्ट

डू हार्डवर्क.. अँड डोन्ट थ्रो मनी इन दारू की बॉटल.. माय फादर बिकेम बँकरप्ट विथ लिकर.. वुई लॉस्ट अवर फॉर्चुन.. यू नो लाइफ इज टफ.. व्हेरी टफ.."

मी म्हणालो ही त्याला, "खरेय तुझे. मुंबई जगवते पण आपल्याला ती अक्कल पाहिजे!"

"यू आर राईट. अँड इफ लाइफ इज टफ यू हॅव टू बी सुपर टफ.. लाइफ इज लाइक दॅट.."

मग त्याने आमच्याच कॉलेजच्या प्रोफेसरांची गोष्ट सांगितली.

"प्रोफेसर दवे.. यू नो द ग्रेट वन. ही जॉइंड व्हेन यंग.. हिज गर्लफ्रेंड.. शी हॅड सम प्रॉब्लेम.. शी डाईड.. धिस फेलो.. डाईड इन दारू बॉटल.."

"प्रोफेसर दवे? आय हॅव हर्ड ऑफ हिम.. कधी गेले ते?"

"गेले नाय.. जीवंत.. बट डीप इन लिकर.. वो क्या बोलते.. ये जीना कोई जीना है लल्लू? सो कन्सिडर हिम डेड.. सो धिस अल्कोहॉल हॅज रूईन्ड सो मेनी.. फ्रॉम रीच टू पुअर.."

"खरंय तुझं अँड्रू.."

"आय हॅव रिमेन्ड अवे फ्रॉम धिस.. टफ लाइफ बट माय फॅमिली इज हॅपी.."

अँड्रू त्याच्या ज्युनियर अँड्रूविषयी हळवा होता. कित्येकदा त्याच्या पोराविषयीची स्वप्ने सांगत बसे. ह्या कॉलेजच्या पोरांसारखे शिकून मोठा व्हावा नि मोठा प्रोफेसर व्हावा असे स्वप्न होते त्याचे.

एके दिवशी त्याला काय वाटले कुणास ठाऊक पण बोलता बोलता म्हणाला,

"टुमॉरो.. कम टुमॉरो.. आय टेल्यू समथिंग. आय नो नो वन नोज धिज.."

अँड्रू गप्पा मारण्याच्या मूडमध्ये होता दुसऱ्या दिवशी. मला बाजूला बसवून घेत बोलत होता. समोर कुणी गिऱ्हाईक आले की हात चालायचे त्याचे आणि माझ्याशी बोलताना तोंड.

"यू नो दॅट ब्राईट बॉय.. ही वॉज टॉपर.. अनिश.."

अनिश रॉय.. माझा एक वर्ष सीनियर. अत्यंत हुशार. मागच्या वर्षीच एका अपघातात गेला. कुणाच्या अध्यात ना मध्यात. अत्यंत कुशाग्र बुद्धिचा. त्याच्या अपघाताने पूर्ण कॉलेज हळहळलेले. अँड्रू त्याच्याबद्दल बोलतोय?

"यू नो.. अ डे अर्लियर.. सॉ हिम विथ दॅट गर्ल.. आय वोण्ट टेल्यू हर नेम.. बट यू नो हर.. शी फॉट विथ हिम.. हिअर.. आय वॉज वॉचिंग.. देन शी वेन्ट अवे.. नेक्स्ट डे अनिश डाइड.. इव्हन आय थॉट इट मस्ट बी ॲक्सिडेंट.. बट.. आफ्टर टू डेज.. धिस गर्ल वॉज विथ अनदर बॉय.. अँड धिस अँड्रू नोज टू रीड फेसेस.. शी मस्ट हॅव डिच्ड हिम.. धिस गर्ल डझंट इव्हन फील एनिथिंग? नेक्स्ट डे.. हात मे हात डालके गुम रही थी.. यू ऑल डोन्ट नो.. बट अनिश वॉज विथ धिस गर्ल फॉर टू इयर्स.. इदरहीच रोज शामको मिलता था दोनों.. आय कुडन्ट स्लीप फॉर टू डेज.. अनिश मस्ट हॅव डन सुसाईड.. शी लेफ्ट हिम फॉर दॅट मर्सिडीजवाला.. सच इज लाइफ.."

अनिशच्या प्रकरणाबद्दल कॉलेजमध्ये कुठलीच चर्चा नव्हती कधीही. अँड्रू काल्पनिक काही सांगतो म्हणावे तर असा गॉसिपिंगचा स्वभाव नाही त्याचा. हे सांगणे म्हणजे बहुधा तो मनावरचे ओझे उतरवत असावा.

अनिशच्या गोष्टीनंतर मध्ये मध्ये तो अशाच गोष्टी सांगे. कधी पोरांच्या तर कधी आमच्याच टीचर्सच्या. कॉलेजबाहेरच्या फूटपाथवरून तो जणू मूक साक्षीदार म्हणून पाहात होता सगळे. त्यात एकदा त्याने फेस रीडिंग बद्दलही सांगितले. म्हणाला, "यू नो.. आय कॅन रीड फेसेस.. आय नो हू इज ऑनेस्ट अँड हू'ज नॉट.."

"म्हणून तू माझ्यावर गल्ला सोडून गेला त्यादिवशी?"

"ओह.. नो.. दॅट डे व्हेन आय वेंट.. नो.. बट व्हेन आय केम बॅक.. यस.. आय नो यू वोन्ट इव्हन टच अ पेनी.. आय डिडन्ट इव्हन काऊंट.. माय फादर टॉट मी हाऊ टू रीड फेसेस.. बुक तो ज्यादा पडने सिखाया नै बट फेस रीडिंग सिखाया.."

पुढे अँड्रूशी नेहमीच गप्पा व्हायच्या. त्याच्यामुळे आमच्या रिकाम्या संध्याकाळी कुणाची सोबत व्हायची. तसा तो अजूनही रिझर्व्हडच होता पण माझ्याशी दोस्तीनंतर तो कितीतरी गप्पा मारायचा. लाइफ हा त्याचा आवडता शब्द होता. 'सच इज लाइफ' आणि 'डू धिस फॉर लाइफ..' अशी वेगवगळी वचनरूपी वाक्ये वापरायचा तो. मैत्री झाली तरी त्या दिवसानंतर मात्र त्याने फुकटात पिझ्झा परत नाही दिला. तो त्याचा उसूल असावा बहुधा. त्याला माझ्या अभ्यासाची ही काळजी. जास्त वेळ कट्ट्यावर गेला की म्हणायचा, "गो बाबू, गो अँड स्टडी.. नै तो हमारे जैसा बैठेगा फूटपाथपर.." परीक्षेआधी अँड्रूच परत  पिटाळायचा.. "गो अँड स्टडी वेल.. युवर फादर मस्ट बी हॅविंग लॉट्स ऑफ एक्स्पेटेशन्स फ्रॉम यू.."

मला मग झकत अभ्यासाला जावेच लागे.

मध्येच म्हणायचा, "सी इव्हन आय फील माय अँड्रू शुड वर्क हार्ड.. आय टोल्ड हिम दॅट डे.. बट ही इज टू यंग.. ही हॅज नॉट सीन लाइफ यट.."

अँड्रूने कॉलेजच्या पोरापोरींच्या कित्येक पिढ्या म्हणजे बॅचेस पाहिल्या. एकेक नमुने पाहिले. बहुधा तो गल्ल्यावर बसल्या बसल्या फेस रिडींगचा अभ्यास ही करत असावा. पुढे मागे त्या मुलामुलींशी कधी थेट संबंध आला तर पडताळून पाहात असावा. म्हणजे एकदा मला तो तसे म्हणालाच. झाले असे की एका आमच्या ज्युनियरच्या चेहऱ्यावरून त्याने त्याच्याबद्दल मला एकदा सांगितले, "सी धिस बॉय.. ही वुड शाईन वन डे.. ही लूक्स सो फोकस्ड अँड डिटरमिन्ड.."

तर पुढच्या दोन वर्षात तो खरेच टॉपर होता कॉलेजमध्ये. माझ्या एका मित्राबद्दल.. 'तो नाटकात नाव काढील नट म्हणून' असे त्याचे फेस रीडिंग वरचे भविष्यही अचूक होते. असा त्याचा स्वाध्याय चालत असायचा स्टॉलवर बसल्याबसल्या.

मला अँड्रूच्या इंग्लिशचे नेहमीच नवल वाटे. त्याच्या इंग्रजीत दाक्षिणात्य हेल काढून बोलला तरी व्याकरणात चुकत नसे तो आणि भाषा पण चांगली वापरत असे. मी एकदा म्हटले ही त्याला, "आमच्या कॉलेजच्या काही मुलांपेक्षाही तुझे इंग्लिश चांगले कसे?"

अँड्रू म्हणाला, "यू नो.. माय मदर वॉज अँन इंग्लिश स्कॉलर.. माय डॅड रूईन्ड एव्हरीथिंग ड्यू टू ड्रिंकिंग.. आय कुडन्ट स्टडी मच.. लाइफ वॉज व्हेरी कृएल.. जब बात पेट की.. मतलब सर्व्हायव्हल की हो ना तो सब चोडके वुई हॅव टू रन बिहाइंड फूड.. मदर डीड दॅट.. आय डीड दॅट.. आय वॉज अ ब्राईट स्टुडंट टील एट्थ.. आय वॉटेड टू बी अ बिग मॅन.. बट.. देन ऑल वेन्ट हे वायर.. लाइफ बीकेम व्हेरी डिफिकल्ट.. नाऊ आयॅम हिअर.. मेकिंग पिझ्झास.. बट यू नो.. आय सिलिक्टेड धिस प्लेस आऊटसाईड कॉलेज.. मेरा एड्युकेशनसे उतनाई संबंद रहेगा.. होप माय अँड्रू डझ गुड स्टडीज.. बट लाइफ इज लाईक धिस.."

पुढे कॉलेज शिक्षण झाले. मी दिवे लावले बऱ्यापैकी. त्या कॉलेजमधून मग पोस्ट ग्रॅज्युएशनला दुसरीकडे. मुंबईशी आणि अँड्रूशीही संबंध तुटला. कधी आलो मुंबईत तर मुद्दाम कॉलेजात जात असे. उभ्याउभ्या अँड्रू ही भेटत असे. त्याचा पिझ्झा खात खात जुने दिवस आठवत असे. पुढे मग तर मुंबईत येणेच कधी वर्ष दोनवर्षात होई. तेही कामामुळे. त्यात कॉलेजला जायला कुठे वेळ मिळतोय? त्यामुळे अँड्रूही तसा विस्मरणात गेला. नाही म्हणायला पिझ्झा शॉप पाहिले

की त्याची नि त्याच्या पिझ्झ्याची आठवण हटकून येई. पण ते तेवढ्यापुरते. पुन्हा आपले दैनंदिन काम आणि रामरगाड्यात मग्न.

अलिकडे मी कामानिमित्त बायको मुलासह आलेलो मुंबईत. मुलगा तीन एक वर्षांचा. त्याला कडेवर घेऊन निघालो कॉलेज पहायला. म्हटले पाहू तरी गेल्या काही वर्षात किती बदलले सारे. पोराला ही कॉलेजचे कौतुक. "तुज्या कॉलेजला टीचर मारायची तुला..?" "आणि तू अभ्यास करायचा की मस्ती?" असल्या त्याच्या इनोसंट प्रश्नांना उत्तर देत निघालो. कॉलेज तसेच होते. आतून नि बाहेरूनही. आता कुणी ओळखणारे नव्हते फक्त काही लायब्ररी स्टाफ नि कँटिनमधले काही सोडले तर. कॉलेजच्या आठवणी काढत फेरफटका मारून बाहेर आलो. 'अँड्रू आणि अँड्रू'ची पाटी तशीच होती. आणि त्या पिझ्झा स्टॉल मागे अँड्रू चीज किसत बसला होता. लांबून मला पाहात ओरडला, "वेलकम सार.. आफ्टर सो मेनी इयर्स.."

हे 'सार'पण मला वयामुळे चिकटले असावे. नाहीतर कॉलेजच्या दिवसात सुट्टीच्या दिवशी अर्धी चड्डी घालून फिरताना नि क्रिकेट खेळताना पाहिलेले मला त्या अँड्रूनी. पण चांगली गोष्ट म्हणजे अँड्रू विसरला नव्हता. त्याचा पिझ्झा पण तसाच.. त्याचे कपडेही तसेच पांढरेशुभ्र. फक्त त्याच्या विरळ झालेल्या केसांतही पांढरी झाक दिसत होती. माझ्या कडेवरच्या मुलाकडे पाहात म्हणाला, "वेलकम बॉय, युवर डॅडी वॉज व्हेरी नॉटी.. नाऊ ही मस्ट बी टेलिंग यू ऑल लाइज.. हाऊ ही स्टडीड.."

नशीब माझ्या पोराला इंग्रजीचा गंध नव्हता तेव्हा! आणि अँड्रू असा बोलतोय म्हणजे एकतर तो खूप खुश असला पाहिजे नाहीतर स्वभावच बदलला असला पाहिजे त्याचा.

"सो अँड्रू.. हाऊ आर यू..? कॉलेज इज सेम लाइक ओल्ड डेज.. अँड युवर पिझ्झा इज स्टिल पॉप्युलर अँड्रू.."

"यस सार.. पिझ्झा इज माय लाइफ अँड माय लाइफ इज मेड बाय धिस पिझ्झा.."

हे खरेच. त्याला या मुंबईत स्थिरावण्यास या पिझ्झ्यानेच दिला होता हात.

"हाऊ आर स्टुडंट्स.. दे स्टिल इट हिअर?"

"नो चेंज सार.. वुई हॅव सो मेनी न्यू पिझ्झास अराऊंड.. इव्हन इंटरनॅशनल वन्स.. बट स्टुडंट्स लाइक अँड्रू.."

"नॉट अँड्रू.. अँड्रू अँड अँड्रू.."

"राइट सार.."

"सो यू आर हॅपी अँड्रू?"

"व्हेरी.. आयॅम व्हेरी हॅपी सार.. इस्पेशियली टुडे सार"

"व्हॉट्स स्पेशल? व्हेअर इज अदर अँड्रू?"

"ओह! दॅट्स द न्यूज सार.."

तो म्हणायला नि आतून कुणी येण्यास एकच गाठ पडली.. आतून म्हणजे कॉलेजमधून. तो छोटा अँड्रूच असणार.. कारण तरूणपणीच्या अँड्रूची छाप दिसत होता तो..

"डॅड.."

त्याने हाक मारली.. म्हणजे माझा अंदाज खराच होता..

"मीट धिस सार अँड्रू.." मोठा अँड्रू छोट्यास म्हणाला.

"सार.. धिस इज व्हाय आयॅम हॅपी टुडे.. इट्स हिज फर्स्ट डे.."

"म्हणजे? जॉइनिंग कॉलेज?"

"यस्स.. बट नॉट अँज स्टुडन्ट.. ही इज अ  लेक्चरर.. फर्स्ट डे.. धिस कॉलेज.."

मला आठवले, अँड्रू आधी म्हणालेला ते.. त्याला आपल्या मुलाला प्रोफेसर झालेले पाहायचे होते. आणि छोट्या अँड्रूने ते स्वप्न साकार केलेले पाहात होता अँड्रू. आणि तेही आमच्याच कॉलेजमध्ये. अँड्रू म्हणाला ते खरेच होते.. त्याचे लाइफ.. म्हणजे आयुष्य या पिझ्झ्याच्या स्टॉलनीच घडवले होते जणू.

अँड्रू आणि अँड्रू.. दोघेही खुश दिसत होते. अँड्रूच्या हातचा पिझ्झा खाऊन निरोप घेतला त्याचा. त्याच्या चेहऱ्यावरचा आनंद किंवा खरेतर कृतार्थभाव बघण्यासारखा होता.

आम्ही निघालो. पोरगा कडेवर होता, म्हणाला, "बाबा तू गप्प का? बोल ना कायतरी"

मी काय बोलणार होतो? इकडे छोट्या अँड्रूने मोठ्या अँड्रूचे स्वप्न साकार केलेले.  अँड्रू त्यामुळे समाधानी. आणि मी? माझ्या बाबांना मला आयएएस ऑफिसर बनलेला पाहायचे होते. म्हणायचे, "आमच्या वेळी शिक्षण सोडून नोकरी करावी लागली घर चालवायला.. त्यामुळे ते एक आय ए एस चे राहून गेले बघ.. तू झालास ना तर ते एक स्वप्न पुरे होईल."

बाबांनी कित्येकदा सांगूनही मी त्या आयएएसच्या परीक्षेकडे ढुंकूनही पाहिले नाही. कारण दुसरे काही नाही.. एकच.. एवढ्या सगळया अभ्यासाचा कंटाळा.. आळशीपणा फक्त. त्यामुळे मी त्या आयएएस पासून दूरच राहिलो. बाबांचे स्वप्न तसेच अपुरे ठेवत. नसतो कदाचित पास झालो ती परीक्षा पण मी तर प्रयत्नही टाळलेले. त्याची सल म्हणा, खंत म्हणा.. मनातून अपराधी वाटत होते.. इकडे मुलगा म्हणतोय, "बाबा बोल ना.. गम्माडी गम्मत सांग ना नेमी सारखी."

मी काय गंमत सांगणार होतो त्याला?

आज अँड्रू अजूनही त्याच पिझ्झ्याच्या स्टॉलवर तेच चीज किसत आपल्या पोराला त्याच कॉलेजमध्ये प्रोफेसर म्हणून शिरताना पाहत असेल.. त्याचे डोळे आनंदाने लकाकत असतील. कुठल्याशा गावातून मुंबईत जगण्यासाठी आलेल्या अँड्रूच्या संघर्षाचे त्याला आता फळ मिळालेय.. आनंद आहे. आधी जगण्यासाठी मारामारी आणि आता त्याच्याच तपाला आलेले हे फळ! आणि मी.. बाबांची केलेली निराशा.. शेवटी त्याच्याच शब्दात सांगायचे तर लाइफ इज लाइक दॅट आणि काय!

## *पिंपँ.. पिंप.. ते पिंपँपा!*

एकेक जण कसा असतो नाही? माझा एक मित्र आहे. नाव सदाशिव अनंत दूधभाते. अशा नावाचे कुणी कसे असू शकेल? अगदी आपल्या कल्पनाशक्तीचा रबरबँड ताण ताण ताणला तरी दूधभाते कुलोत्पन्न सदाशिव एखाद्या वाघसिंहासारखा मांसाहारी किंवा शिकारी असल्याचे डोळयापुढे येऊ शकते का चित्र? हा दूधभात्यांचा सदाशिव चक्क पॅंथरशी नाते सांगेल असे वाटेल का कुणाला? त्या इंग्लंडस्थित विल्यमचे नावात काय आहे म्हणणे खरे आहे हे सिद्ध करण्यामागे जगभरातील अनेक असतात त्यातला हा ही एक. त्यात त्याचे हे पॅंथरपण.. आम्हा मित्रांनी दिलेले त्याला.

सदा माझा मित्र. म्हणजे आमच्या कंपूतला. कंपू म्हणजे आम्ही कॉलेजातले बॅकबेंचर्स. समदु;खी! बॅकबेंचरांची दु:खं काय काय आणि कसली असू शकतात ते बॅक बेंचर्सच जाणे! तो विषयच वेगळा. पण आमच्या त्या एलएलबी म्हणजे लॉर्डस् ऑफ द लास्ट बेंचेस मधला एक सदस्य होता तो सदाशिव. तसा तो होता निरूपद्रवी. पण त्याला पुण्याजवळील गावाकडून आल्याने की काय कोणास ठाऊक.. प्रत्येक विषयात आपली मते होती. ती तो मांडायचाही ठासून. आणि त्याला असे विविध विषयांवर बोलायला उकसवणे हा आमचा आवडीचा टाईमपास होता.

त्यातही राजकारण आणि राजकारणी हे त्याचे आवडीचे विषय. स्पेशलायझेशन म्हणा. त्यांच्याबद्दल याची स्वतःची मते असायचीच. आणि बहुतेक वेळेस ती आम्ही म्हणू त्याच्या विरूद्ध दिशेस असायची. निवडणूकीचा हंगाम हा तर त्याचा सुगीचा काळ. मग ती निवडणूक कॉलेजच्या कुठल्या जीएस, सीएस ची असो वा अगदी आंतरराष्ट्रीय.. म्हणजे अमेरिकेची वगैरे. ग्रामपंचायतीच्या निवडणुकीचीही ह्याला पंचायत असायची. म्हणजे हा आलेला पुण्यनगरी

जवळच्या गावातून. पण गावी निवडणूक असली की ह्याचे लक्ष तिकडे! आम्ही कॉलेजात असताना ओबामांचा बोलबोला होता. अमेरिकन निवडणूक जवळ आलेली आणि आमचा हा आंतरराष्ट्रीय राजकीय विश्लेषक आपली ज्ञान मौक्तिके उधळत होता. हा ओबामांच्या विरोधी आहे बघून आम्ही ओबामांना ग्रेट हीरो बनवून टाकलेले. आणि जणू काही आमच्या पाठिंब्यावरच ते जिंकणार अशी तावातावाने चर्चा सुरू होती कॉलेज कट्ट्यावर. सदाचा संयम सुटला असावा.. म्हणाला,

"तुम्ही लोकं उगाच डोक्यावर घेऊन नाचताय ओबामाला. तुमचा चांगलाच भ्रमनिरास होईल बघा.. उद्या तुम्हीच म्हणाल.. बराक ओबामा उडता भासे कल्प सुमांचि माळचि ते."

अमेरिकन निवडणुकीच्या लढतीत अशी ही कविता वापरली जाईल हे पाहून खुद्द बालकवींनी तोंडात बोटे घातली असती! पुढे ओबामा अमेरिकेचे अध्यक्ष झाले नि इकडे सदाला मतप्रदर्शनाला मोकळे रान मिळाले.

"उद्या जेव्हा केव्हा ओबामा भारतात येईल ना तेव्हा मी ओबामाला सांगणार आहे की बाबा, जॉर्ज नी इराकमध्ये जे काय केले ते काही बरोबर नाही म्हणून."

सदा आपले मत नेहमीच सडेतोडपणे मांडतो. आपल्या ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत त्याने बळीराम सखाराम साखरदांडे, नववी पास या उमेदवाराबद्दल असेच सडेतोड मतप्रदर्शन केलेले. तेच आता ओबामांच्याबद्दल! आमच्या पुऱ्या कंपूचा त्यामुळे सदा एक बकरा होता. किंवा खेळणे म्हणा. त्याला दिली चावी की काही वेळ मनोरंजनाची ग्यारंटी!

"मला वाटते की जॉर्ज वॉज राईट!" आमच्यापैकी एकाने चावी फिरवली.

सदाचा चेहरा लाल झाला. तो काही रागारागात बोलणार तितक्यात कुणी म्हटले,

"अरे पण ओबामांना पटेल काय तू म्हणतोस ते?"

"अर्थात.. अर्थातच. आपले मत मांडावयास घाबरत नाही मी."

"ते खरेच रे.. पण गड्या एक थोडा.. म्हणजे मायनर असा प्रॉब्लेम आहे.."

"प्रॉब्लेम? मी प्रॉब्लेमबिब्लेम नाही जाणत.."

"अरे काय आहे.. तू सांगशील ही.. जीव फाडून नि घसा तोडून.. नाही.. जीव तोडून आणि घसा फाडून.. पण

त्यांना मराठीत सांगितलंस तर समजेल काय? आणि हू विल भाषांतर युवर मराठी?"

सदा आणि त्याचे गावरान इंग्लिश हा एक वेगळा विषय होता. सदाला ही ते ठाऊक होतेच. सदा खरेतर हुशार. पण आपल्याकडे इंग्लिश येणे किंवा न येणे हा हुशारीचा निकष किंवा एखाद्याच्या हुशारीचे मोजमाप! गोरा साहेब मोठ्या अक्कल हुशारीने मागे सोडून गेला आहे ते. पण इंग्रजीच्या उल्लेखाने सदाची बोलती बंद होईल तर तो सदा कसला?

"हे पहा मूळ मुद्दा काय आहे.. ते बघा .. भाषेचा तो मुद्दा गौण आहे."

सदाचे हे एक पेटंट वाक्य. एखाद्या वाक्याचा शेवट पूर्णविरामाने व्हावा तसा त्याच्या संभाषणाचा शेवट करताना पूर्णविराम म्हणून तो हे वाक्य वापरत असावा. अर्थात तो निरूत्तर झाला की. आणि तो तसा व्हावा याचसाठी आमच्या गॅंगचा अट्टाहास चाले. आमच्या मनोरंजनासाठीच तो कॉलेजात येत असावा जणू. सदा राजकारणाबद्दल बोलताना सदैव ज्वलंत विचार मांडत असे.. म्हणजे त्याचेच ते तसे म्हणणे असायचे. आपल्या शब्दांना ज्वालाग्राही, स्फोटक. जहाल, तेजस्वी, ओजस्वी अशी विशेषणे तो स्वतःच वापरायचा.. स्वतःच्याच बोलण्याबद्दल. एखाद्या वृत्तपत्राच्या बातमीत असावे असे शब्द आणि त्याच्यावर ज्वलज्जहाल अग्रलेख लिहावा कुण्या संपादकाने असे त्यावर ह्याचे भाष्य! पण यावरच तो थांबेल.. तर ते नाही. त्याला आमचे प्रबोधन करून आम्हा सकळ जनांना राजकीय दृष्टीने शहाणे करून सोडायचे होते. त्याच्या मते तो आम्हाला हे राजकीय शिक्षण देत होता आणि तशी त्याची जबाबदारी होती! त्या दृष्टीने तो वेगवेगळ्या राजकीय घडामोडींवर आपल्या मताची पिंक टाकत राही जाता येता.

कुठल्या तरी निवडणुकीच्या वेळी सदा म्हणालेला आठवतेय,

"काय्ये.. विधानसभा आणि नगरपरिषद यांच्यात फरक असतो मुळात. म्हणजे मी तुम्हाला राजकीय ज्ञान देतो ते आणि ह्या तुंबड्याने कधी दिले तर ते.. यात जो फरक असेल ना तसा फरक असतो.." तुंबड्या म्हणजे आमच्या गॅंग मधला.. दिनेश देवघरे.. रिकामा न्हावी भिंतीला तुंबड्या लावी यावरून पडलेले नाव त्याचे.. त्याच्या रिकामटेकडेपणाचे वर्णन करणारे..

"तर विधानसभेबद्दल बोलायचे तर विधानसभा निवडणूक एका विस्तृत कॅनव्हासवर पाहावी लागेल. त्यावर चितारलेले चित्र आणि लहान मुले शाळेत चित्रकलेत काढतात ते चित्र यात किती फरक असेल ना तेवढा फरक सामान्य आणि माझ्या विश्लेषणात असतो. पण फिकर नॉट.. मैं हूं ना.. मी आहे तोवर तुमच्या राजकीय जाणीवा जागृत राहतील.."

"खरेच रे.. नाहीतर हा दमडी निद्रिस्तच राहिल.."

दमडी म्हणजे दत्ता महेश डिके!

"अरे हे सर्व राजकारण तुम्हाला समजून घ्यायला हवे. चिंता करू नका मी आहे तुम्हाला शिकवायला."

"पण तू काय काय शिकवशील रे? नाही तू शांतपणे शिकव.. आम्ही ते ऐकून घेतो.." दमडी

"सदा आणि शांतपणे?" तुंबड्याची  परतफेड करावी अशी मल्लिनाथी!

"हे खरेय रे.. मी शांत राहूच नाही शकत.. अरे मी म्हणजे अंगार आहे. नुसतं तोंड उघडलं ना तरी सर्व काही पेट घेईल.  ज्वाला.."

हाच तो प्रसंग.. आणि हीच ती वेळ ज्यामुळे सदा पॅंथर म्हणून ओळखला जाऊ लागला.. म्हणजे झाले असे की सदा स्वतःला अंगार म्हणवून घेऊ लागला आणि मध्याने.. म्हणजे हरीश निमकर.. ऊर्फ.. हनी.. म्हणजे मध.. म्हणून मध्या.. त्याने पाण्याची बाटली जसं सदानी तोंड

उघडलं तशी 'हा बघ आगीचा बंब' म्हणून त्याच्या तोंडात नेम धरून उपडी केली! 'आता विझेल ती आग' म्हणत! सदा चिडला. त्याच्या अंगावर धावून गेला. हाताचे दोन्ही पंजे बोचकारण्यासाठी त्याने उगारले.

"बाप रे.. सॉरी रे.." मध्या म्हणाला.

"सॉरी बिरी ठीक.. पण हा बोचकारायला आला पहा कसा.. पँथर आहे हा पँथर.." मी त्याचे बारसे करत म्हणालो.

मग हा सदाशिव दूधभाते पँथर म्हणून ओळखला जाऊ लागला! खरं तर पँथर म्हणजे नक्की कोणता प्राणी याबद्दल आमच्यात मतभेद होते. एकाचे मत होते पँथर म्हणजे चित्ता.. तर एक म्हणे बिबळ्या. काही असो, पँथर म्हणजे कोणीतरी हिंस्र प्राणी याबद्दल एकमत होते! आणि हा सदा त्या कुठल्याशा प्राण्यासारखा पंजे उगारत चिडला होता!

सदाची ही सवयच होती.. प्रत्येक बाबीत त्याला मत असलेच पाहिजे.. आणि ते त्याने सांगितलेच पाहिजे. ते ही मत कसे.. त्याच्या मते सडेतोड! मग मुद्दा कसलाही असो.

आमच्या कॉलेजच्या दिवसांत सचिन तेंडुलकर ऐन भरात होता. त्याने तिसावी सेंच्युरी केली.. मग पाठोपाठ एकतीस नि बत्तिसावी.. आमचा तो हीरो.. आणि त्यामुळे सदाला काही वेगळे बोलणे भागच होते. आमच्या मते तो ग्रेटच होता तर सदाला ते मंजूर नव्हते! म्हणाला, "इतकी वर्षे खेळून इतक्या तर होणारच! आणि टॅलेंट असते तर मी पण केल्या असत्या!"

"आणि त्याची मेहनत..?"

"मेहनत तर आहेच.. टॅलेंट आहे.. म्हणून.."

"मग तू आता नेक्स्ट तेंडुलकर?"

"तुम्ही काही म्हणा.. पण हा मुद्दा गौण आहे!"

या संवादास पूर्णविराम दिला त्याने असा! त्याची ही मल्लिनाथी अशीच चालायची. राजकारण म्हटले की भरधाव धावणारी त्याची गाडी एरव्हीही अशीच धावायची. म्हणजे ते राजकारण एक त्याचे चराऊ कुरण म्हटले तर बाकी विषयांचा चाराही तो चघळल्याशिवाय राहात नसे. आणि ती त्याची मतेही तो मुद्दा गौण होईतोवर मांडत असे तो. त्याच्या या जाता येता आपल्या मताची पिंक टाकण्याच्या सवयीमुळे एकदा पुन्हा त्याचे नामकरण झाले.. पिंक पॅंथर.. हा पॅंथर पिंक झाला तो तुंबड्याच्या सुपीक डोक्यातून आणि पुढे त्याचा शॉर्टफॉर्म म्हणून सदाचे बारसे झाले.. पिंपॅं! अर्थात त्याचाही पुढे अपभ्रंश झाला.. पिंप! थोडक्यात हा पिंप म्हणून ओळखला जाऊ लागला आमच्यात!

असा हा सदा ऊर्फ पिंपॅं..पिंप.. कधी कविताही करायचा. म्हणजे चार शब्द जमवून आणि जुळवून त्यांची कविता बनवून ऐकवायचा. कवी लोक कविता करतात.. हा 'बनवायचा' कविता! त्याचा एक मित्र होता.. सजणीदूत नावाने नाजूक साजूक कविता करणारा.. 'म्हणजे काय आहे की आपल्या ह्रदयातल्या उतू जाणाऱ्या अंतस्थ भावभावनांचे उत्कट कढ उलगडून दाखवण्यासाठी शब्दच ज्याची मदत घेतात.. अशा कविता करणारा.' हे त्या सजणीदुताच्या कवितेचे वर्णन पिंपानेचे एकदा केलेले. आणि त्याला मध्या म्हणालेला.. "पिंपा.. तू म्हणजे माठ आहेस!" पण असे माठ म्हणण्याचे प्रसंग अनेक आले तरी पिंपॅंची ओळख पिंप म्हणूनच राहिली!

तर त्या सजणीदुताचा कुठेतरी कवितासंग्रह प्रसिद्ध झाला. खूप होतात त्यातला हाही एक. पण त्याच्यावर एका कुठल्याशा पेपरात सडकून टीका छापून आली. मी ना सजणीदुताच्या कविता वाचण्याच्या फंदात पडलेलो ना ती टीका. पण त्या सजणीदुतावरची टीका या पिंपाच्या जिव्हारी लागली असावी. तो अस्वस्थ. मग एकाएकी म्हणाला, "कवितेच्या प्रसववेदना तुम्हा गद्य लोकांना काय ठाऊक.. तेथे पाहिजे जातीचेच! मला विचारा.. एकेक शब्द जुळवण्यास काय करावा लागतो जुगाड.. ठेवून मनावर दगड.. उभारतो आम्ही शब्दांचे मनोरे.. ते थोडे कलले म्हणून काय झाले.. त्यावर टीका करण्यास हे तयार.."

पिंपॅ कविता 'बनवून' पाठवायचा.. त्या नित्यनेमाने संपादकाकडून साभार परत यायच्या.. मग त्या दिवशी पिंपॅ मौन व्रताने दुखवटा पाळायचा.. पिंपॅ गप्प दिसला की कुणी डिवचायचे त्याला, "काय मग कविमोशाय, मुलीस नकार आलेला दिसतोय."

त्यावरही तो चिडायचा..

"आम्हा कवींची हालत तुम क्या जानो बाबू.. आम्ही मारे रात्र जागवून लिहावी कविता.. सारा अस्ताव्यस्त करून ठेवावा शब्दभांडाराचा पसारा.. आणि जावे जिवानिशी अन तुम्ही म्हणता.. वातड कशी? जुन्या जमान्यात सोय होती.. आळुमुळु.. परिमळु चालून जायचे अशा प्रकारचे शब्द.. आता नाही चालत.."

"अरे पिंपा, पण कुणी टीका केली.. सोडून द्यावी.. आम्ही कसे.."

"तुमच्यावर कोण टीका करतात लेकांनो.."

"टीका नव्हे.. रे.. आम्ही कसे सोडून देतो.. एका कानाने ऐकून दुसऱ्याने.. तू काहीही बोललास तरी.." हे असे फक्त तो दमडीच बोलू शकतो आमच्यापैकी. मला वाटले आता हा पिंपॅ चिडणार.. बिथरणार.. पण नाही. उलट ते बोलणेच एका कानाने ऐकून दुसऱ्याने सोडून देत म्हणाला,

"ते राहू देत.. सजणीदूत त्याच्या कवितारूपी सजणीचे काय ते घेईल पाहून.. फक्त हा कवितेचा मुद्दा.. तो तसा गौण नाही रे.."

कवितेवरच्या टीकेचा तीर त्याच्या जिव्हारी लागलेला दिसत होता..

मी म्हणालो ही त्याला, "तुझा मुख्य रस ज्यात आहे ना त्या राजकारणाचा मुख्य गुण आहे.. गेंड्याची कातडी कमावणे. आणि इतका संवेदनशील होऊन कसे चालेल तुला?"

"खरंय.. पण ही दोन्ही क्षेत्रे वेगळी नाहीत रे.. समाजात आमूलाग्र बदल घडवायचा तर दोन्ही महत्त्वाचे.. तर दोन्हीपैकी गौण कोणीही नाही.. आणि संवेदनशीलता तर माझ्या अणूरेणूंत भरूनही उरली आहे.. चार बोटे वर!"

आमचे शेवटचे वर्ष होते कॉलेजचे. टर्म संपत आलेली. आम्ही सारे एलएलबी निद्रितावस्थेतून जागृतावस्थेत आलेलो. वर्षभराच्या अभ्यासातल्या टंगळमंगळीवर कुठे उपाय मिळतो का ते पाहात. पिंपँ नि आमचे याबाबतीत मात्र जमायचे व्यवस्थित. काही करून उत्तीर्ण होणे एवढेच एक आयुष्याचे ध्येय असावे असे आम्ही सारे.. त्यात एके दिवशी पिंपँ गपचुप बसलेला. आमची वादावादी झाली तरी हा निद्रिस्त ज्वालामुखीसारखा शांतच! शेवटी न राहवून कुणी म्हणाले,

"काय.. किती मुलींना आलाय नकार.. सगळीकडून.. एकाचवेळी.. ?"

"नाही रे लग्न करत असणार.. रुख्माबाई.. गावाहून याच्या आईने ठरवून टाकले असणार.. कुण्या डोईवर पदर.. पदरात चेहरा.. असणारीशी.." तुंबड्या!

कुणी कुणी त्याची टांग खेचायचा प्रयत्न केला.. पण हा ज्वालामुखी ढिम्म..

मग एकाएकी म्हणाला, "माझे काही वाटत नाही रे.. मी कसाही निभावून जाईन.. मला तुमची चिंता."

"चिंता? खयची रे पिंपँ तुका.. माका सांग त.." तुंबड्या

"अरे.. आता कॉलेज संपत आले.. मी गावी जाऊन ग्रामपंचायतीची लढवेन निवडणूक.."

"छान.. मग चिंता कसली?" मध्या.

"काही नाही रे.. त्याला डिपॉझिट भरायला पैसे नसतील.." दमडी.

"छे रे.. पक्षांतर्गत विरोधक मागे लागले असतील.." मी.. जणू राजकारण कोळून प्यायलो अशा थाटात!

"वा! चांगलाच अनुभव तुला या राजकारणाचा गड्या.." तुंबड्या.

"नाही रे पैसे नसतील त्याच्याकडे.. निवडणूक म्हटली की पैसा लागतोच.." दमडी. पैसे म्हटले की दमडीचे मत आलेच.. नावच दमडी त्याचे.

"गप बसा रे.. अरे पैशाची चिंता आणि मला? ती कधीच नव्हती.."

"च्यायला.. म्हणजे आजचे बिल तूच भरशील?" दमडी अगेन!

"तसे असेल तर मीही खाईन चीज टोस्ट ऑमलेट.." मी. कित्येक दिवसांपासून खाण्याचे प्लॅन बनवत होतो.. मनात मांडे खावेत तसा चीज ऑमलेट खात होतो.. मनातल्या मनात!

"गप्प बसा सारे.. माझी चिंता कसली नि तुम्हाला सुचतेय ऑमलेट?"

"साधे नाही.. चीज.. टोस्ट.."

"तुम्ही सारे गपा रे.. पिंक पॅंथर इज बरीड.. लेट्स गेट हीज चिंताज् बरीड.." मध्या.

"बोल बालक.. वह क्या चिंता है जो तुम्हे खाए जा रही है.. क्या समस्याओंसे परेसान.. इस बाबा के पास है अक्सीर इलाज.. बोलो बालक." मी.

"तुझे कल्याण असो.. कर्जत नि कसारा ही असो." तुंबड्या.

"इकडे मी तुमचा करतोय विचार आणि तुम्ही करताय नुसताच वेळेचा अपव्यय."

"म्हणजे टाईमपास?"

"इकडे मी चिंता करतोय.. मी आज लढवतोय निवडणूक.. आज नगरसेवक.. उद्या आमदार.. झालंच तर मंत्री.. आणि मग तुमच्या शिक्षणाचे काय? मी बिझी होणार.. मग तुमचे राजकीय शिक्षण कोण करणार मी नसलो तर?"

"तुला सांगू पिंपा.. तो मुद्दा गौण आहे.. आम्ही हा संसार सागर तरून जाऊ..तू तेवढे ते चीज टोस्टाचे बघ.." मी म्हणालो.

पिंप यावर काय बोलणार? पण आमच्या 'राजकीय शिक्षणाची' त्याला लागलेली आस खरीच असावी!

पुढे आमचे कॉलेज सुटले. आम्ही चार दिशांना पांगलो. कामाला लागलो आपापल्या कुवतीनुसार. पिंप म्हणजे पिंक पॅंथर म्हणजे सदा गावी परतला आपल्या. आज काही वर्षांनंतर वाचतो त्याच्याबद्दल पेपरात. हा पठ्ठ्या खरेच पडला राजकारणात. त्याचे ग्रामपंचायतीत बस्तान बसले असावे. त्याच्याबद्दल चार चांगले शब्द वाचताना बरे वाटते.. असेही एखाद्या राजकारण्याबद्दल चांगले वाचायला मिळणे दुर्मिळ. त्यात हे असे काही वाचायला मिळावे.. त्याचा अभिमान वाटतो. हुशार होताच तो. त्याच्या गावात पाण्यासाठी त्याने योजना राबवल्या काय नि गाव साक्षरतेसाठी मेहनत घेतली काय.. काय काय लिहून येते. चांगले काम करतोय तिकडे बेटा. पिंपँ आमचा दोस्त असल्याचे भारी वाटते अशा वेळी. आणि त्यात आणखीन गंमतीची गोष्ट.. त्याने गावात स्वतःची पार्टी काढलीय म्हणे.. नाव तिचे.. पिंक पॅंथर्स पार्टी.. म्हणजे पिंपॅपा!

थोडक्यात आमच्या या सदाशिव दूधभातेचा हा प्रवास असा झाला म्हणायचा, पिंपँ पासून पिंप पर्यंत.. आणि त्यातून स्फूर्ती घेत पिंपॅपा पर्यंत! एकूण गंमतच आहे म्हणायची!

# *ठेंग्यादादा*

ठेंग्यादादा आणि मी यांची दोस्ती म्हणजे घोडा आणि गवत यांची मैत्री व्हावी इतकी आश्चर्याची गोष्ट होती. मी म्हणजे अल्लाघरून आलेले कोकरू किंवा गायीचे वासरू. अशा निष्पाप मनाच्या, भेंडीची किंवा अळूची भाजी खाणाऱ्या निरूपद्रवी. माझे या क्रूड ऑइलमध्ये जेवण बनवणाऱ्या ठेंग्यादादाशी सूत जुळावे ही 'ऐकावे ते नवलच' अशा सदरात घालावे अशीच बाब होती. बाब कसली.. बातमी म्हणा!

ठेंग्यादादाचे नाव अनंतराव छंदीफंदी आहे हे मला खूप उशीराने कळले. आणि छंदीफंदी ही त्याच्या यारदोस्तांनी त्याला दिलेली 'उपाधी' आहे हे कळायला तर अजूनही काही दिवस जावे लागले. अनंतराव अडसूळ असे भारदस्त नाव असणारा फारतर 'अनंद्दादा' एवढ्यावर थांबेल पण हा चक्क ठेंग्यादादा नावाने ओळखला जावा यामागे काही घटना असणार हे मला माझ्याच तर्काने कळले. ती घटना मात्र फार नंतर कळली मला.

तोवर मी देखील त्याला ठेंग्यादादा नावानेच भीत होतो.

आम्ही लहान असताना अपनी गली में कुत्ता भी शेर होता है असे आमच्या कानी येई. त्यामुळे गल्लीतल्या कुत्र्यासही आम्ही वाघासारखे भिऊन असू. त्यात मी वरून पान पडले तरी आभाळ पडले म्हणून धावत सुटणाऱ्या सशासारखा. त्यामुळे ठेंग्यादादापासून चार कसले.. चारशे हात लांब. अर्थात ठेंग्यादादा तसा वयाने फार मोठा होता असे नाही. माझ्याहून पाच सहा वर्षे मोठा. त्यात तो आमच्याच शाळेतला पण काही न काही कारण काढून सतत शिक्षा ओढवून

घेणारा. त्याच्यापासून दूर रहा ही त्यावेळी सर्वच आयांची त्यांच्या पोरांना ताकीद असे. अर्थात तेव्हा त्याचे ठेंग्यादादा म्हणून प्रमोशन झाले नव्हते. ते पुढे स्वमेहनतीवर करवून आणले त्याने.

तो रहायचा त्या किल्लावाडीत त्याची चांगलीच वट होती. जाणाऱ्यायेणाऱ्या लोकांना त्रास देणे त्याचा छंद असावा असे वागणे. गळयात रूमाल बांधून तो आणि त्याचे साथीदार बसलेले दिसत कुठल्यातरी झाडाखाली नाहीतर कट्ट्यावर. येताजाता शिट्ट्या फुंकत बसणे आणि दात काढत खिदळणे हा त्यांचा दिनक्रम. शाळेत असतानाही तो चुकायचा नाही. मुळात तो 'आऊटसस्टॉडिंग' म्हणजे शाळेत कमी आणि बाहेरच जास्त असायचा. 'आऊटसस्टाँडींग' शब्द त्याचा.. बहुधा कुठल्याश्या हिंदी सिनेमातून उचललेला. म्हणजे त्याच्या वर्गावरचे शिक्षक त्याला बहुधा त्याने काही करण्याआधीच वर्गाबाहेर काढीत. तो ही यास सरावलेला. आमच्या वर्गाच्या खिडकीतून तो त्याच्या वर्गातून बाहेर उभा राहिलेला दिसे. एकीकडे आम्ही, म्हणजे मी आणि काही मित्र शाळेतले स्कॉलर म्हणावेत असे. आणि तिकडे हा निव्वळ कुणास नापास करता येत नाही या शासन धोरणानुसार पोहोचलेला नववीत. तेव्हा मी तिसरी की चौथीत होतो. वयाने लहान असलो तरी त्याचे गुणगान तेव्हाही कानी पडेच. नववीत असतानाच त्याने शाळा सोडलेली. त्याचे शिक्षक एकदा त्याच्या घरी गेलेले त्याला बोलवायला तेव्हा त्याच्या हातातला सुरा पाहून पाठच्यापाठी निघून गेलेले. ही गोष्ट त्याच्या घराजवळ राहणाऱ्या माझ्या मित्रानेच सांगितलेली मला. तेव्हा त्याच्या हातातल्या स्वतःच्या डोळयांनी न पाहिलेल्या सुऱ्याचीही भीती वाटलेली. बाकी काही असो, त्या वयातच भाजी कापायची सुरी आणि सुरा यातला फरक ठेंग्यादादामुळेच कळला.

पुढे शाळा सोडून तो राजरोस मवालेगिरी करू लागला. शाळेतून गळणाऱ्या कोवळया पानगळीत याची भर. अर्थात त्याला पाहून कुणी 'कोवळा' शब्द नसता वापरला! तोवर तो चांगलाच थोराड झालेला. शर्टाच्या बाह्या दंडांवर दुमडून आणि शर्टाची बटने उघडी टाकत गळयात रुमाल बांधून फिरायचा तो. त्यात परत अस्ताव्यस्त वाढलेले किंवा वाढवलेले केस.

त्याचा कोवळेपणाशी दुरूनही संबंध कसला! पुढे आपल्या दादापणाच्या वाटचालीत त्याने कित्येक राडे केले. मारामाऱ्या आणि भांडणे म्हटले की ठेंग्या त्यात ॲक्टिव्ह नाहीतर पॅसिव्हली हवाच! म्हणजे त्या भांडणाची एकतर तो सुरूवात करून त्यात सक्रिय सहभागी असायचा नाहीतर दुसऱ्या कुणाच्या भांडणात स्वतःहून सहभागी व्हायचा. अशावेळी गर्दी जमते त्यातील कुणाचे पाकिट मारायची संधी त्याचे साथीदार त्या निमित्ताने साधून घेतात ही त्याची मोडस ऑपरेंडी मला खूप नंतर कळली.

मी कॉलेजला पोहोचेपर्यंतच्या मधल्या काही वर्षांत ठेंग्याने चांगलीच प्रगती केली होती. एखाद्याने जाणीवपूर्वक करियर घडवावी तशी गुन्हेगारी कारकीर्द घडवत असावा तो. त्यांच्या झोपडपट्टीत त्याचा चांगलाच चाले आवाज. राडेबाजीला कधीच न घाबरणारा किंवा खरेतर त्या जोरावरच आपली वट वाढवून घेणारा ठेंग्या अधेमधे नाहीसा होई. तो कधी पोलिसांकडून पकडला गेलाय नि  तुरूंगात गेलाय असे उडत उडत कानी येई. तेवढेच आमच्या सारखे पांढरपेशे सुटकेचा निश्वास टाकत. काही महिन्यांतच तो सुटून दुप्पट 'जोमाने' कामाला लागे.

ठेंग्याचे असे उपद्व्याप आणि उपद्रव यांची काही वर्षात परिसरात सवय झालेली. त्याची माणसे गणपतीत वर्गणी मागायला येत आणि कुणीही काही न बोलता निमूटपणे पैसे काढून त्यांना देत. त्यांच्या पाठीमागे ते शिव्याशाप देत पण त्याचे ठेंग्याच्या माणसांना कसले काय. ते सगळे नोटा जमवत गणपतीच्या तयारीस लागत. ठेंग्याची गणपतीवर भारी श्रद्धा. हे मला त्याच्याशी ओळख झाल्यावर कळले. म्हणजे इकडे आजूबाजूला दहशत पसरवायची आणि तिकडे देवाची मनोभावे पूजा करायची! एकूण कित्येक भक्तांसारखेच हे.. दुटप्पी वर्तन. फक्त सर्वसामान्य भक्त

या थरास जात नाही एवढेच. पण हे देवभक्त मुलभूत माणुसकीस गुंडाळत देवभक्ती मात्र करू शकतात!

ठेंग्यादादा असा दिसामासाने मोठा होत होता. म्हणजे माझ्याच डोळयांसमोर मी त्याला आधी सिनेमाची तिकिटे ब्लॅक करता करता पाकिटमारी आणि पुढे झोपडी दादा होताना पाहिलेले. त्यात त्याचे विशिष्ट राजकीय नेत्याशी संधान असल्याचे बोलले जाई. त्याच्या धंद्यांसाठी ही गोष्ट म्हणजे एखाद्या इन्शुरन्स पॉलिसीसारखीच! त्यामुळे त्याच्या 'कर्तृत्वाचा' आलेख उंचावला तर त्यात आश्चर्य नव्हतेच. मध्ये तो महापालिकेच्या निवडणुकीस उभा राहणार अशीही बातमी होती. मला त्याचीही उत्सुकता होती. काही काळ आणि तोंडदेखले का होईना, सामान्य जनतेपुढे नतमस्तक होताना त्याला पाहणे हे मनोरंजकच ठरले असते. पण पुढे काही बिनसले असावे. कारण ठेंग्या कधी निवडणुकीस उभा राहिलाच नाही.

माझे शिक्षण झाले. मुंबईतल्याच मेडिकल कॉलेजात मी डॉक्टर झालो. घराजवळच दवाखाना थाटून बसलो. आमच्या शाळेतले स्कॉलरलोक आम्ही.. म्हणजे मी आणि अन्य काही. त्यामुळे आम्ही असे मोठे होणार कुणी हे सगळयांनी अध्याहृतच धरलेले. माझा दवाखाना ठेंग्याच्या झोपडपट्टी जवळच होता. त्यामुळे तिथलेही कित्येक पेशंट्स असत. अर्थात कुण्या झोपडपट्टी दादाबद्दल उघड काही न बोलणे हा उपजत शहाणपणा त्यांच्यात ही होता नि माझ्यात ही. त्याच्या दादागिरीच्या कहाण्या उडत उडत येत असत कानांवर. एखाद्या पापभीरू पांढरपेशाप्रमाणे त्या ऐकल्याच नाहीत असे समजून दुर्लक्ष करीत असे मी. एखादा सद्गुणी नायक अशा दादापुढे उभा राहून लढा देतो हे फक्त सिनेमातच घडते. प्रत्यक्षात असे काही होण्याआधी आपलीच गठडी वळली जाईल एवढेही शहाणपण समाजाने आपले वय वाढताना आपल्याला दिले

असतेच. आणि आपल्या कारवायांना राजकीय संरक्षण मिळवण्याचे असल्या दादांना बाळकडू मिळालेले असते. तेव्हा 'तेरी भी चूप मेरी भी चूप' मध्ये अशा दादांचे जसे फावते त्यास ठेंग्यादादा अपवाद नव्हताच. गणपतीत अजूनही त्याची माणसे त्याच दादागिरीने वर्गणी गोळा करीत आणि दवाखाना आणि डॉक्टर म्हणून माझ्याकडून जास्तच उकळत पैसे. माझ्या जन्मजात भीरू स्वभावानुसार मी ते देतही असे. उगाच कुणाशी पंगा घ्यायचे शिक्षण आमच्या सारख्यांना थोडीच मिळते? आपल्याच सक्तीच्या वर्गणीच्या पैशांतून कानठळया बसवणारी गाणी ऐकत गणपतीचे दहा दिवस काढणे.. फारतर त्यावर चरफडणे.. यापेक्षा मी करणार तरी काय होतो?

माझा दवाखाना चालू होऊन काही वर्षे झालेली. रात्री दहा वाजता दवाखाना बंद करता करता ठेंग्या आपल्या नेहमीच्या अवतारात एकाएकी आत शिरला. एकाएकी माझ्या छातीतली धडधड मलाच ऐकू यायला लागली. त्याच्या पाठोपाठ एक बाई. कडेवर छोटे मूल. निपचित पडलेले. ठेंग्या आत शिरता शिरता त्याची एरवीची अरेरावीची देहबोली पार बदललेली.

"स्कॉलर, आपण तुला ओळखतो भाई.. आपल्या पोराला बघ काय झालेय.."

ठेंग्या मला ओळखतो! तेही स्कॉलर म्हणून? म्हणजे त्याची शाळेच्या दिवसांची आठवण अजून ताजी असणार. तरी तो मला ओळख दाखवत होता म्हणजे अडल्या नारायणाने पाय धरण्यासारखे होते ते. तो अडला होता हे खरे. आणि आजच्या सामाजिक व्यवस्थेत तो नारायण आणि मी गाढव होतो हे ही खरे!

त्याच्या पोराला चांगलाच ताप चढलेला. अशा गुंडाच्या पोराची ट्रीटमेंट म्हणजे माझ्याच जिवाला धोका होता. काही बरेवाईट झाले तर. शेवटी आजारच तो. पण माझ्यातल्या सशाच्या काळजाने डोके वर काढण्याआधी माझ्यातला डॉक्टर जागा झाला. मी ठरवले, बाप कसा ही

असो, अशा छोट्या पोराची चूक ती काय. त्याच्यावर उपचार करायलाच हवेत. थोडीफार रिस्क पत्करूनही.

मग मी त्याला नीट तपासले. ताप चांगलाच होता. अगदी मलूल होऊन पडलेला तो पोर. त्याची डिटेल हिस्टरी घेतली. तात्पुरते औषध देऊन म्हटले, "उद्या सकाळीच छातीचा एक्सरे काढून ये."

त्याची बायको पोराला उचलून घेऊन गेली. ठेंग्या मागे रेंगाळला आणि एकाएकी रडवेला होत म्हणाला, "स्कॉलर, पोर ठीक हुईल ना?"

माझ्या अंदाजानुसार पोराने खेळता खेळता काही गिळलेले असावे. छोटेसे खेळणे छातीत जायला अशा लहानग्यांत किती वेळ लागणार?

ठेंग्याला धीर देत म्हणालो, "तुम्ही चिंता करू नका. मात्र उद्या सकाळीच काढून या एक्सरे."

ठेंग्या चक्क रडवेला झाला होता! अशा वेळी त्याची दादागिरीची सारी वस्त्रे उतरवून ठेवल्यासारखा भासला मला. बाकीच्यांशी दादागिरी करणारा तो हाच ठेंग्या हे कुणास सांगूनही पटले नसते.

ठेंग्या निघून गेला. दुसऱ्या दिवशी सकाळी आला परत. माझा अंदाज खराच होता. पोराने छोटी शिट्टी गिळलेली. ती छातीत अडकून त्यामुळे झालेला तो न्यूमोनिया. सडकून ताप आला तरी जोवर ती शिट्टी बाहेर येत नाही तोवर त्याची तब्येत काही सुधारणार नव्हती. निदान अचूक होते. त्याला एका मोठ्या हॉस्पिटलात पाठवण्याहून गत्यंतर नव्हते.

काही दिवसांनी ठेंग्या परत आला. तो दवाखाना बंद करण्याच्या वेळी.

"स्कॉलर, तुला आपण थ्यांक्यू बोलायला आला. साला हुशार तू. पोराला वाचवला. नायतर आठ दिवस तिकडे अवशद द्यून थकलेला."

त्याचा पोर बरा झाला याचा आनंद तर होताच आणि आता ठेंग्यापासून धोका नाही याचा सुटकेचा निश्वास ही टाकता येणार होता मला.

मी काही बोलण्याअगोदरच तो म्हणाला, "तुला भेटलो स्कॉलर आणि शाळेची याद आली. साला काय दिवस होते. आपला तर जन्म बरबाद झाला.. पण तुम्ही स्कॉलरनी नाव काढले शाळेचे."

या ठेंग्याच्या आत असले कोमल काही असेल असे सांगूनही खरे वाटले नसते मला. तेही शाळेबद्दल.

पुढे तो असाच वरचेवर येत राहिला. बहुधा दवाखाना बंद होण्याच्या वेळी येई. गप्पा मारून निघून जाई. त्यावेळी तो आपल्या दादागिरीचा रूबाब बाजूला ठेवून येत असे.

बोलता बोलता त्याच्याबद्दल कितीतरी गोष्टी कळल्या. त्याचे घर झोपडपट्टीत. बाप नाही. आई कशीबशी घर चालवतेय. जगण्यासाठी कमवता कमवता पोराकडे लक्ष द्यायला तिला कुठून मिळणार वेळ. त्यात तो थोडा खोडकर. शिक्षकांनी त्याला शिकण्यास नालायक ठरवलेले आणि त्या वयात त्याने त्यांच्यावर पूर्ण विश्वास टाकलेला आणि स्वतःस तसेच ठरवून टाकलेले. एकदा तो म्हणालाही, "त्यावयात कुणी समजावून सांगणारे भेटले नाय आपणला नायतर आज आपणही साला जंटल मन झालो असतो. पन सगल्यांनी म्हणले, हा अनंत्या काय कामाचा नाय .. आपण म्हणला म्हणजे नसणारच आपण काय कामाचा. आन हायच आपण आऊटसस्टाँडींग. सगल्या

टायमाला क्लासच्या भायेर. शाळा सोडलीना तर लय वाईट वाटले बघ. तुम्ही स्कॉलर लोकांना नाय कलणार ते."

हे तर खरेच होते. त्याने शाळा सोडताना तो खूप खुशच असावा असे वाटले होते आम्हाला. खरे काही वेगळेच होते. आम्ही तिकडे दोन मार्क कमी मिळाले म्हणून हळहळताना इकडे हा शाळेतून काढून टाकले म्हणून हळहळत होता. वर कुणी त्याच्याकडे ढुंकून पाहिल तर तो कुणाला हे सांगेल.

"आपणची गणपतीबाप्पावर लय श्रद्धा स्कॉलर. तो बुद्धी देतो म्हणतात. आपण जन्मला तेव्हा तो दुसरे काय कामात बिझी असनार. नायतर असा बिनबुद्धीचा कशाला आला असता आपण इकडे."

आज इतक्या वर्षांनी आणि इतकी लहान मुले पेशंट म्हणून पाहिल्यावर वाटते, आपली शिक्षणव्यवस्था त्या हुशार मुलांसाठीच आहे. आणि ती हुशारी फक्त आपल्या पुस्तकातल्या अभ्यासातली असायलाच पाहिजे. नाहीतर ते छोटे पोर जगण्यालायकच नाही. मग भले त्याला दुसरीकडे कुठे गती असो. मंदबुद्धी किंवा तत्सम मुलांची गोष्ट वेगळी पण कित्येक अभ्यासाव्यतिरिक्त गुण असणारे आपल्या शिक्षणाने आत्मविश्वास गमावून बसण्याची व्यवस्था करून ठेवलीय आम्ही. ज्या वयात पाठीवरून मायेचा एक हात फिरला तरी आयुष्य बदलून जाईल.. त्यावयात एखाद्या पोरास शिकण्यासाठीच नालायक ठरवणारी ही व्यवस्थाच खरी नालायक. हे सांगून तरी काय फायदा आहे? त्याच व्यवस्थेत स्कॉलर म्हणून मोठा झालेलो मी आणि त्याच व्यवस्थेतून असा सैरभैर होत वाममार्गाला लागलेला ठेंग्या.

एके दिवशी म्हणाला, "तुला खूप दिवसापासून सांगायचे स्कॉलर, तू आपला जिगरी दोस्त बन. तुला नवल वाटेल ह्या मवाली ठेंग्याशी दोस्ती करायची म्हणून. पण तू प्लीझ नाय नको म्हणू. पन आपला तू एकच एक दोस्त जो सभ्य हाये. बाकी सारे साले आपल्या लायनीतले. वाईटसाईट नादाला लागलेले. तुला पाहिले की कसं बरं वाटतं. मानूस कसा असावा.. तुज्यासारखा. नायतर आमी. कदी पोलिसाकडून बचावीत फिरतो कदी दुसऱ्या गँग वाल्याकडून."

आमची दोस्ती! त्याची आणि माझी दुनिया वेगळी तर होतीच.. पण त्यानिमित्ताने त्याला कुणी आधार लाभत असेल तर म्हणून मी म्हणालो, "ठेंग्या.. कबूल. तू माझा मित्र आहेस. तर एक गोष्ट मी सांगेन.. विचार कर. तू ती मानलीस किंवा नाही.. तरी तुझी माझी मैत्री कायम.."

मी काय म्हणणार त्याचा त्याला अंदाज  असावा, "आपणला माहिती तू काय बोलणार स्कॉलर.. हे सगळे सोड ह्येच बोलणार तू"

ते खरेच होते.

मी म्हणालो त्याला, "एवढे नाही आवडत तर सोडून दे सारे. अजून नवे आयुष्य सुरू करता येईल आणि उजळ माथ्याने फिरता येईल.."

त्यावर तो विचारात पडला. बघतो विचार करून म्हणून गेला.

मध्ये कित्येक महिने तो आला नाही. एकदा उगवला तो चक्क साफसूफ कपड्यांत. हा असा ही दिसू शकतो यावर माझाच विश्वास बसेना. माझ्यासमोर खिशात हात घातला. एक रामपुरी चाकू माझ्या टेबलावर टाकत म्हणाला, "स्कॉलर, आपला या दुनियेला रामराम. आजच साला

सुटून आला. आता हे हरामाचे धंदे बंद. लवकरच आपण जंटलमन म्हणून राहणार. साला पोराला कमसेकम लाज तरी वाटायला नको आपली मोठा झाल्यावर."

मग जुन्या आठवणी सांगत बसला तो.. बोलता बोलता म्हणाला,

"तुला ठाऊक नसेल पण आपण ठेंग्या कसा झालो ना.. तर लहानपणीच आपण कुणी काही बोलले तर ठेंगा दाखवायचा. शाळेत मास्तरला पन ठेंगा आन झोपडपट्टीत कुनी मारामारी केली तरीपन ठेंगा. त्या झोपडपट्टीत पोरं जरा लौकरच मोठी होतात. तसा आपणपण लवकरच सगळ्यांना ठेंगा दाखवत झालो मोठा. शाळा सुटली.. दाखवला ठेंगा. म्हणला.. हड .. आपणला शाळाबिळा नको .. आपला आपण शिकेल दुनियाची रीत. शिकला पण जरा चुकीचा शिकला. पण शिकला ते दाखवीत ठेंगा. ते ठेंगा दाखवता दाखवता आपण ठेंग्यादादा झाला. पण साला लाइफनीच आपणला ठेंगा दाखवला. आता त्या अंडरवर्डला ठेंगा दाखवायची वेळ झालीय. सगळे स्कॉलर तुझ्यामुळे."

पुढे ठेंग्या सुधारला. जाता येता भेटून सांगून जायचा.. "स्कॉलर थ्यांक्यू."

खरेतर त्याच्या सुधारण्यात माझा काही सहभाग होता असे नाही. त्याला मनापासून तसे वाटल्याशिवाय त्याने मी सांगितले म्हणून ऐकले असे म्हणणे म्हणजे उगाच शेखी मिरवणे होईल.

ठेंग्या सुधारला त्याला पाचएक महिने झाले असावेत. तो त्यादिवशी आला, म्हणाला, "स्कॉलर. एक विनंती. आपणच्यामागे आपणच्या पोराला नीट मार्ग दाखव. तो येईल तेव्हा. तुझ्या मदतीबद्दल थ्यांक्यू!"

मला वाटले हा कुठे दुसरीकडे चालला की काय.. तर म्हणाला,

"स्कॉलर.. जास्त दिवस आपणला ते गॅंगवाले जिंदा नाय ठेवनार. एकदा या लायनीत पडला ना की मेल्याबिगर सुटका नाय. पन आपण आता सुधरणार. साला हा जन्म संपत आला.. आता पुडच्या जन्मी सुधरणार.. तुझ्यामुळे मरता मरता तरी साला शांती मिळेल आपणला."

तो गंभीरपणे बोलत होता. त्याच्या त्या 'पॉइंट ऑफ नो रिटर्न' दुनियेबद्दल मला ऐकूनच माहिती होती. आणि त्या दुनियेचा जीताजागता एनसायक्लोपीडिया माझ्या समोर बसलेला. तो जे काही बोलला त्यामुळे त्याच्याबद्दल मला चिंता वाटू लागली.. मी तसे म्हणालो ही तर म्हणाला, "स्कॉलर.. तू चिंता करू नको. या लायनीत यायचे तर पैल्या दिवसापासून मरणाची तयारी करावी लागते. एक ते जवान लोक आन दुसरे आम्ही लोक. दुसऱ्याला मारतो तेव्हा एक दिवस आपला नंबर हे म्हायतीच असते आपणला."

शांतपणे तो हे बोलला आणि निघून गेला. तो बोलला त्यातले काहीही माझ्या अनुभवाच्या परिघातले नव्हतेच. आणि त्याला काही मदतही मी करू शकणार थोडीच होतो?

आणि एके दिवशी एक पोलिस माझ्या दवाखान्यात आला त्याची विचारपूस करायला. जेवढी माहिती होती तेवढी देऊन झाली. शेवटी त्याने सांगितले त्यामुळे धक्का बसला मला. आदल्याच दिवशी कुण्या दुसऱ्या गॅंगवाल्याने त्याला संपवले होते. नकळत माझ्या डोळ्यांत पाणी आले. म्हटले आजवर गुर्मीत राहणारा आणि सगळ्यांवर दहशत दाखणारा ठेंग्या कमीतकमी जिवंत तरी होता. आणि आता सुधारला तर त्याच्या दुनियेने त्याचे  जगणेच नाकारावे? त्या दुनियेस ठेंगा दाखवत पाच सहा महिने निघाले त्याचे. पण शेवटी ठेंग्यादादाला त्याच्या लाइफनेच ठेंगा दाखवला.

मध्ये खूप वर्षे गेली.

अधूनमधून ठेंग्याची आठवण येत असे. आजूबाजूचे म्हणत, "तो गेला त्याच्या कर्माने. देवाघरचा न्याय आणि काय!" न्याय म्हणावा तर अजबच होता तो. आणि खरेकाय ते मला ठाऊक होते. ठेंग्यादादा गेला नि त्याची जागा दुसऱ्या कुणी दादाने घेतली. हे जग असे कुणासाठी थांबत नसतेच तर अंडरवर्ल्ड ही कसा असणार अपवाद? मध्ये ठेंग्यादादाचा मुलगा मेडिकलला ॲडमिशन मिळाल्याचे पेढे द्यायला आला. म्हणाला, "पापा असते तर आज खूप खूश झाले असते. त्यांनी मला सांगून ठेवलेले, काही बनायचे तर तुमच्यासारखे बन. जमले तर डॉक्टर बन. हीज सोल विल बी व्हेरी हॅपी.."

खरेच ते. मलाही आनंद झाला. त्याची बिचाऱ्याची एक इच्छा तर पूर्ण झाली. आणि शेवटी ठेंग्यादादाच्या मुलाने तरी लाइफला ठेंगा दाखवलाच!

# *फ्लेम!*

फ्लेमचा अर्थ काय किंवा काय काय असू शकतो? अर्थातच फ्लेम म्हणजे ज्योत.. किंवा ज्योती! पण ही फ्लेम त्याअर्थाने मर्यादित नाही. ज्योती म्हणजेच फ्लेम आणि तीच माझी पूर्वायुष्यातली फ्लेम! थोडक्यात ही तिचीच गोष्ट. आज ज्योती, म्हणजे माझी ज्यो माझ्याच बरोबर आहे. म्हणजे पूर्वायुष्यातली फ्लेम आता जणू फ्लेमिंगो बनून माझ्या आयुष्यात स्थिरावलीय.. फ्लेमिंगोशी तुलना त्या पक्ष्याच्या स्थलांतराशी नाही.. तर त्याच्या डौलाशी आणि मोहकतेशी! तेव्हाची माझ्या मनात पेटणारी ज्योत आता इतक्या वर्षांनंतर मात्र थोडीफार इन्फ्लमेबल झालीय! पण तो किस्सा वेगळा. म्हणजे एकदा पत्नीपदावर आरूढ झाली की गर्लफ्रेंड बदलून मालकीण बनते तशी ही पण कशी अपवाद असेल? माझा एक मित्र एकदा एका लग्नात म्हणाला होता, 'हे दोघे उभे आहेत ना स्टेजवर.. ते काय विचार करताहेत सांगू? नवरा तिला मिठीत घेण्याचे आणि नवरी त्याला मुठीत घेण्याचे!' खरे तर तेव्हा माझ्या मित्राचे  लग्न झाले नव्हते.. पण गोष्ट खोटी नव्हती हे इतक्या वर्षांनंतरही सांगू शकतो मी! प्रेमकथा लग्न झाले की यथावकाश संपतेच!

तर फ्लेम बद्दल सांगत होतो.

ती माझ्या आयुष्यात कधी आली ते माझ्या नक्की स्मरणात नाही. म्हणजे सिनेमात पहली मुलाकात वगैरे दाखवतात तशी मला काही आठवत नाही. कुठल्याशा सिनेमात कुठल्याशा कॉलेजात साधनाची पडलेली पुस्तके राजेंद्रकुमार उचलून देतो वगैरे आहे.. तशी काही झाली नाही पहिली भेट हे नक्की. कॉलेजमध्ये केव्हा तरी ती पहिल्यांदा दिसली असणार. आणि तिथेच

कधी तरी भेटली असणार. तरी पण मला आठवते ती भेट पहिली म्हणावी. तसा तिला मी विचारू शकतो त्याबद्दल. तिची स्मरणशक्ती अचाट आहे. विशेषत: भांडताना.. तिला दहा वर्षांपूर्वीचेही संदर्भ आठवत असतात आणि तेव्हा मी काय बोललो ते ही. मला आधीच आदल्या दिवशीचेही लक्षात ठेवायची नाही सवय. त्यामुळे कित्येक वर्षांपूर्वीचा तो इतिहास ती म्हणेल तसा मानावाच लागतो. तर तिला मी आज जर विचारले.. आपण पहिल्यांदा कधी आणि कुठे भेटलो.. तर तिचे हमखास उत्तर असेल आज, 'माझे नशीब फुटके म्हणून तुझ्याशी गाठ पडली!' म्हणजे उत्तर तर मिळणार नाहीच आणि वर हे सारे ऐकून घ्यावे लागायचे. आणि खरेतर इतके काही फुटकेबिटके नशीब नाही तिचे. म्हणजे सुखी आयुष्यास हवे ते आहे सगळे.. उदाहरणच द्यावे तर सोन्यासारखा नवरा मिळालाय.. वगैरे वगैरे! जाऊ देत.. उगाच आत्मस्तुती कशाला!

पण आता फ्लेमबद्दल लिहायला बसलोय तर आठवेल तसे लिहायलाच पाहिजे. म्हणजे काही वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. कॉलेज हे अशा गोष्टी करण्यासाठीच असते बाकी डिग्री आणि अभ्यास हा भाग त्या कॉलेजच्या जीवनाचा बायप्रॉडक्ट असे सगळ्याच हिंदी सिनेमातून शिकवत असत आम्हाला. आमची मने त्यात निष्पाप आणि संस्कारक्षम. टिपकागदासारखे सारे शोषून घेत ते संस्कार! त्यामुळे कॉलेजात गेल्यावर त्यादिशेने प्रगती करणे आले. फक्त आमच्या कॉलेजमध्ये पन्नास टक्क्यांहून अधिक मुली असताना त्यातून निवड कशी करावी? कुणी म्हणावी आपुली तर तिने नकारघंटा वाजवावी.. किंवा ती आधीच कुणी पटवली असावी तर काय घ्या! अभ्यासाहून असले गहन प्रश्न सतावीत असताना ज्योती आणि माझी जमली कशी जोडी?

कॉलेजही या दृष्टीने मदत करण्याचा आटोकाट प्रयत्न करीत असे. आमच्या कॉलेजात तर अशा जोड्या जुळाव्यात म्हणून कट्टेच कट्टे होते चोहिकडे. वेळ मिळाला की बसा कट्ट्यावर!

संध्याकाळी सामसूम झाली की जमलेल्या जोड्यांसाठी एकांताची सोय ही कॉलेजने करून दिलेली. कँटीन होते.. त्यात बसायला दोन पाच रुपयांचा चहा पुरत असे. तो ऑर्डर केला की जोडीने तासन तास बसणे अलाऊड असे. मी तर चहा देखील न पिणारा.. पण पुढे कँटीन मध्ये बसता यावे म्हणून चहा प्यायला लागलो. प्रेम माणसाला बदलण्यास भाग पाडते ते असे!

या शिवाय कॉलेज इलेक्शन्स काय, अॅन्युअल डे काय.. पिकनिका नि हाइक्स.. म्हणजे जोड्या जुळवण्यासाठी फुल्टू तयारी कॉलेज करून देत असते. त्यात परत बोअरिंग लेक्चर्स बंक करून जोडीने कट्ट्यावर बसायची सोय कॉलेज करून देतेच. विचार करा.. सगळेच प्राध्यापक जर सुंदर रीतीने शिकवू लागले तर प्रियाराधनेस वेळ कुठून आणला असता माझ्यासारख्याने? थोडक्यात माझ्या लव्हस्टोरीत कॉलेजचे योगदान खूप आहे! ती नोंद केल्यानंतरच पुढे जाता येईल!

माझ्या आठवणीत मी आणि ज्यो भेटलो ते कॉलेज डे च्या नाटकाच्या निमित्ताने. अर्थात तोवर ती ज्यो झाली नव्हती माझ्यासाठी. ज्योतीच होती. फ्लेम होती की नाही.. बहुधा होती. म्हणजे तिच्याकडे पाहून कुछ कुछ होत असे. पण पूर्वी म्हणालो ना, एक प्रेम.. सतरा भानगडी! म्हणजे ती ऑलरेडी बुक्ड नाही ना पासून ते तिच्याकडून हो असेल ना पर्यंत. मग मध्येच त्यात प्रपोझिंगचा आडवा उभा मेरू पर्वत आला! ते सारे ओलांडून झाले की दोन्ही घरच्या वेशी ओलांडण्यसाठी परवानगीची कसरत. वेस म्हणजे कसली.. तीच जातपात पंथ.. धर्म आणि काय काय! सारे भारतीय समान म्हणताना आमच्याकडे हे सारे आम्ही किती जपून ठेवलेय .. जाऊ देत.. हा विषय नाही आपला. लिहिण्याच्या निमित्ताने जुने दिवस आठवावेत.. ज्यो आजही माझ्या आयुष्याचा आधार आहे तिच्याबद्दल काही सांगावे आनंदाने एवढेच!

तर नाटक! ते होते प्रेमाच्या गावा जावे! आज नाटकातले काही आठवत नाही. पण आमचे लीड रोल होते आणि नाटकाचे नाव सार्थ करण्याच्या दृष्टीने पावले टाकली होती आम्ही तेव्हा ते आठवते. आमच्या कॉलेजमध्ये बाईक फार कमी जणांकडे होती. त्यातला भाग्यवान मी एक होतो. म्हणजे मेडिकलला ॲडमिशन मिळाल्याचे बक्षीस म्हणून मिळालेली. ती होती म्हणून रिहर्सल संपल्या की कर्तव्यबुद्धीने मी ज्यो ला घरी सोडून येई. ती ही हळूहळू हक्काने बसायला लागली मागे. गंमत सांगू.. आधी.. म्हणजे आमचे काही नसताना मी तिला घरापर्यंत सोडून येत असे.. नि नंतर नंतर घरापासून दूर! कुणी पाहू नये म्हणून! प्रेम असे आपोआप चोरटेपणा शिकवते म्हणजे! ती त्यामुळे आधी लाजत नसे.. नि आमची जोडी जमल्यावर मात्र लाजत माझ्यामागे बसे! आजकाल पोरींनी लाजणे बिजणे सोडून दिलंय असे वाटते. पण आमच्या वेळी लाजणे असायचे. ते नसते तर ज्योच्या कितीएक मोहक मुद्रा माझ्या ह्रदयी कोरून ठेवल्यात मी त्यांना मुकलो असतो. आधीच ती लावण्यमयी. त्यात लज्जेची लाली गाली चढली की अप्रतिम सौंदर्याची मूर्ती समोर बसलीय असे वाटत असे. त्यात तिचा मंजूळ आवाज आणि समजूतदार स्वभाव. प्रेमाच्या गावी न जायला तिने काही कारण मागे ठेवलेच नव्हते. तिला मी आवडण्यास काय कारणे असावीत? म्हणजे 'काय पाहिलंस माझ्यात..' असे रीतसर विचारायचे दिवस निघून गेले.. आज विचारले तर म्हणायची, 'माझं नशीबच खराब!' पण हे गंमतीत. म्हणजे तिने माझ्यात काय पहावे.. नाही म्हणजे एक असेल तर सांगेन ना! आणि परत वर आत्मस्तुती! त्यापेक्षा नकोच ते!

आम्ही त्या नाटकातल्या भूमिकांतून जवळ आलो हे खरे. पुढे अभ्यासाचा डोंगर उभा राहिला तेव्हा मात्र डोळे पांढरे व्हायची वेळ आलेली. नुसती परीक्षा पास होणेही दिव्य वाटावे असे काही झाले. एकमेकांच्या प्रेमात पडताना अभ्यास नामक काही आहे याचाच जणू विसर पडलेला. तरीही कसेबसे दिवे लावले परीक्षेत. खरेतर मीच. ती जात्याच माझ्याहून हुशार. मी

म्हणालो ही तिला, तू मला निवडलेस म्हणजे तूच माझ्याहून हुशार असली पाहिजेस! काही बाबतीत मात्र ती ट्यूबलाईट आहे.. अजूनही.. ही माझी मल्लिनाथी कळायला वेळ लागला तिला आणि कळल्यावर मात्र.. ज्वालामुखीचा उद्रेक.. आणि काय! आमच्या कॉलेजजवळच एक हॉटेल होते. आमच्यासारख्या जोड्यांसाठी स्पेशल टेबलं असायची आतल्या बाजूस. तिथली कोल्ड कॉफी गेली पोटात की राग निवळायचा तिचा. अशा कित्येक कोल्ड कॉफ्या प्यायलीय ती याचा हिशेब नाही! तिथला एक वेटर पण ओळखीचा झालेला माझा.. म्हणायचा.. 'मामला थंडा तो कॉफी गरम और मामला गरम तो कॉफी ठंडा!' पण आता ही कोल्ड कॉफीवाली ट्रिक चालत नाही! आता ती चिडते.. आणि स्वतःच कधी थंड होते! पिऊन पिऊन कॉफी तरी किती पिणार ती!

तिच्या घरून कॉलेजात जेवणाचा डबा येई. तो दोघांनी एकत्र खाण्याची स्टेज आली. कोणाचे लक्ष नाही असे पाहून मी तिला घास ही भरवीत असे. त्यात एक दोनदा तिने हलकेच माझ्या बोटांचा चावा ही घेतलेला! अर्थात योग्य वेळ आली की त्याचा बदला मी घेत असेच! काही म्हणा माझ्या होणाऱ्या सासूबाई सुगरण खऱ्या! त्यांचा हा गुण ज्यो नी घेतला असावा का याचा तेव्हा अंदाज नव्हता मला. पण खाणारे आज म्हणतात, आईपेक्षा मुलगी सवाई. थोडक्यात जिभेचे लाड करून घ्यायची सवय लावलीय ज्यो ने मला! कुणी त्याला 'चोचले' म्हणून हिणवतात.. आणि तेच 'अन्न हे पूर्णब्रह्म' असे सुद्धा म्हणतात! काय खरे कुणास ठाऊक! पण ज्यो सुगरणच नाही तर अन्नपूर्णा आहे हे खरेच. आज सारे घर नि डॉक्टरी सांभाळून ती स्वयंपाकघर ही कसे सांभाळते याचेच आश्चर्य वाटते. म्हणजे मी तिच्या मल्टीटास्किंगचे कौतुक किंवा तिला सुपरवुमन म्हणून त्या ओझ्याखाली दबवून टाकण्यासाठी नाही सांगत. पण ती हे करते मॅनेज हे खरे!

कॉलेजच्या रोमॅन्टिक दिवसांच्या आठवणी आजही ताज्या आहेत. असे म्हणतात की आठवणींत मन रमायला लागले की समजावे.. उत्तरार्ध सुरू झालाय! या बेभरवशाच्या आयुष्यात कसला पूर्व आणि उत्तर अर्ध! मी तर आला दिवस आनंदात घालवा अशा लिमिटेड फिलॉसॉफीने जगणारा! अशात हल्लीच ह्रदयाच्या रक्तवाहिन्यांनी दिलाय दगा. बायपास झाली. त्यादिवसांत माझ्या ज्यो ने खंबीरपणे माझी जशी साथ दिली ते पाहून वाटले याहून किती सर्वगुणसंपन्न असू शकेल सहचारिणी! थोडे जिवावर बेतले की हळवेपणा येतो स्वभावात. स्वतः डॉक्टर असलो मी तरी मानवी स्वभावास कसा असेन अपवाद?

आज आठवणींची पुरचुंडी उघडून बसलोय तर काय काय नाही दिसत त्यात! कॅलिडोस्कोपमध्ये वेगवेगळया नक्षी दिसाव्यात तसे सोनपंखी दिवस दिसतात. आजही तेच आणि तसेच दिवस आहेतच.. आणि राहतीलही ज्यो चा हात जोवर हाती आहे.

आठवतो आजोबाच्या डोंगरावरचा ट्रेक. चांदण्यारात्रीत डोंगरावर चढताना तिने पकडलेला हात. पहिल्याप्रथम. ती खरेच घसरून पडणार होती की त्याआधीच तिने मला पकडून ठेवलेले.. कुणास ठाऊक! त्या रात्री आमच्या बरोबर सारे होते.. मित्र मैत्रिणी.. आणि तरीही मला फक्त तिच्याबरोबरच आल्यासारखे वाटत होते. आकाशातून तरंगत चालल्याचा भास होत होता. रात्री शेकोटीवर जेवण बनले. तिच्या सुगरणीच्या हाताची ही पहिली चव! त्या रात्रीच्या खिचडीहून जगात चविष्ट काही नसावे! माझ्यासकट सगळयांनी चाटूनपुसून खाल्लेली ती रटरटत शिजवलेली खिचडी. मग त्या जंगलात गायलेली गाणी! ज्यो चांगली गाते हे ऐकून माहिती पण इतकी चांगले गाते हे त्या दिवशीच कळले. त्यारात्री आमची जुगलबंदीच झाली जणू.. आजकल पांव जमीं पर नहीं पडते मेरे.. तिने सुरू केले. त्यानंतर मी गायलेले गाणे.. तुमसे ओ हसीना तो

मोहब्बत न मैंने करनी थी.. मगर मेरे दिलने मुझे धोखा दे दिया! अजूनही आठवतात ती गाणी! तिचा सुरीला स्वर आणि त्यापुढे भसाडा आवाज माझा! त्यादिवशी गायलेली सगळी गाणी मला आजही आठवतात.. लिहायला बसलो तर गाण्यांची मोठी जंत्री व्हायची. त्या ट्रेक ने एक झाले, सारे मित्र मैत्रिणी आम्हाला ऑफिशियली चिडवायला लागले!

त्यानंतर तिचा वाढदिवस! द्यावे तर काय तिला प्रेझेंट? पोरापोरींनी कितीही डिवचले वा चिडवले तरी अजून तो लाखमोलाचा.. मिलियन डॉलर प्रश्न बाकीच होता! ती हो म्हणेल की नाही? तिला माझ्याबद्दल असे टेन्शन होते का? कुणास ठाऊक! नसणार. ती तशीही सर्वच बाबतीत कॉन्फिडन्ट आहे. आमच्या कॉलेजच्या तोंडी परीक्षांत मी बावचळून जायचो तर हिचा तोच स्ट्रॉंग पॉइंट! तर त्या वाढदिवशी काय द्यावे? तिच्याआधी माझा असता वाढदिवस तर ती काय देते यावरून अंदाज बांधला असता. पण नाही. पण जात्याच माझ्यात एक शहाणपण आहे. बाहेर पैशाला पासरी ग्रीटिंग काड्र्स मिळतात. त्यातले काही न घेता मी रात्री बसून स्वतःच बनवले ते कार्ड. तशी माझी चित्रकला चांगली आहे. डोक्यात आयडियांचे भांडार आहे. त्यातून बनलेले ते ग्रीटिंग तिला दिल्यावर तिचे डोळे चमकलेच! त्यातील आतल्या पानावर माझी खास चारोळी होती.. बाहेर लांबसडक केस मोकळे सोडून बसलेल्या लावण्यवतीचे चित्र होते! आतल्या त्या ओळींत..

दिसलीस तू मजला गडे

जीव नकळत गुंतला

गमावूनी स्व अन प्राण हा

अडकून बसे तव कुंतला

म्हटले तर हिंट होती.. म्हटले तर नव्हती! मी त्या ओळी विसरलो नाही अजूनही. माझ्या वाढदिवसापर्यंत आमच्या प्रेमकथेचा सोक्षमोक्ष लागला होता! तिने त्यानंतर मला काय दिले असावे? खरे सांगतो माझ्या ध्यानात नाही! पुढेही कित्येक प्रसंग आले. मी माझी हातखंडा कला वापरून तिला चकित करीत होतो. आणि ती? ती फक्त डोळयांचा जादूतून मला मॅनेज करीत होती! त्यातून कविता ही केली मी तिच्यावर.. खरेतर तिच्या नजरेवर!

जादू तुझ्या नजरेची

टाक एक तरी कटाक्ष
उचल एक तू पापणी
धडधडे हे ह्रदय माझे
जाणशी ना तू झणी

सोडवशी गुंता असा हा
नेत्र पल्लवी कर कशी
जादु इ नजर तुझी ती
एकदा तरी वर कर अशी

सारे कसे बदलले
जादू तुझ्याच नजरेची ग
रम्य भासे जग हे मजला

किमया तुझ्याच नजरेची ग

जादु इ तेरी नजर
पडते जिकडे हर नगर
मोगरा गुलाब अन कमळ
भासे हे पुष्प जणू तगर

बदलली दुनिया ही माझी
मी न माझा राहिलो
नयन बाणांने तुझिया
विद्ध जर्जर जाहलो..

नंतर मग आमच्या त्या कथेत काय काय झाले?

.. रात्री उशीरापर्यंत गप्पा मारत कट्ट्यावर बसणे झाले

.. आणि भर पावसात बाइक वर ती खेटून बसली की मनातल्या 'जिंदगी एक सफर है सुहाना' म्हणत तिला घरी सोडणे झाले.

.. कॅंटीनमध्ये दोघांची बिलं एकाने भरणे झाले

.. एक चहा एकाच ग्लासात पिणे झाले

.. भर पावसात एक छतरी और हम दोनों झाले

.. मग तिच्या हॉस्पिटल ड्यूटीत रात्रभर तिच्या वॉर्डात ठाण मांडणे झाले

.. तिच्या ऑलरेडी ओव्हरवर्क्ड शेड्यूल मध्ये जमेल तितकी मदत करणे झाले .. त्यानंतर तिची जर्नल्स पुरी करणे

.. तिच्या नोट्स पुऱ्या करणे

.. रविवार सुट्टी असली की दोन मिनिटांच्या फोन संभाषणासाठी अख्खा दिवस प्लॅनिंग करणे झाले! त्याकाळी फोन नसत सगळीकडे. आणि घरच्यांपासून लपूनछपून फोन करण्यासाठी पण मोठे प्लॅनिंग लागे. त्यात तो फोन लागणे आणि तिच्याशी बोलणे होणे यात थ्रिल होते. त्यावेळी तिच्याशी न बोलता एकही दिवस जात नसे. आजही जात नाही पण तेव्हाची बोलण्यासाठीची हुरहूर आठवते.

.. मध्येच आम्ही शिवाजी पार्कात जाऊन बसायचो.. भविष्याची स्वप्ने पाहात

.. तर कधी सत्यम मध्ये रात्रीचा शो पाहात.

.. तिला नि मला नाटकाची आवड. रवींद्र मध्ये बघितलेली आठवतात नाटके.

.. कधी नाईट ड्यूटी लाइट असली की जवळच्याच हॉटेलात खाल्लेली  पावभाजी

.. आणि वर कट्ट्यावर बसून प्यायलेला कटिंग चहा!

.. पुढे काहीही सेलिब्रेट करायचे म्हटले की जिप्सी मधला खाल्लेला पिझ्झा!

पाच वर्षे!

कोर्टिंगसाठी खूप वेळ मिळाला म्हणावे तर ती वर्षे कशी उडून गेली कळले सुद्धा नाही.

पुढे व्हायचे ते झाले. म्हणजे विवाहादि सगळया गोष्टी. यथासांग अगदी. मी म्हणालो ना की विवाह हा प्रेमकथेचा अंत.. ते अगदीच खरे नाही. प्रेमकथा संपत नाही.. प्रेम संपत नाही.. पण कथा वेगळे वळण घेते. विवाहापूर्वीचे विषय नंतर बदलतात.. जबाबदाऱ्या बदलतात.. आधीचे बेफिकीर आयुष्य बदलते. अगदी एखाद्या वर्षांचा हनिमून पिरीयड वगळता.. पुढे 'दिसते मजला सुखचित्र नवे' गाण्याचे दिवस ही सरू लागतात. कोणी कसे अपवाद ठरेल? तसेच आमचे ही झाले. कधी कडाडून भांडण झाले की रूसवा नि फुगवा आपली जागा दाखवू लागला. मग मनवणे आले. त्यात जुने संदर्भ आले आणि सासर माहेरच्या तुलना करणे आले! हे सारे झाले तरी प्रेमाचा ओलावा तसाच राहिला. कर्तव्यनिष्ठेतून सर्वांची काळजी घेणे आले. त्या साऱ्यात ज्यो पैकीच्या पैकी मार्क मिळवून आहे.. आजवरही. असे असले तरी पत्नीपदाच्या सिंहासनावरून घराची सत्ता हाकताना दिसते ज्यो मला. आणि आनंदाने तिला तो हक्क गाजवू देताना मी.

गंमत सांगतो.. जादू तेरी नजर नावानेच नंतर परत केली मी कविता! ही पण वाचा म्हणजे हे चित्र पहा नि ते चित्र पहा.. असे जाणवल्यावाचून राहणार नाही! अर्थातच लग्नानंतर काही वर्षे उलटून गेल्यावरचे हे पती गीत आहे!

जादू तेरी नजर

एका नजरेने पाहिलेस तू
काळजाचे चुकले ठोके
हादरले मनीचे मूषक
झडप घाली जणू कुणी बोके

सरसरून आला काटा

दरदरून आणि सुटला घाम

वाटले झाले.. सरले सारे

आणि झाले काम तमाम

असे वाचले मी तुझ्या

कडक नजरेचे ते इशारे

काय सांगू आणि दिसले

भर दिवसा गगनात तारे

म्हटले नाही आता

खरे आणि काही खैर

वक्त जैसे थम गया..

पण बाबळ्या तू मत ठैर

मान ले कहा

उसका नादान

उसमेहीच है भला

मेरा अरे पहचान

तेरी नजर का

है ये जादू

उसपरही मेरे हाल
का टिकट फाडू?

वर करून पाहिले
एका नजरेने तरी
त्यापेक्षा गड्या
तुझी आज्ञाच बरी

चालती बाण
नजरेच्या भात्यातुनी
संमोहित मी न झालो
सत्वरी तो झणी?

थोडक्यात..

उठे नजर एक एक तुझी जादुई
वळणार न का कुणाची बोबडी?
अन न ऐकून सांगतो कुणाला
प्यार मला माझी ही खोपडी

थोडक्यात काय काळाचा महिमा आणि काय! अर्थात हे गंमतीत. माझी एक जहाल स्त्रीवादी मैत्रीण आहे.. स्वत: डॉक्टर. तिला हे पती-पत्नीतील 'नोंकझोक'चे किस्से पटत नाहीत

म्हणे! ती म्हणते ह्यामुळे समस्त स्त्री जातीचा अपमान होतो! कसा होत असेल कोण जाणे! मी म्हटले तिला, 'बाई गं, अशी गंमत मी स्व पत्नीची नाही तर कोणाची करणार?' असो. मुद्दा बदलण्याची गरज नाही! तर ज्यो च्या नजरेच्या धाकात आयुष्य मजेत चालू आहे! कधीकधी वाटते तीच नसती माझ्या आयुष्यात तर? नक्कीच माझी नौका भरकटली असती. एकूण काय ज्यो एका माझ्या आयुष्याचा अँकर.. नांगर आहे.. प्रकाशाची ज्योत आहे..

ज्यो.. ज्योत.. ज्योती.. म्हणजे पुन्हा फ्लेम!

खरे सांगू तर सर्वार्थाने माझी ज्यो म्हणजे फ्लेम आहे. त्या ऐन तारूण्यात फ्लेम चा अर्थ वेगळा असेलही. पण ज्यो खऱ्या अर्थाने ज्योत किंवा ज्योती आहे माझ्या आयुष्यातली. तिने जीवन उजळून टाकले वगैरे टिपिकल लिहिता येईलही. ते खोटेही नाही.. ती गृहिणी आहे.. प्रिय सखी आहेच.. आणि विविध गुणसंपन्नही आहेच! ती अभिसारिका आहे.. प्रेमिका आहे.. साथी आहे.. सखी आहे.. मैत्रीण आहे आणि कित्येकदा माता आहे. प्रेमाबरोबरच कधी माया आणि कधी वात्सल्यही दिसत असते तिचे.. हे सारे कुणी लिहित, बोलत नाही दररोज म्हणजे ते तसे नसते असे नाही. कालची फ्लेम.. आजची थोडीफार इनफ्लेमेबल.. ज्यो हव्या त्या वेळेस बरोबर जळाहूनही शीतल होऊन थंडावा देत असते.

कुणी म्हटले आहे आपल्या पत्नीस उद्देशून..

डोळ्यापुढे दिसे गे मज चित्र ते सजीव

माझ्या घरातली तू गृहिणी, सखी, सचिव

अगदी माझ्या ज्यो बद्दलच लिहिलेय ते.. माझी फ्लेम.. माझी सखी.. ज्योती.. माझी ज्यो!

## *पेद्रूची गोष्ट*

काही जणांना आपण उगीचच ओळखत असतो. म्हणजे कधीतरी भेटतात ते. ओळख होते. पुढे ती वाढते. आपण आणि त्यांच्यात फरक खूपच असतो.. म्हणजे एकूणच त्यांची बॅकग्राऊंड म्हणा की आर्थिक स्थिती म्हणा.. तरीही ओळख वाढत जाते. कारण नसताना त्यांच्या गोष्टीत आपण आपले इन्व्हॉल्व होतो. पुढे काही नाही. मैत्री म्हणावी ती जमायला काहीतरी सामायिक गोष्टी लागतात. त्याच नसल्या तर ओळखीची एक पातळी राहते. कारण नसताना त्यांना आपण जवळचे वाटत राहतो. आपण उगाच जनरल असा सल्ला देत राहतो. आयुष्य पुढे जात राहते. ती माणसे आपल्या आयुष्यात मनाच्या  कुठल्याशा कोपऱ्याचा हिस्सा म्हणून बनून राहतात..

पेद्रू. होय नावच त्याचे ते. पेद्रू बस्त्याव. असली नावे आमच्या एरियात असतात. त्यामुळे तशा नावात मला आश्चर्य वाटण्यासारखे काही नव्हते. माझ्याकडे यायला लागला त्याला दहा वर्षे झाली. म्हणजे माझ्या दवाखान्यालाच तितकी वर्षे झाली. थोडक्यात माझ्या पहिल्या पहिल्या पेशंटांपैकी एक तो. पेशंट म्हणून आला ते खरे. पण दर वेळी काही तब्येतीच्या कारणानेच तो येई असे नाही. कित्येकदा नुसते बोलण्यासाठीही येत असावा. कारण त्याला विशेष काही झाले नसेल तरीही तो येत असे. अगदी माझी फी भरावी लागली तरी. माझ्या परीने मी त्याचा डॉक्टर होतो.. त्याच्यासाठी बहुधा कुणी सल्लागार!

पेद्रू बहुधा एकटाच यायचा. पहिल्याप्रथम आला तेव्हा त्याला खोकला नि ताप होता. साधाच आजार. पण चारेक दिवस बरा झाला नव्हता. बहुधा असे आजार आपोआप ठीक होतात.

विशेष इलाजावाचून. डॉक्टरचे खरे काम हे असला आजार हा त्याच प्रकारातला आहे नि अन्य काही नाहीना एवढे शोधणे एवढेच. पेद्रू त्यामुळे दोन दिवसात बरा झाला. आणि त्याचा माझ्यावर विश्वास बसला पक्का. डॉक्टरकीत हा विश्वास डॉक्टरला पण एक बळ देतो. पण त्याच बरोबरीने पेशंट आपल्यावर विसंबून असला की एक जबाबदारी येते. पेशंट्सना ते कळू न देता ती निभवावी लागते. पेद्रूबरोबर तसेच झाले. एकदा आला नि वरचेवर यायला लागला. हळूहळू त्याची ओळख झाली. पेद्रू होता अंदाजे तिशीतला. पण अंगमेहनतीमुळे नि उन्हातान्हात केलेल्या कामामुळे वाटायचा चाळिशीतला. काळा कुळकुळीत. लुंगी नेसून यायचा. अंगात कधी शर्ट तर कधी टी शर्ट. बाकी कोळयांपेक्षा थोडा वेगळा होता. म्हणजे दारू निषिद्ध त्याच्यासाठी. बोलायला मोकळाढाकळा. किमान माझ्याशी तरी. बोटीवर जायचा मासेमारीसाठी. आठवडा दहा दिवस पत्ता नाही मग. परतला की मासोळीची कामे. असल्या कोळयांच्या कोळीणी तशा खंबीर आणि खणखणीत प्रकृतीच्या असतात. कामाला वाघिणीसारख्या. पेद्रूची बायको पण अशीच होती. यायची कधी त्याच्याबरोबर. पेद्रू न त्याची ती बायको.. कोकिळ नाव तिचे.. चांगलेच खुशीत असायचे. म्हणजे पेद्रूला बोलताना पाहून कोकिळ लाडाने पहायची त्याच्याकडे. नि तोही कौतुकाने तिला पहायचा. बाकी व्यसनी नवऱ्यांसमोर त्यांच्या बायका कावलेल्या असायच्या. त्याला ही अपवाद. आधी आधी ही त्यांचे नव्याने लग्न झाल्याची खूण होती असे वाटे मला. पण ते पुढे काही वर्षे गेली तरी टिकले. म्हणजे पार ती येईनाशी होईतोवर!

येईनाशी.. म्हणजे.. तशी ट्रॅजेडीच झाली त्यांची. पेद्रूला मूलबाळ नव्हते. त्याबद्दल कधी सल्ला घ्यायला यायचा. ते माझे फिल्ड नसल्याने मी नुसताच ऐकून घ्यायचो. एकदा म्हणाला, सर्व उपाय थकले! .. म्हणाला, "सगले जाले उपाय.. कसलाच गुन नाय.. तुला जमतं तर बग.." आपली नि बायकोची ही हिस्टरी देत म्हणाला तो.

"सगळे म्हणजे?"

"सगले.. सगले बुवा जाले.. मंत्र जाले.. जादूटोणा.. कुनाची करनी.. हिला मूल काय होइना.. आता शेवटचा इलाज.. डॉक्टरच्यान तरी काय होतय पाहू.."

हे छान होते! आधी सारे अंगारेधुपारे झाले.. तंत्र मंत्र झाले आणि नंतर त्याला आठवला तो डॉक्टर! माझे फिल्ड नाही ते तरी जमेल तशी मदत केली त्याला. म्हणजे आज वाटते तशीच राहिली असती तर आज ती असती या जगात. मोठ्या मुश्किलीने काही ट्रीटमेंट नंतर तिला दिवस गेले.

त्यानंतर एक दिवस पेद्रू मुद्दाम आला भेटायला.. गुड न्यूज द्यायला. म्हटले छान झाले. माझा सहभाग त्याच्या उपचारात फक्त त्याला योग्य त्या ठिकाणी पाठवण्यापर्यंतच. तरी मुद्दाम आभार मानायला आला. हे एक थोडे वेगळेच त्याचे. बहुतांश पेशंट्स काम झाले की डॉक्टरला विसरतातच. कुणी जिवापाड मेहनत करून वाचवला पेशंट तरी शेवटी हॉस्पिटलचे बिलच जास्त महत्त्वाचे असते पेशंटसाठी. कुणी.. 'फार मेहनत घेतलीत हो डॉक्टर तुम्ही.. म्हणून वाचला पेशंट आमचा' असले काही आभार समारंभासारखे भाषण करत नाहीच. 'गरज सरो वैद्य मरो' चा अनुभव नेहमीचाच.. आणि जितकी जास्त वर्षे जातील तितका दृढ होणारा. त्यात पेद्रूने मुद्दाम वाकडी वाट करून यावे याचेच मला आश्चर्य वाटले. तरी पेद्रूला म्हटले, "आता काळजी घे. त्या डॉक्टरनी सांगितले ते नीट ऐक."

हो म्हणून पेद्रू गेला. त्यानंतर आला तो दोन महिन्यांनी.. तो ही वाईट बातमी घेऊन. प्रेग्नन्सीच्या दुसऱ्याच महिन्यात ती गेली. बहुधा एक्टॉपिक असावी. पेद्रू हमसाहमशी रडत होता. त्याच्या एरव्हीच्या ओबडधोबड अवतारात तो इतका हळवा असेल असे कधीच वाटले नव्हते मला.

त्याची कोकिळ गेली आणि जणू पेद्रूचा आवाजच गेला. त्याची कोकिळ त्याचे सर्वस्व होती. एकदा तो त्यानंतर आला, म्हणाला, "डागदर.. मूल नस्ते तर चाल्ले असते.. माजी कोकिळ असती आज. तुला ठाऊक नाही डागदर.. मला न आय न बाप. होती ती एक बायको. ती खुश व्हावी म्हनून सारे. मी ना दारू प्यायचा ना शिग्रेट.. मी येकवार म्हनालो तिला.. नसले मूलबाळ मग काय झाले.. तू मला न मी तुला हायना. पन बाईची जात.. आई झाल्याबिगर नाय शांत होनार.. आता कायमची शांत झाली.."

पेद्रू रडला धाय मोकलून. त्याचे काय सांत्वन करणार होतो मी? झाले त्यात कोणाचीच चूक नव्हती. एक्टॉपिक प्रेग्नन्सीत वेळेवर पोहोचली नाही माता रूग्णालयात तर जिवावर बेतते तिच्या. तसेच झालेले. पेद्रू बोटीवर गेलेला. आला तोवर त्याची कोकिळ देवाघरी निघून गेलेली.

पेद्रू एकटा पडला होता आता. मध्येमध्ये काही कारण काढून यायचा. कारण नसताना मला त्याचा अपराधी असल्यासारखे वाटायचे. त्याची कोकिळ गर्भवती झालीच नसती तर.. जर तर ला आयुष्यात काही विशेष अर्थ नसतोच. त्यामुळे ह्याही जर तर ला नव्हताच. पेद्रूमध्ये आता लक्षणीय बदल होताना जाणवायचा मला. आधी बायकोबरोबर येताना आजारी असला तरी हसत असायचा. आता आजारी नसला तरी चेहरा पाडून यायचा. आधीचा हसरा पेद्रू हल्ली रडवा दिसायला लागला होता.

पुढे पुढे पेद्रू आपलीच सावली असल्यासारखा वाटायला लागला. हसू तर त्याच्या चेहऱ्यावरून कधीच मावळले होते. तो यायचा काही न काही तक्रार घेऊन. त्याला जुजबी औषधे दिली की बरा व्हायचा. नंतर नंतर त्याच्यात मला नैराश्याची, म्हणजे डिप्रेशनची लक्षणेच दिसू लागली. कुठल्याही औषधाने ते बरे होणार नव्हते. एकटेपणा किंवा खरेतर एकाकीपणा हाच

त्याचा आजार होता. एकदा आला तो अंगभर डास चावलेले त्याला. म्हणाला, "डागदर, लायटीचे बिल नाय भरत मी चार महिने झाले.. मच्छर चावून बेजार करतात."

"का नाही भरत बिल?"

"कुनासाठी? घरात गेलो की कोकिळ आटवते. अंधार असला की बरा.. जाणवत नाय.. अन बघायचे काय.. बिलच नाय भरत म्हणून.."

असा पेद्रू अंधाराच्या सोबतीने राहात होता. खाण्यापिण्याची काय आबाळ करून घेत असेल कोणास ठाऊक.

का कोण जाणे.. असल्या भानगडीत डॉक्टर म्हणून मी पडत नाही.. तरी न मागता सल्ला द्यावेसे वाटले मला. कारण त्याचा एकूणच जगण्यातला रस गेल्यासारखा बोलायचा तो. दिसायला पेद्रू वयाने मोठा वाटला तरी फारतर पस्तिशीत होता. फार वय उलटले नव्हते त्याचे. कदाचित परत लग्न केले तर.. तो  सावरेल असे वाटत होते मला. त्याच्या बायकोचे तर असेच गेले आयुष्य. हा असाच नैराश्यात राहिला तर? वाटले, कमीतकमी हा तरी वाचावा..

कितीही ओळख असली तरी असा सल्ला द्यायला कचरते जीभ. न जाणो तो याचा काय अर्थ काढेल? बोलू की न बोलू अशा चलबिचलीतच एक दिवशी पेद्रू येऊन उभा राहिला समोर. बरोबर एक तिशीतली बाई. म्हणाला, "कोकिळे, हा डागदर म्हनेल तसे करू.."

"काय म्हणणार मी?"

"डागदर, हिचे पन नाव कोकिळ. हिचा नवरा बोटीतून बुडून मेला. तिला पन नाय मूलबाळ. आन मला नाय बायको. हिला मी न मला ही सोबत असली तर बरोबर होईल की चूक?"

"अरे तुम्हाला दोघांना पटतेय तर.."

"तसं नाय डागदर. बरोबर की चूक? माझी कोकिळ मला प्रिय होतीच. हिला पन तिचा नवरा प्रिय असनारच. आता आम्ही दोघे एकत्र आलो म्हंजे.. त्यांच्यावर अन्याय तर नाय ना होनार?"

मी दोघांना बसवून घेतले. नशिबाने बाहेर वाट पाहणारे पेशंटही नव्हते. पेद्रूला म्हणालो,

"पेद्रू, तुला एक सांगतो.. आणि तुम्हालाही कोकिळाबाई, जगणाऱ्यासाठी जगू शकतो आपण.. पण मरणाऱ्यासाठी मरू नाही शकत. जेव्हा ते होते.. तुम्ही जिवापाड जपले त्यांना. देवाची करणी अगाध आहे. ते दोघे गेले.. तुम्ही उरलात. आता तुमचे वय ही फार नाही. पुढे सारे आयुष्य पडले आहे. आज अंगात रग आणि जोर आहे तोवर तर तग धराल. वय वाढले की हा एकाकीपणा सहन नाही होणार.."

"ही म्हनते, पन नवऱ्याची तिला खूप आठवण येते. त्याचाबिगर ती नाय जगू शकत.."

"तेच सांगतोय दोघांना मी.. मरणाऱ्यामागे मरता येत नाही.. अगदी मरणे हे जगण्याहून सोपे असेल तरी. एकमेकांना साथ देण्यात कसली आहे चूक? दोघे जा आणि एकत्र या. आपापल्या प्रियजनांना विसरू नका पण जीवन सुरू राहिलेच पाहिजे. आणि तुम्ही हसलात आज किंवा खुशीत राहिलात तर तुमच्या कोकिळेला आणि तुमच्या नवऱ्याला.. नाव ठाऊक नाही मला त्यांचे.. त्यांना नक्कीच बरे वाटेल. जिथे कुठे असतील ते.. तुमची अवस्था पाहून नक्कीच दु:खी असतील ते. चार क्षण आनंदाचे गेले तुमचे तर बरेच वाटेल त्यांना."

पेद्रूचे डोळे चमकले. आपल्या पहिल्या कोकिळेकडे पाहून हसायचा तसा तो हसला. कित्येक वर्षांनी त्याला हसताना पाहात होतो मी.

पुढे पेद्रू काही महिन्यांनी परत आला. चांगली बातमी घेऊन. त्याचे नि नव्या कोकिळचे लग्न झाले होते. दोघे आलेले. पेद्रूला थोडीफार सर्दी होती. तो तिच्याकडे पाहून हसत होता नि ती लाजत नि हसत होती. मी म्हटले, चला एक आयुष्य मार्गी लागले. तसे विशेष काही केले नव्हतेच मी. फक्त त्यांच्या मनातील दुविधा दूर केलेली. कदाचित एक डॉक्टर म्हणून माझा तो अधिकार असावा. पेद्रू बोलला नाही तरी त्याबद्दल कृतज्ञ असावा. आणि नसला तरी तो आनंदात होता तेवढे पुरेसे होते मला. माझा सल्ला वैद्यकीय नव्हताच. फारतर मैत्रीचा होता. मैत्रीचा तरी कसा म्हणावे? मी उच्चशिक्षित डॉक्टर.. पेद्रू अशिक्षित. तरी त्याला माझ्याबद्दल विश्वास होताच.. मीही कुठेतरी त्याच्यात गुंतलेलो होतोच मनाने. सारे ठीक झाले नि मी सुटकेचा निश्वास टाकला.

काही महिन्यांतच कोकिळला दिवस गेले. पेद्रू रडवेला होत आला माझ्याकडे. ही कोकिळपण आधीच्या कोकिळसारखी.. त्याच्या रडवेलेपणात हा प्रश्न होता. मी म्हटले, "पेद्रू.. तुझ्या आधीच्या कोकिळसारखी केस अगदी दहाहजारात नाहीतर लाखात एक.. यावेळी तसे काही होणार नाही.. घाबरू नकोस!"

कितीही नाही म्हटले तरी पेद्रूने नऊ महिने जीव मुठीत घेऊन काढले असणार.

त्यानंतर खूप महिने गेले. असाच तो, त्याची कोकिळ आणि त्यांचे कडेवरचे बाळ घेऊन भेटायला आला तो. नेहमीसारखा हसत.

"डागदर.. इंग्रजी येत नाय मला.. पन थ्यांक्यू बोलायला आलो.. दोघेही.."

"अहो.. दोघे नाय.. तिघे.."

कोकिळ बाळाकडे पाहात म्हणाली.

"आनि बाळाचे नाव काय डागदर.. पीटर.. हिच्या गेलेल्या नवऱ्याचे नाव ते.. माझी कोकिळ अन हिचा पीटर.. दोघे परत आले.. थ्यांक्यू डागदर. तुझ्यामुळे.."

पुढे पेद्रूचे डोळे भरून आले.

खरेतर यात माझा सहभाग फारसा नव्हता. एक मित्रत्वाचा सल्ला फारतर. खरेतर कॉमन सेन्सचा सल्लाच म्हणा. पण त्यामुळे पेद्रू नि नव्या कोकिळचे आयुष्य मार्गी लागले. पेद्रूसाठी कोकिळ आणि नव्या कोकिळसाठी पीटर.. दोघेही नजरेसमोर राहिले. आजही पेद्रू येतो. कधी कारण असताना तर कधी कारण काढून. त्याच्या पीटरच्या तब्येतीस पण माझ्यावर सोपवलेय त्याने.

डॉक्टर म्हणून पेशंट ठीक होताना पाहण्याचे आनंदाचे क्षण तर येत राहतात. पेद्रूचे आयुष्य वाया जाण्यापासून वाचवण्यास निमित्तमात्र ठरल्याचा आनंद काही वेगळा आहे!

----------

माझे डॉक्टर मित्र डॉक्टर झाल्याबद्दल कित्येकदा पश्चात्ताप करतात. खरा असेल किंवा खोटा ही. एकतर दहा पंधरा वर्षे शिक्षणात.. त्यात समाज आता डॉक्टरकडे संशयानेच बघू लागलेला. मला ही असे वाटत नाही असे नाहीच कधीकधी. पण डोळ्यांपुढे पेद्रू आणि त्याचा हसरा चेहरा आला ना की सारे विसरायला होते. वाटते याच साठी केला होता ना डॉक्टर बनायचा अट्टाहास.. त्याबद्दल पेद्रूचे आभार मानतो मी मनोमन!

# *सल्लूमिया!*

फुकटचे सल्ले वाटत फिरायचा काही लोकांचा छंदच असतो. म्हणजे सल्ले वाटणारी एखादी जमातच असावी. आजच्या काळातली पद्धत अशी की कोणताही निर्णय घेण्याआधी तारीख, वार, तिथि पहायला कॅलेंडर लागते. त्याच्या मागच्या पानावरचे 'हे करून पहा' हे अपौरुषेय वाङ्मय तुम्ही वाचले असेलच. 'बाळ रडत असल्यास तुम्ही गात असलेली अंगाई बदलून एखादे नव्या सिनेमातले गाणे म्हणून पहा' पासून 'शेवटच्या कार्यासाठी लागणारे मडके घेताना घासाघीस करू नका' अशा जन्मापासून मरणापर्यंत सर्व प्रसंगांसाठी टीप्स लिहिणारे हे महाभाग टिपू सुलतान कोण, कोणास ठाऊक. कदाचित दिसामाजि काहीतरी(च) लिहिण्याचा रामदासांचा सल्ला गंभीरपणे घेणारे कोणी तरी समर्थांचिये सेवक असावेत. असे सल्लेबाज तसे विरळा नाहीत.. भले ही ह्या विरळा शब्दाचा वापर हल्ली विरळा होत चालला असो! आणि अशा या सल्लेबाजांसमोर नुसते काही बोलायची चोरी की यांची सल्ला फॅक्टरी चालू होते. किंवा खरेतर बोलायचीही गरज नसते.. काही न विचारता ही यांची सल्लागाडी तुफान धावत सुटू शकते.

तर त्याचे नाव सल्लूमिया!

आमचा कॉलेजच्या दिवसांपासूनचा तो मित्र आहे. आमच्या चौकडीत तो थेट नसला तरी तिच्यात जाऊन येऊन असावा इतपत मैत्री होती त्याच्याशी ती तेव्हापासून. आणि सल्लेवाटपाची त्याची सवयही तेव्हापासूनचीच. आज त्या गोष्टीला कित्येक वर्षे झाली. कॉलेज सुटले.. आता पोटे सुटायची वेळ आली.. पोरं नोकरी नि घरदारात अडकली. तरी सल्लूमिया भेटत असतो अधूनमधून. बाह्यांगी बराच बदललाय तो. म्हणजे डोक्यावरच्या केसांनी कधीच त्याला टाटा

केलाय. हा केसांनी टाटा करण्याचा शब्दप्रयोग त्याचाच. पोट थोडेफार सुटलेय त्याचे. पण अंतर्यामी मात्र तो नाही बदलला इतक्या वर्षांनीही. म्हणजे अजूनही सल्लूमिया नाव सार्थ ठरावे असाच आहे तो.

त्याचे खरे नाव सलील सलागरे. त्याचा आम्ही आमच्या कॉलेजधोरणास अनुसरून 'सल्लूमिया' केला.. आम्ही कोणाचे काय नावाने बारसे करीत असू याचा अंदाज येणे मुश्किल. म्हणजे मी.. पद्म पवार. माझे नाव काय असावे? आणि का असावे? माझ्या नावाची व्युत्पत्ती समजावून सांगायची .. तर मला चिखल्या म्हणतात सारे! पद्म म्हणजे कमळ.. चिखलात उगवणारे म्हणून मी चिखल्या! तर आमचा एक कमल कदम नावाचा मित्र चक्क मॉडर्न ब्रेड म्हणून ओळखला जाई! कदम म्हणजे पाय .. म्हणजे पाव.. म्हणून ब्रेड!

तर हा सलील सलागरे त्याच्या सल्लागारीसाठी प्रसिद्ध होता. त्याचा सल्लूमिया झाला! येता जाता कार्य करता.. टपल्या माराव्यात इतक्या सहजतेने.. तो सल्ले देत फिरायचा.. आणि त्याच्या त्या देदीप्यमान सल्लागारीने त्याला सल्लूमिया नाव प्राप्त झालेले! त्या दिवसांत तो मागता वा न मागता सल्ले वाटत असे. आता तो काळ गेला. हा नोकरीस लागला, डोक्यावर मिऱ्या वाटायला बायको आली, दोन पोरे झाली. तरी हे महत्कार्य सोडले नाही त्याने! कॉलेजच्या दिवसातला तो याबाबतीत नाही बदलला. सल्लेवाटप ही भूतकालीन गोष्ट म्हणावी तर त्या भूतकाळाचे त्याच्या बाजूने अजून भूत होऊ दिले नाहीए त्याने. म्हणजे ते सल्ले वाटपाचे जीवितकार्य तितक्याच उत्साहाने अजूनही सुरू ठेवले आहे त्याने. कुणी मागो न मागो, हा चंपू वन्सं बनून तात्काळ सल्ला द्यायला सदैव तत्पर असतो. चंपू वन्सं! सल्लूमिया नामकरणाआधी त्याला आम्ही याच नावाने हाक मारायचो! मागे जुन्यापुराण्या मासिकांतून (होय.. तेव्हा मराठी मासिके नियमित निघायची.. अन् खपायचीही!) जनशिक्षणाचे(!) नि प्रबोधनातून समस्या निवारणाचे कार्य करणाऱ्या चंपूवन्सं सल्लूमियाच्या आदर्श असाव्यात. त्या मासिकात तरी

कुणीतरी प्रश्न विचारत असायचे. इथे तर कुणी विचारो की न विचारो, सल्ल्याची फॅक्टरी उघडून बसलेला असायचा हा.

हल्लीच भेटला. मी तसा घाईत होतो.

"काय कुठे?"

"सायनला .. मावशीकडे.."

"इथून पाच नंबर पकड.. साधी बस. उगाच लिमिटेडचे तिकीट कशाला. नाहीतर मुंबई दर्शन करायचं असेल तर एकशे सहासस्ट! त्याच तिकिटात निम्मी मुंबई फिरशील. थोडा उशीर होईल पण वेळ काय .. सांगून येते थोडीच!"

हा शेवटचा त्याचा पंच! असेल अर्थहीन, अस्थानी. पण असा अर्थाचा अनर्थक पंच हे सल्लूमियाच्या तोंडून कधीही बाहेर पडे.

"नाहीतर असे कर ना.. सरळ ट्रेन पकड. सर्वात फास्ट. म्हणजे स्लो ट्रेनच पकड.. मग फास्ट पोहोचशील! फक्त वेग हा सापेक्ष असतो एवढे लक्षात ठेव!"

"हुं"

"आठवतात ना काळ काम वेगाची गणिते?"

न आठवून सांगतो कुणाला?

"आता वेगात नाही निघालो ना तर काम अडकेल माझे.. आणि काळ.."

"काळ येईल रे.. वेळही येईल!"

बाप रे! हा वेळ भरल्याची गोष्ट करतोय की काय? मी अजून काही ऐकण्याऐवजी निघालोच. इतक्या वर्षांनी भेटलेला सल्लूमिया.. पण जित्याची खोड गेलेली दिसत नव्हती! कसाबसाच त्या सल्लाचक्रातून सटकलेलो मी. कारण खरेच घाईत होतो. पण सल्लूचे कौतुक वाटले मला. इतक्या वर्षात काहीच बदल नाही त्याच्यात. तेच सल्ले देणे नि अनर्थक काही बोलणे!

आज भेटला तर मला जुने दिवस आठवले त्याचे. तेव्हा तो स्वतःला कृष्ण समजायचा! गोष्टी सांगेन युक्तीच्या चार, अर्थात कामचलाऊ गीता सांगायचा तो एकेका अर्जुनाला शोधून काढून. आणि कॉलेजच्या त्या मॅडकॅप दिवसात अर्जुनांना कसला असणार तोटा! त्यामुळे याची सुलभ गीता प्रवचने सुरू असायची. द्विधा मनस्थितीत अडकलेले एकेक अर्जुन त्याच्या सल्लागारीच्या गारूडाने गार व्हायचे. अर्थात प्रत्येक सल्ला मागितल्यासच मिळे असे नाही. न मागता ही देई तो. कित्येक प्रेमकथांच्या प्रेमगाथा याच्याच सल्ल्यावर विसंबून लिहिल्या गेल्यात तेव्हा. तर परीक्षेतल्या युक्त्या पण हा बहाद्दर सांगायचा! याला स्वतःला त्या जमल्या असत्या तर स्वतः हाच कॉलेजच्या टाॅपर मध्ये नसता का? पण हा प्रश्न न त्याला पडला तेव्हा न आम्हाला! कॉलेज कँटीन मध्ये अड्डा जमवून सल्लूचे सल्लेवाटप चाले. अर्थात त्यासाठी मुद्दाम पोरं येत असे नाही. पण अड्डा जमला नि विषय निघाला न निघाला की याची गाडी सुरू होई. अजूनही त्या कॉलेज कट्ट्यावर बसलेला सल्लू आठवतो मला. त्याचे बहुतांश सल्ले दिलच्या तगाद्याबद्दल असायचे. 'दिलका तगादा' हा शब्द त्याचाच! कुणाला कसे पटवावे नि फिल्डिंग कशी लावावी हा हातखंडा विषय त्याचा. असे असूनही सल्लूनी स्वतःची मात्र नाही जमवली जोडी कॉलेजात. म्हणजे त्याला ती जमवता आली नसावी. कारण आमच्या ज्युनिअर मधली शिल्पा शितोळे त्याचा वीकनेस होती.

आपल्याच आयडिया मात्र कधी त्याने वापरल्या नाहीत स्वतःसाठी. त्याला एकदा विचारले तर म्हणाला, "मी कृष्ण! कृष्णाने प्रत्यक्ष युद्ध कुठे केले? अर्जुनाला मार्गदर्शनच केले.

जेव्हा जेव्हा कुणाला काही अडेल तेव्हा त्याला मार्ग दाखवण्यासाठी आहे मी!" अगदी 'यदा यदाही धर्मस्य'चे आपल्या सोयीनुसार रूपांतर करत म्हणाला तो.

तेव्हा तो तसा वारंवार दिसत असे. दिसत असे म्हणजे मीच शक्यतो त्याच्या तावडीत न सापडण्याचा प्रयत्न करत असे. तरीही कधी कधी भेटायचाच तो. वयानुरूप विषय बदलले. तेव्हा दिलाचा तगादा असायचा आता 'बिलाचा तगादा'! महिन्याकाठी बिले भरण्यात जीव मेटाकुटीस येतो. वर पोराबाळांच्या शाळा नि क्लासेस.. त्याच्या ॲडमिशन्स नि फिया.. त्यामुळे बोलण्याचे बदललेत विषय. त्यामुळे सल्लू भेटला की काही ना काही यातला विषय निघतोच.. नि याची रसवंती सुरू होते..

"क्लास? नो.. मॅथ्ससाठी दशपुत्रे बेस्ट.. तुझ्या छोट्यासाठी आताच नाव घालून ठेव.."

"अरे, लाइटबिल ना.. तिकडे एक छोटे यंत्र मिळते बसवून घे.. ग्यारंटीड.. बिल कमी व्हायलाच पाहिजे!"

"लायनीत कशाला? तिकीट काढायला जातोस.. गो बिटवीन टू टू फोर.. काय? गर्दी नसते तेव्हा!"

"गणफुले डॉक्टर? वेडायस का? त्यापेक्षा त्याच्याच दोन बिल्डिंग पुढे भडकमकरकडे जा. गणफुलेकडे गर्दीत म्हातारा होशील बसून बसून!"

"लायब्ररी? दिवाळी अंक हवेत? काय असते ते त्यात? उगाच विकत नको.. तिकडे सत्तर रुपयात चार महिने वाच!"

"पोरांना पोहायला शिकव रे बाबा. मुंबई बुडली पावसात तर पोहता तरी यायला पाहिजे."

"अरे, तो गायतोंड्या, पोरीचे लग्न करतोय म्हणे.. त्याला सांग तो देशलहरा हॉल चांगलाय.. केटरर पण ओळखीचाय माझ्या .."

"नॉनव्हेज कशाला? अरे एका प्राण्याने दुसऱ्यास का खावे?"

"कॉलेज बाबा घराजवळ बघ.. पोराकडे लक्ष राहिले पाहिजे .."

अशा सल्ल्यांची बरसात त्याच्याकडून होते हल्ली.

कॉलेजात आम्ही खूप जवळचे मित्र नसू ही पण आता तसे बऱ्यापैकी मित्र झालो आम्ही.

अलीकडे तर गप्पा मारायला भेटतो आम्ही. आधी टाळायचो त्याला, आता आवर्जून भेटतो. त्याची ती सवय तशी कायम आहे. पण मलाच सवय झालीय त्याची!

एके दिवशी त्याला विचारलेच मी,

"सल्लू, साल्या थकत नाहीस असा सल्ले देत देत?"

"तू कॉलेजपासून ओळखतोस मला. थकलोय कधी? पण सांगू आपला जमाना वेगळा होता."

"म्हणजे?"

"म्हणजे सल्ला देणारे होते, नि ते ऐकणारे किंवा ऐकून घेणारे ही होते. काहींना तर तो हवा ही असायचा. आज नव्या पिढीला काही सांगायला जावे तर.. तुला सांगू.. पोरं पण ऐकत नाहीत हल्ली.. इट्स माय लाईफ म्हणे! तुला गायतोंडेबद्दल बोललो ना.."

"त्याच्या मुलीचे लग्न आहे ना.."

"हुं.. मुलगा एक नंबर कामचोर.. आळशी. पोरीने स्वतः जमवलेय. गायतोंड्या गायीसारखा व्याकूळ चेहऱ्याने विनवत होता तिला.. पण त्याच गाढवाशी लग्न करायचे तिला.."

"हुं.."

"मला काय गाणं सुचलंय माहितीय.."

"गाणं? तुला?"

"हो.. का सुचू नये? अरे रोज सकाळी एफ एम गोल्ड लावत जा. सात ते साडेसात. पुन:प्रसारण रविवार दुपारी दोन ते अडीच.. ऐक नक्की..छान आयडिया मिळतात .."

"ते गाणं.."

"हां.. ती काय म्हणेल ना.. सपने में गधडा.. गधडे का सपना.. गधडेपे दिल आ गया.."

वा! छान आहे!

"छान कसले.. आपली पोरं पण हल्ली आपले नाही ऐकत."

सल्ले देणाऱ्यांची जमात असते तशी ऐकणाऱ्यांची पण असते की काय? आणि ती नष्ट होतेय की काय? झाली तर या सल्लूमिया नि त्याच्या बिरादरीचे काय होणार?

अजून काही वर्षांत सल्लूच्या सल्लागारीला पन्नास वर्षे होतील. कुणी मोठी व्यक्ती असती तर धूमधडाका केला असता अगदी सुवर्ण महोत्सवी. सल्लागार म्हणजे आजचे कन्सल्टंट लोक. लोकं लायनी लावून नि पैसे भरून सल्ला विकत घेतात त्यांच्याकडून. डॉक्टर नि वकील नि आणि कोण कोण. आणि हा सल्लूमिया आपला मोफत सेवा देत फिरतोय तर त्याचे कुणास नसावे कौतुक? पण पन्नाशी पर्यंत थांबावेच कशाला? पंचविशी तर झालीय! मी आणि माझे कॉलेजचे दोस्त भेटलो एकदा तर सल्लूचा विषय निघाला. त्यातल्या एका दोघांनी तर त्याच्याच 'सर्विसेस' वापरून आपली प्रेमनय्या तेव्हा पार लावलेली. त्यामुळे त्यांना त्याचे कौतुक फार अजूनही! त्यावेळचे ते दिवस आठवून अजूनही ते नॉस्टॅल्जिक होतात. त्यात आमचा मॉडर्न ब्रेड तर फारच. म्हणाला, "काहीतरी करूयात रे. सल्लू शूड फिल हिज वर्थ!"

"हो ना. कित्येकदा त्याने आपल्याला इरिटेट केलंय हे खरे.. पण ही हॅज अ क्लिअर हार्ट!" मी.

"तुझं काहीतरीच! हार्ट कधी क्लिअर असते का?".. हनीबी म्हणजे मधु बोरकर!

"अरे हा इंग्रजीचा क्लास थोडीच आहे.. हार्ट नाहीतर हार्टाच्या आर्टरी क्लियर असतील त्याच्या. महत्त्वाचे हे की वुई शुड डू समथिंग!" मॉडर्न ब्रेड चे उत्तर .. तेही वाघिणीचे दूध घालून!

"ब्रेडा.. ब्रेडा किती रे इंग्रजी फाडफाड फाडशील? लेका कॉलेजात असताना असा फाडफाड बोलला असतास..तर ती पारशाची सुबक ठेंगणी रोशन चाबीवाला नसती पटली तुला?" काळुराम म्हणजे शांताराम सावगावेची मल्लीनाथी!

"अरे उगाच फाडफाड फाटे नकोत फोडायला.. विचार करा.."

मी सगळ्यांना शांत करत म्हणालो.

शेवटी ठरले ते एक.. सल्लूमियाचा एक छोटेखानी सत्कार करायचा. आम्ही सारे आणि तो. अजून काही त्याच्या सल्ल्याने गार झालेले. साऱ्यांना बोलावून सल्लूमियाचे आभार मानायचे!

शेवटी तो दिवस आला.

सल्लू आधी यायला आढेवेढे घेत होता. म्हणाला, "ती जित्याची खोड रे. मी ना डॉक्टरकडे गेलो ना की डॉक्टरलाच सल्ला देऊन येतो! कुणी विचारो न विचारो माझा सल्ला तयार असतो. लोक त्यासाठी मला टाळतात माहितीय मला.."

मी म्हणालो त्याला, "त्यातला शब्द न शब्द खराय. आम्हीदेखील कमी टिंगल नाही केली तुझी. पण सल्लागारी म्हणजे परकाया प्रवेश! सह अनुभूती. त्याशिवाय असले काही होऊ शकतच

नाही. त्यामुळे कौतुक तुझे. आपल्या माणसाचे कौतुक आपणच करायला हवे. ते राजकारणी बघ, स्वतःच स्वतःला ग्रेट म्हणवून घेतात.. हो की नाही?"

"ते एक खरेय रे. आपलेच ढोल पिटण्यात कोणी हात नाही धरू शकणार त्यांचा.."

"पटले ना तुला.. सगळ्यांनी ठरवलेय रे. ब्रेड तर म्हणतो.."

"ते राहू देत.. ठीक आहे, तुम्ही म्हणताय तर, पण मी काय सांगतो ते ऐक, हे बघ आपण ते सारे त्या बेरडाच्या घरी करू.."

बेरड म्हणजे बेरड्या.. म्हणजे बबन बेर्डे!

"त्याची गच्ची रिकामीच असते. आणि नंतर खायला समोसा नि वेफर्स. आमच्या इकडे वेलकम स्टोरमधे बेस्ट! उगाच जास्त खर्च नको. कोल्ड ड्रिंकच्या दोन लीटरच्या मागवू बाटल्या. स्वस्त पडतील. नि हार बिर लागणार असेल तर आमच्या ऑफिसमागे आहे माळी. ताजा आणून देईल. नाहीतर रात्री मी घेऊन येईन. फ्रीजमधे ठेवून देऊ! आयत्या वेळी टवटवीत हार नसणे म्हणजे सगळया आयोजकांची हार रे!"

वा! सल्लूमिया स्वतःच्याच सत्काराचा हार आणायला निघालाय आणि त्याच्या प्लॅनिंगबद्दल सल्ला तयार आहे त्याचा! सल्लूची खोड काही जाण्यातली नाहीच आहे!

बेरडाच्याच गच्चीत जमलो आम्ही. सल्लूमिया सहपरिवार आला होता. सत्कारमूर्ती कसला, त्याच्या गळयातला हार त्याच्या गळयात पडेतोवर खुर्च्या मांडणे, पंखे लावणे इ. सुरू होते त्याचे. भाषण ठोकायला कुणी उभा आहे नि तोवर हा कोणाला बोलावून कानात काही सांगतोय!

आमच्या मित्रांची पण कमाल .. चांगलीच भाषणे ठोकली!

ब्रेड म्हणाला, "मी आज जो काही आहे तो या सल्लूमिया मुळेच! नाहीतर लास्ट इयरला पेपर सुटला नसता! आणि त्याची वहिनी .. ती देखील हे मान्य करेल!"

तर खुद्द बेरड म्हणाला, "या सल्लूची कमाल आहे.. तो प्रत्यक्ष स्वतःच्या बायकोलाही सल्ला द्यायला धजावतो.. म्हणजे गडी पुरता कामातून गेलाय म्हणाना!"

अशी अजून भाषणे झाली. हार आला. गंमत म्हणजे तो फ्रीजमधून किमान तीन तास आधी काढून ठेवा नाहीतर ज्याच्या गळयात घालाल तो पडेल थंडगार! हा सल्ला खुद्द सल्लूमियानीच देऊन ठेवलेला आम्हाला!

सत्काराला याने उत्तर काय द्यावे?

सगळयांची बोलण्याची हौस भागली नि सल्लू उभा राहिला ..

आभार नि धन्यवाद असली औपचारिकता सोडून खणखणीत भाषण सुरू केले त्याने.. गळयातला हार बाजूला ठेवत..

"आज आपण सगळे जमलो आहोत तर मी हे सांगितलेच पाहिजे .. तुम्ही असा कार्यक्रम दरवर्षी आयोजित करा. मी स्वतः जातीने मदतीला हजर असेन. आलटून पालटून आपण आपल्यातल्याच एकाचा सत्कार करत जाऊ! आणि माझी सूचना आहे, शाल आणि श्रीफळापैकी शाल ही फिरती ठेवावी. मला दिलेली ही शाल मी सांभाळून ठेवीन.. ज्याचा कुणाचा सत्कार करायचे ठरेल, त्याला ती पास करावी अशी माझा सूचना आहे! आज आपण इथे सारे जमलो आहोत तर माझी विनंती आहे, वेलकम स्टोर्सचा समोसा खाऊन पहावा. आवडल्यास पुढील कार्यक्रमात त्याचीच ऑर्डर देता येईल. तसे मी त्यास सांगून ठेवले आहे. हा हार पुढील वर्षी चालणार नाही. माझी सूचना अशी आहे की यापुढे आपण कृत्रिम फुलांचा हार घेऊन ठेवावा.. म्हणजे पुढील सत्काराला तोच वापरता येईल! हा कार्यक्रम या गच्चीत केल्याने एक गारवा जाणवतो आहे इथे.."

सल्लूमियाच्या तडाखेबंद भाषणाचे तडाखे बसले सगळयांनाच! तो अजूनही सल्ला मोड मधून बाहेर येण्यास तयार नव्हता. गच्चीतला गारवा कसला.. त्याच्या भाषणाने आम्हीच गार झालेलो!

आज सल्लूमिया आहे तसा आहे नि आहे तिथेच आहे. सल्ला देणे सोडले नाही त्याने. त्याच्याच सल्ल्यानुसार दरवर्षी काही कारण काढून असा कोणाकोणाचा सत्कार समारंभ होत असतो. आणि हा नवनवीन सूचना करत असतो!

इतक्या वर्षात दोस्ती छान पिकलीय आमची. कॉलेजात विचित्र वाटणारे एकेकाचे स्वभाव, आता तेच विशेष वाटायला लागलेत. अगदी आडून आडून का होईन एकमेकांचे कौतुक वाटायला लागले आहे आम्हाला. सल्लूमियाची सल्लागारी आता खुपत नाही. त्याला त्याच्या या स्वभावासहित स्वीकारलेय आम्ही. अजूनही आम्ही त्याची तशीच टिंगल करतो पण त्यात पूर्वीच्या सारखी टवाळी नसते तर एक कौतुकमिश्रित चेष्टा असते. अर्थात सल्लूमियाला त्याचा काय फरक पडणार म्हणा!

तो आपला 'सल्ले पे सल्ले देते चलो.. सल्लोंकी नदिया बहाते चलो' म्हणून मजेत सूचना करत असतो. म्हणतो, "अरे वेळेवर माणसाला चांगला सल्ला मिळाला तर त्याच्या आयुष्यात किती फरक पडतो.. वेळेवर मिळाला पाहिजे.. नाहीतर.. वेळ काय कधी कुणाला सांगून येते?"

## *कलाकार!*

मधू मलुष्टे. नाव तेच असले तरी पुलंच्या म्हैस मधल्या मधू मलुष्ट्याशी याचा संबंध नाही. एकासारखी एक दिसणारी माणसे असतात तर एका सारख्या नावाची का असू नयेत? तर ते एक असो.

मधू माझा मित्र. कॉलेजातला. माझ्या नि त्याच्यात साम्य विशेष नव्हते .. पण आम्ही चांगले दोस्त होतो.

आमचा मधू मलुष्टे हाडाचा कलाकार. हाडाचा कलाकार का.. तर असे म्हणायची पद्धत असते म्हणून. नाहीतर त्याच्या देहातील हाडे दिसणे मुश्कील. लठ्ठ माणसांचे स्थूलमानाने गुबगुबीत म्हणजे जाड्या, गरगरीत म्ह. वाटोळा, थुलथुलीत किंवा ढोल्या असे प्रकार असतात. मधू गुबगुबीत प्रकारात मोडणारा. आणि मी सिंगल फसली! तर ते ही एक असो.

मधूने कलेची सेवा करण्याचा वसा घेतलाय. नाही, कलेची सेवा करीत असला तरी कला म्हणजे त्याची पत्नी नाही. ही कला म्हणजे ज्याला तुम्ही आम्ही मराठीत आर्ट म्हणतो ती. जात्याच कलाकार तो. कलेची सेवा करण्यासाठी हा रंगभूमीवर पोहोचला. रोल छोटा की मोठा याची त्याने कधीच पर्वा केली नाही.. कारण तो नेहमी छोटाच असायचा. काही असले तरी पठ्ठ्या मागे हटायचा नाही. घरचा बरा, खाण्यापिण्याची ददात नाही. तेव्हा मिळणारा पैसा तसा दुय्यम. तिथून मग मराठी सिनेमात पोचला. एखाद्या हीरोच्या नोकराच्या हाताखाली साइड किक. किंवा नोकर, वेटर असले फुटकळ रोल. त्याला कित्येकदा आपल्या 'स्थूलमाना'चे वाईट वाटे. कारण

हीरो हीरॉईन मागे नाचणाऱ्यांची मोठी फौज लागते. त्याच्या आकारमानाने तो दोन नाहीतरी दीड माणसांची तरी जागा व्यापीत असे. आणि नाचायचे तर त्याचे गुबगुबीत हात पाय तर हलले पाहिजेत ना? त्यामुळे नाचातले रोल्स कटाप झाले आपोआप त्याच्यासाठी. पुढे मात्र मजल दरमजल करत हिंदीत मजल मारली त्याने.. ती काही हिंदी सिनेमांच्या मॉब मध्ये!

सिनेमात पुढे जायला खूप ओळखी लागतात म्हणे. म्हणजे असे ऐकून आहे. नाहीतर माझ्यासारख्या पापभीरू मध्यममार्गी मध्यमवर्गीयास काय कळते त्यातले? मधू सांगतो कधीमधी. पण मी याबाबतीत त्याच्या अगदीच विरूद्ध. त्यामुळे या सगळयापासून मी नेहमीच दूर होतो. पण विशेष ओळख नसताना ह्या मॉब सीन मधून मधूला हिंदीतल्या कोणी हेरले. हे मधूनेच सांगितले मला. म्हणाला, "प्रॉब्लेम झालाय यार.. बोलावणे आलेय.. हीरो म्हणून!"

"त्यात प्रॉब्लेम तो काय..?"

"प्रॉब्लेम तो काय काय विचारतोयस? अरे, प्रॉब्लेमच प्रॉब्लेम!"

पुढच्या कथेआधी मधूची काही स्वभाव वैशिष्ट्ये सांगितली पाहिजेत. आणि त्या आधी मधू मलुष्टेच्या जीवनाची कहाणी अति थोडक्यात का होईना समजून घेतली पाहिजे. मधू लहानपणापासूनच जरा हेवी वेट. त्याच्या वजनामुळे त्याला शाळेत सारे चिडवीत. म्हणून जास्त खॆळणे नाही. पोरे हसतात म्हणून त्याचा आत्मविश्वास कमी. हाच स्वभाव पुढे भिडस्तपणाकडे झुकला तर नवल नाही. पण असे असले तरी लहानपणापासूनच तो स्टेजवर नकला मात्र करी. शाळेच्या नाटकात तो नाही असे कधीच झाले नाही. कॉलेजात ही हेच सुरू राहिले. आणि त्याच्या अभिनयावर चक्क रेवती म्हात्रे नावाची कन्यका भाळली. कॉलेजची तीन वर्षे तो स्टेजवर नि रेवती त्याच्या आगे मागे. मधूचा आत्मविश्वास त्यामुळे तेव्हा बळावला खरा, पण कॉलेज संपले नि

रेवतीच्या घरच्यांनी तिचे लग्न लावून दिले. मधू तेव्हापासून विरक्त झाला. मुलींपासून आधीही दूर होताच.. एक रेवती सोडून. तो अधिकच दूर झाला आणि त्याच्या व्यक्तिमत्वालाच विरक्तपणा अधिकच घट्टपणे चिकटला. तर त्याची थोडक्यात पार्श्वभूमी ती अशी.

आता जरा थोड्या लाइट मुद्द्याकडे वळू. ह्या हिंदी सिनेमातल्या मॉब मध्ये मधू उठून दिसणे साहजिकच होते.. बाकीच्या एक्स्ट्रांमध्ये एवढा गुबगुबीत कोणी नसणारच. एकतर सारे एक्स्ट्रा पोटापाण्यासाठी काम करणारे नि अजून कुठे बरा रोल नि त्याहून खरेतर पैसा मिळतो का याची आशाळभूतपणे वाट पाहणारे. मधू या उलट! खराखुरा रंगकर्मी सेवाधर्मी हा एकटाच असावा. खाऊन पिऊन सुखी. भले तो कॉलेजात हीरो असेल नाटकातला, पण इथल्या नाटक सिनेमाच्या दुनियेत मात्र अगदी फुटकळ रोल वर बोळवण होत आलेली आजवर. तर अशा ह्या मधूला त्या मॉब मधून घेलाशेट पटेल नी हेरले आणि दुसऱ्या दिवशी मधूला फोन आला शेटजींचा. आता 'ते एक असो' नाही म्हणता येणार, कारण मूळ कथाच आणि मध्याचा प्रॉब्लेम.. त्याबद्दलच आहे!

पण त्या आधी घेलाशेट प्रकरण बघू. हे प्रकरण  मधूने नाही सांगितले मला. मीच कुठून तरी माहिती मिळवली त्याची. या घेलाशेटचे अनेक उद्योग. आणि धंदे देखील. त्यातील एखादा उद्योग म्हणजे हा सिनेमा बिनेमा बनवणे. हिंदी सिनेमा प्रोड्यूसर म्हणून डोळयापुढे कोणी चेहरा आपण कल्पना करू त्याच्या अगदी विरूद्ध. धोतर आणि पायात करकर वाजणाऱ्या चपला. वर पांढरा सदरा. हातात नेहमी एक चामड्याची बॅग. आणि त्यात चेन स्मोकर. कोणाला वाटेल त्याचा ब्रॅंड कोणी विलायती असेल, तर नाही. घेलाशेट संपूर्ण स्वदेशी! संभाजी छाप बिडी. रोज चार पाच बंडले संभाजी छाप. त्या धूम्रवलयात खोकला काढीत कधी लाखाचे बारा हजार करतो

याचा विचार सदैव डोक्यात. मराठी सिनेमाला पंधरा लाखांचे अनुदान मिळतेय हे ऐकून घेलाशेटचे डॉळे तेव्हापासूनच लकाकलेले. हा योग मात्र अजून आलेला नव्हता. काही लाखांत सिनेमा, काही लाखांचे अनुदान. प्रचंड तोटा झाला की घेलाशेट खूश. ह्याला तो टॅक्स प्लॅनिंग म्हणत असे. तर हे एकसुद्धा असो. त्यादिवशी बिडी फुंकता फुंकता घेलाशेटला वाटले की काही हातपाय तर हलवावेच. नि समोर हा मॉब मधला मधू नजरेस पडला असावा. असा गुबगुबीत हीरो घेतला तर सिनेमाला तोटा होणे सोपे एवढा हिशेब मांडून त्याने मधूला फोन केला असावा.

मधू सांगत होता.. त्याला घेलाशेटचा फोन आला..

"तू मधू मलुस्टे बोलते? मी पटेल."

"कोण पाटील?"

"नथी घाटी पाटील नथी. हूं पटेल..  घेलाशेट पटेल."

"हां, काय काम?"

"सांभळ. हूं एक प्रोड्यूसर छूं. प्रोड्यूसर एटले निर्माता. कोने की गुडिया आमचेच पिच्चर. आमाला एक सिनेमासाठी तू जोईए."

"हिंदी?"

"नथी बच्चा .. ते घाटी. मराठी. हीरो जोईए."

"ओ.के. कोणाचा नंबर देऊ? महेश? सचिन, भरत?"

"नथी. नथी. तूज जोईए"

"मी?"

"हां हीरो, मधू मलुस्टे.. काय पर्सनालिटी.. आपन खूश. हिरो केवू जोईए.. खातापिता मंगता के नै?"

मधू सांगत होता.."घेलाशेट बोलला नि मी ऐकतच राहिलो. कोने की गुडिया की रोनेवाली चिडीया? कधी नाव काही ऐकल्याचे आठवत नाही. काही असो. घेलाशेट तर घेलाशेट. मी लीड रोल ! हा मधू मलुष्टे हीरो!"

मधू खूश न होता तरच नवल. आरश्यासमोर त्याने वेगवेगळया कोनांतून पाहून घेतले असावे. कुठल्या कोनातून मी सलमान नाही तर शाहरूख नाहीतर अगदीच उदय चोप्रा किंवा तुषार कपूर तरी वाटतोय? की चक्क अभिनय क्षमतेमुळे? त्यापुढे सारे काही दुय्यम?

मधूचा पतंग उंच उडू लागला. पटेल बॅनर्सचा भव्य सिनेमा. हीरो मधू मलुष्टे. की नुसतेच मधू लावू? मधू म्हणजे कोणाला हीरॉईनचे तर नाहीना नाव वाटणार? नको. त्यापेक्षा मलुष्टे घराण्याचे नाव मोठे करावे. काही वेळाने त्यालाच हा खयाली पुलाव शिजवायचा कंटाळा येऊ लागला.

पटेलशी त्याची भेट झाली तेव्हा तो उगाच मला घेऊन गेलेला. सिनेमाची दुनिया म्हटले की आधीच भीती वाटते मला. काय काय ऐकून असतो आपण. मधूपण थोडा बावरला असावा.

म्हणून मला घेऊन चालला असणार. मी म्हणालोही त्याला, "मध्या.. मी काही तुझ्या अध्यात मध्यात नाही पडणार!"

"तू ये तर बरोबर! तो पटेल काय खाणारे तुला?"

तसा तुलाही खाणार थोडीच आहे.. असे अगदी जिभेवर आलेले शब्द मी गिळून टाकले नि निमूटपणे जायला तयार झालो. कोण जाणे कुणी मोठा स्टार झाला तर सांगायला होईल स्टोरी!

आम्ही गेलो पटेलच्या छोट्या खोली कम ऑफिसात. विडीचा धूर खोली भर. वर गरगरणारा पंखा. पहिल्याच झटक्यात मधूला ढास लागली.

"मधू, तू काम करेल ना डीकरा. मस्त सिनेमा बनवू. तू हीरो."

"स्टोरी मिळाली असती तर.. तयारी केली असती रोलची."

"स्टोरी स्टोरी काय करते तू? ती काय कदीबी लिवून घेते मी. कोणी हिरोईन जोईये. तू काय फिल्मचा हीरो. तुज्या मागे फिरतात की न्हाय पोरी?"

हीरॉइन? शब्द ऐकताच मधूच्या अंगावर काटा आला. अगदी घामच फुटला. आजवरच्या रोल मध्ये त्याला कधी हीरॉईन मागे जावे लागले नव्हते. आणि आता हा पटेल.. हीरो म्हटले की हीरॉईन आलीच. जाऊ देऊ चान्स? पण परत कधी मिळेल? कोने की गुडीया असेना का कोण्या पटेलचा कोणी बंडल सिनेमा पण सिनेमाच आहे तो. आणि मी हीरो. पहिले स्टोरी बघू नि मग ठरवू.. असा विचार करत मधू गप्प राहिला. घेलाशेट मग स्टोरीचा विचार करायला लागला.

"ज्यो.. हल्ली मार्केटमां शुं चाले छे? शुद्ध देसी घी जेवा शुद्ध रोमान्स.. त्या स्टोरीत हीरो नि हीरॉइन मुकवानू. पकाव खिचडी. केटली मज्जा.. मज्जा नुं बध्धा.." हे म्हणता म्हणताच त्याला टायटल सुचले.. "प्रेमाची गंमत.. हीरो अने हीरॉइन कॉलेजमां. बन्ने भांडतात. मंग हीरो हीरॉइन

पिकनिकमां. तिथे हीरॉइन डोंगरथी खाली. हीरो तिला वाचवतो. मंग झगडुं खलास अने प्रेम चालू. बे चार लव्ह सीन. पिच्चर हीट नाहीतर सुपर हीट. एकदम ओरिजिनल आयडिया नि स्टोरी. हवे कोणे लेवानुं लखवा माटे?"

स्वस्तात नाहीतर फुकटात कोण मिळेल? हा प्रश्न असावा खरा पण प्रकट नाही विचारला शेटजीनी.

"मधू, तुला पण थोडे पैसे देऊ हां.. फोकटमां काम सारू नथी लागे ने. हवे हीरोईन क्या मळसे? ज्यो ने.. तू इत्ता चिकना चुपडा.. पोरीलोग फिरते तुज्या आगळ पाछळ.."

मध्याचा अर्धा उत्साह हीरॉईन म्हणताच खलास झाला. नि हा घेलाशेट त्यालाच हीरॉईन शोधायला सांगत होता!

आम्ही परत आलो. मध्या शांत होता. एकीकडे हीरोचा रोल आणि त्यात अपरिहार्यपणे येणारी हीरॉईन! इकडे आड तिकडे विहीर म्हणावे तर तसेही नाही. रोल सोडावा तर परत कोण नायक बनवणार? आणि चुकून चालला सिनेमा तर कुणी सांगावे ..

पटेलनीच मग नायिका पण हेरली. मॉब मध्येच.

मध्या सांगत आला, "हीरॉईन कोण माहितीय? कार्तिका!"

काही दिवसांत मग मधू आणि प्रोड्यूसर पटेलची परत भेट झाली.

"काय रे, तू काय ते अजून मॉब मंदी काम करते अजून. हीरो हाय तू की नाय? हीरो नी केवू हीरो जेवूज रहेवु जोए!"

एका मॉब शुटिंग नंतर मधू डायरेक्ट पटेलच्या धूम्रसंपृक्त ऑफिसात आला होता.

"जो हवे स्टोरी.. फायनल"

आपल्या स्टोरीची ओरिजिनल आयडिया पटेलनी सांगितली.

"अने हिरोईन पण फायनल. कार्तिका. कार्तिका अने मधू नी जोडी. हवे स्टोरी अने डायलॉग लिव्हून जाला की शुटिंग शुरू."

एक तर कुणी हीरॉईन, त्यात ही कार्तिका ! तिचे नाव ऐकूनच मधूला टेन्शन. आपल्यासारखे मध्यममार्गीय या फिल्मस्टार लोकांबद्दल जो काही विचार करतात त्या गुणांची पुतळी कार्तिका ! आता त्यात तिच्याबरोबर लव्ह सीन?

"मजाय बेट्या तुझी. काय हीरॉईन भेटलीय.."

"चूप रे.. टेन्शन इकडे.. स्टंट सीन्सचे!"

"अरे स्टंट सीन्सला डुप्लिकेट असतात. कसली काळजी तुला?"

"सांगतो नंतर."

मग मधू परत त्या धूर भरल्या ऑफिसात गेला. मधू काही बोलणार त्या आधी पटेल म्हणाला,

"मधू तू काय पन बोल.. तुला थोडा तरी पैसा घ्यावाच लागेल हां डिक्रा.. फोकट काम बरे नाही वाटते ना मधू?'

स्वस्तात हीरो पदरी पाडून घेण्याची कंजूस पटेलची ही पद्धत. मधू काही बोलला नाही. त्याला घेलाशेट बद्दल जे काही कळले ते एवढेच की घेलाशेट पैसे बुडवण्याबद्दल प्रसिद्ध आहे. एवीतेवी न मिळणाऱ्या पैश्यांबद्दल कशाला वाद घाला? आणि त्यात त्याला खरे टेन्शन कार्तिकाबरोबर लव्ह सीन्सचे स्टंट्सचे.

"घेलाशेट, स्टंट्स साठी डुप्लिकेट?"

"मळसे. ते ऍक्सिडेंट होते तेव्हा हीरोईन डोंगरसून पडते. हीरो वाचवते तिला. स्टंटले घाबरते तू?"

"कुणीही घाबरेल शेटजी."

"अरे सादा स्टंट रे.. पन तू घाबरते कशाला .. भारी डुप्लिकेट आणून टाकते काय?"

"तो स्टंट नाही शेटजी. लव्ह सीन बद्दल बोलतोय मी."

विरक्त मधूला यासाठी हवाय डुप्लिकेट!

घेलाशेट काय करणार? त्याला अनुदान हवे, फुकटातला हीरो हवा आणि सिनेमा आपटल्यावर मिळणारा फायदाही हवा. मधूला पण हीरो म्हणून झळकण्यासाठी ही एकमेव संधी. कोणास ठाऊक सिनेमा चालला बिलला तर करियरच धावू लागेल.

बाकी काही असो, प्रेमाची गंमत मात्र झालाच तयार अगदी डुप्लिकेट घेऊन का होईना. पोस्टर्स लागली. थोड्याफार जाहिरात आल्या. आमच्या नंदाखाल गावात त्याचे मोठ मोठाले फोटो नि कट आऊट्स लागले. बाकी कुठे होवो न होवो.. आमच्या गावात मधू प्रसिद्ध झाला चांगलाच. चार आठ दिवस पोरं पोरी त्याचा ऑटोग्राफ घ्यायला मागे धावायला लागली त्याच्या. तो ही आढेवेढे न घेता देत सुटला सह्या!

म्हणाला, "अगदी सह्याजीराव करून टाकलाय मला पोरांनी!"

सिनेमा कधीतरी थिएटरात आला. आमच्या गावचे लोक नि हीरो हीरॉइनच्या घरच्यांनी पहिल्या दिवशी पहिला शो पाहिला. मी हीरोच्या बाजूला बसून भाव खाऊन घेतला. पुढे काय? पुढे दुसऱ्या दिवसापासून नाही .. दुसऱ्या शो पासूनच थिएटर ओस पडले!

घेलाशेट पटेल एकाचवेळी नुकसान आणि त्यातून होणारा फायदा यामुळे खूश झाला. मधूपण खूश! मलुष्ट्यांच्या घराण्यात तो पहिला सेलेब्रिटी झाला. मग तो सिनेमा कोणी पाहिला काय नि न पाहिला काय, काय फरक पडतो? प्रेमाची गंम्मत तर झालीच ना?

कलाकार मधू आता दुसऱ्या कुठल्या रोलच्या शोधात आहे! तेवढे लव्हसीन्ससाठी डुप्लिकेट घेतले तर तयार आहे पठ्ठ्या अगदी हीरो बनून कलेची सेवा करायला!

## *शारंगबाई*

ताडोबाच्या गर्द जंगलात शारंगबाई आल्या अन रान उठल्यागत झाले. बाई राजघराण्यातल्या. आता तो तोरा फक्त उरलेला. कुणी म्हणावे ना.. काप गेले नि भोके उरली तसे काही. पण बाईंच्या डोक्यातील राजघराण्यातील हवा अजून शिल्लक होती. मिजास अन तोरा अजून बाकी होता. आपल्या पूर्वजांची ऐट दाखवायची संधी बाई सोडत नसत. आपल्या आधीच्या पिढ्यांनी केलेल्या शिकारीच्या कहाण्या आठवत बाई सर्वांवर आपला रूबाब जमवून होत्या. येणाऱ्या जाणाऱ्यास त्या गोष्टी ऐकवत बसत नि जणू नरभक्षक वाघाची शिकार आपणच केली अशा समजुतीने शिकारीच्या कथा सांगत बसत. ऐकणारे ही राजघरातील बाईंच्या उत्साहास उगाच कशाला व्यत्यय म्हणून ऐकून घेत. कुणी खोडसाळ असेल तर बाईंच्या पायाशी हळूच झुरळ आणून सोडे.. आणि नरभक्षक वाघाच्या शिकारीची गोष्ट सांगता सांगता बाई त्या झुरळाच्या दर्शनाने तीन ताड उडत.

खूप दिवसात जंगलदर्शन झाले नाही म्हणून आज बाई निघाल्या होत्या. पूर्वी सारे घोड्यांच्या पाठीवरून रपेटी मारत. एकदा तर रावबहादुरसाहेब उगाच रात्रीच्या जेवणानंतर कसे बाहेर पडले घोड्यावर नि जवळच्या बंदुकीने एकट्यानेच कशी शिकार केली याचीही आठवण येई त्यांना. संस्थाने जशी खालसा झाली तशीच आपली शान देखील झाली हे माहित असूनही बाई ते मानावयास तयार नव्हत्या. आणि त्यांचे यजमान.. वाघोली संस्थानाचे युवराज अजयसिंगराजे वाघ- भोसलेपाटील.. ते बाईंच्या शब्दाबाहेर नव्हते. बाई म्हणाल्या चला, की निघालेच ते.

जीप आली आणि बाई टुणकन चढून बसल्या. पाठोपाठ अजयसिंगराजेही बसले. हातात त्यांच्या नुसतीच शोभेची असावी अशी डबलबॅरल लांब नळीची बंदूक आणि गळयात चांगला भारीपैकी निक्कॉन कॅमेरा. हल्लीच युवराजांनी नवीन घेतलेला तो. अजयसिंग राजे मनातून थोडे भेदरट पण मुक्या प्राण्यांवर दया करावी या भूतदयेच्या तत्वाआड लपवलेला त्यांनी तो भेदरटपणा. त्यामुळे शिकार आणि शिकारी यांबद्दल अजयसिंगांचा खरा छत्तीसचा आकडा. तरीही उगाच बाईंच्या आग्रहाखातर ती न चालणारी बंदूक हाती घेतलेली. बंदुकीच्या शुटिंगपेक्षा कॅमेरातले शूटिंग आवडते त्यांना. विशेषत: जंगलातल्या रंगीबेरंगी पक्ष्यांचे फोटो. बाई बाता मारत पण तशा शिकारी नव्हत्या.. नुसत्याच  शिकारी स्वभावाच्या होत्या. त्यामुळे याबाबतीत नुसत्या छर्र्यांनी उडत्या पाखरांस मारणे त्यांच्या आवडीत बसत नसे. कदाचित जिथे वाघ मारला तिथेच आज कबुतरे मारण्याची पाळी यावी याचे वैषम्य असेल. पण अशी पक्ष्यांची शिकार नावडे त्यांना. अजयसिंगांच्या महागड्या कॅमेरातले रंगीबेरंगी पक्ष्यांचे तितकेच रंगीबेरंगी फोटो मात्र त्या अभिमानाने सर्वांस दाखवीत फिरत. अजयसिंगराजांची ही एक कला वाखाणण्याजोगी होती हे खरे. आणि बाई बाकी कितीही आपल्या पतिराजांवर डाफरत हुकूम सोडोत.. याबाबतीत मात्र दिलखुलास त्यांचे कौतुक करत.

आज बाईंची जीप घुसली जंगलात. चाकांचा आवाज भल्या पहाटे घुमला.

त्या आवाजाबरोबर सर्व पक्ष्यांनी आपली कर्णेंद्रिये टवकारली. घरट्याघरट्यातून राघू मैना अन चिमण्या कावळे बाहेर आले. राघूने आपले पंख फडफडवत जणू बाईंना मुजरा केला. कावळयानेही आपल्या पंखांची हालचाल करीत जणू  अनुमोदन दिले!

बाई आज खुशीत दिसत होत्या. खूप दिवसात असे जंगलात येणे झाले होते. शिकार नाही तर नाही.. निदान जंगलात तरी जावे.. आणि खरी नाहीतर नाही.. किमान खोटी का होईना बंदूक घेऊन जावे.. ही इच्छा आज पुरी झालेली. आणि त्यास कारण ही तसेच काही होते. ते म्हणजे आज बाईंचा वाढदिवस! पस्तीसावा! अर्थात तो कागदोपत्री. बाईंनी गेल्या दहावर्षात स्वतःस पंचविशी ओलांडू दिली नव्हती. राघू घरट्यातून डोकावून पाहू लागला तशी मैना पण उठली. आपल्या चिमण्या डोळयांनी ती राणीसाहेबांची ऐट पाहू लागली आणि आपली चिमुकली चोच उघडून राघूस म्हणाली, "का वो .. बाई लयच खुशीत दिसत्यात.."

राघूला पण जाणवले ते. आजवर जंगलात कित्येक जण येतात नि जातात. बहुधा मोठमोठ्या जीपांतून भरभरून. हे दोघेच आणि त्यांचा तो वाहन चालक. साहेबाच्या हाती लांब नळीवाली बंदूक. फार पूर्वी जंगलात पक्ष्यांना मारायचे ते कुणी राजे महाराजे अशा बंदुकांनी.. राघूला त्याच्या आजीने सांगितलेली गोष्ट आठवली. हल्ली ती शिकार बंद झालीय म्हणजे ही दोन नळयावाली बंदूक फक्त शोभेची असणार आणि असले हे जीपमधले पाहुणे म्हणजे कुणीतरी राजा राणी असावेत असा मनाशी कयास बांधत राघू म्हणाला, "हुं.. रानी असनार ती.. आणि कदाचित तिचा आज एकांद्या वाडदिस असायचा. आपन पाह्यले ना मानसाचे पोरापोरी लोक कसं कसं वाडदिस साजरा करत्यात ते.. काय म्हनतात.. बड्डे..!"

मैनेने ते ऐकले नि चोच फुरंगटून बसली.

आता हिला काय झाले असे तोंड फुगवायला? राघूला प्रश्न पडला. नि तितक्यात मैनाच म्हणाली, "जितं प्हावं तितं बायकोचं कवतुक करत्यात समदे.. अगदी वाडदिस पन.. आनी म्या.. घरटं न झाड.. झाड न घरटं.. कुटं जानं न येनं.."

सकाळसकाळी आपली काही चूक नसताना मैना आपल्यावर त्या जीपवाल्या बाईमुळे डाफरावी? एकतर मैनेचा वाढदिवस अजून खूप लांबवर होता. जीपवाल्या बाईंची ऐट मात्र

पाहण्याजोगी होती हे खरे. पण तिच्यामुळे ह्या आपल्या घरट्यात उगाच मैनेचा त्रागा व्हावा? त्या बाईबद्दल, तिच्याबरोबरच्या साहेबाबद्दल नि त्या हातातल्या बंदुकीबद्दल.. नि विचार करता करता त्या चालकाबद्दल.. मग त्या जीपबद्दल.. त्यानंतर एकूणच माणूस नामक प्राण्याबद्दल राघुच्या मनात राग उसळून आला. त्या रागाच्या भरात त्याने आपली साद दिली. आजूबाजूच्या घरट्यातील पक्षी जागे झाले. त्यांनी पण प्रतिसादात्मक शीळ भरली. त्या आवाजाने जंगलात सूर्य उगवल्याची घोषणा झाली. जंगलात सूर्याचे किरण पोहोचावयास तशी दुपार उजाडे. दाट झाडीतून किरण जमिनीवर पोहोचणे मुश्किल. पण पक्ष्यांची साद आली की जंगलात सर्वांना समजे.. सूर्य उगवला बुवा! मैना चोच फुगवून बसली खरी पण ती पक्ष्यांप्रमाणे.. स्वच्छंद. त्यामुळे बसल्या बसल्या गमत्या राघूचे बोलणे आठवून हसू आले तिला.

कालचीच गोष्ट. आकाशात तांबडं फुटायला झालेय. राघू तसा झोपेतच. एकदा आपली सकाळची ड्यूटी झाली की ताणून द्यायला मोकळा असे म्हणून सूर्य उगवायची वाट पाहात बसला. आज किती वेळ झाला तरी सूर्याचा पत्ता नाही.. झोप लागली की काय? राघू वैतागून म्हणालेला.. तुला सांगू मैने.. हा सूर्य पण बेशिस्त होत चाललाय आजकाल. शिस्त नाही. वेळेवर मावळावे नि उगवावे.. तर नाही. मावळताना जातो वेळेवर पण कामावर यायला उशीर! प्रत्यक्ष सूर्याबद्दल बोलण्याइतकी राघूची विनोदबुद्धी तल्लख होती. मैनेला राघूचे असले बोलणे आवडत असे पूर्वी. क्षण दोन क्षण सारा तणाव दूर झाल्यासारखे वाटे. नवीन आलेली ती या घरट्यात तेव्हा हसतही असे राघूच्या बोलण्यावर! पण आता इतक्या वर्षांनी वरवर ती चिडल्यासारखे दाखवीत असे. राघूने असले काही बोलण्याऐवजी कामाकडे पाहावे.. घरट्यातला कापूस कमी झालाय.. काड्या रूततील पिलांना.. ते सोडून असले पांचट विनोद करावेत? एकेकाळी राघूशी जोडी जमवताना त्याचा हाच गमत्या किंवा विनोदी स्वभाव तिला आवडलेला ह्याचा देखील तिला आता विसर पडलाय.

जीप जंगलात आल्याला मोजून पाच मिनिटे नाही झाली. सूर्य उगवला. अर्थात जंगलात तितकाच अंधार आणि थंडी होती. जीप पुढे निघाली. चालक संथगतीने चालवत आपल्या सवारींना आजूबाजूला निरखून पाहण्याचा वेळ देत होता. जंगलातल्या थंडीत बाई कुडकुडत होत्या. पण एकूण आपली शान जपली जातेय म्हणून खुशीत होत्या. तेवढ्यातल्या तेवढ्यातही या थंड हवेसाठी आपल्या नवऱ्यास जबाबदार ठरवता आले असते तर ही थंडी जरातरी सुसह्य झाली असती असे वाटून गेले त्यांना. अजयसिंगराजे कुडकुडत पण न कुरकुरत बसलेले बंदूकीवर आपला हात ठेवून.

राघूचा टिवटिवाट म्हणजे वाघोबांच्या घड्याळाचा अलार्म. राघूने आपल्या घरट्यातून आपले प्रात:कालीन कूजन सुरू केले की वाघोबांची झोप मोडे. ही उठण्याची वेळ.

वाघोबांनी मोठी जांभई दिली. आपले पट्टे सांभाळत उठले ते. आपल्या मांसल पंजांनी आपले अंग झटकून साफ केले त्यांनी. वाघोबांच्या पोटात थोडे जड वाटत होते. रात्रीचे हरीण अजून पचले नसावे. पण आज शिकारीस जाणे भाग होते. परवा मारलेल्या हरणाचा काल सर्व बछड्यांनी मिळून फडशा पाडला होता. आणि वाघीणीने नको नको म्हणताना वाघोबांनीही आडवा पंजा मारला होता. आज शिकार करणे आले.. पण आज जंगलात काही वेगळेच वातावरण दिसतेय. तरी ते शूट म्हणणारे लोक  शिकारी नव्हते. नुसतेच त्या कुठल्याशा यंत्राने त्यांनी काहीतरी केले.. जे पाहून त्या बाई खूश झाल्या. काय असावे.. वाघोबा विचारात पडले. वाघिणीला खूश करणे कठीण. शिकार मिळाली तरी तिच्यात काही न काही खोट काढतेच ती. परवाचा हरीण.. किती लुसलुशीत मांस त्याचे. पिल्ले पण आपल्या कोवळ्या दातांनी खाऊ शकली. पण तरी वाघीण म्हणते.. अजून शिकार बघून करत नाही तुम्ही नीट. इकडे वाघोबा

जातो जिवानिशी आणि खाणारी वाघीण म्हणते शिकार वातड कशी? इतकी वर्षे झाली या जंगलात. आणि रोज काय तेच हरीण नाहीतर ससा? तिकडे त्या वाघांकडे पहा.. काळवीट मारतात.. लांडगा नाहीतर कोल्हा पण. कोल्ह्याचे मांस पाठीसाठी चांगले.. माझी पाठ दुखतेय म्हणून सांगतेय.. पण नाही..कोल्हा म्हणून मारू नका!

वाघोबांना जांभई आवरेना. पण आता उठावेच लागेल. नशीब असेल तर कोल्हा मिळेलही एखादा. लांडगे कमी आहेत पण दिसतात तरी. पण कोल्हा अजूनही दुर्मीळ. शेजारच्या वाघाने कधीतरी मारला खरा कोल्हा पण त्यावरून रोज ऐकावे लागते. त्यापेक्षा हा मनुष्य प्राणी बरा म्हणावा. यांच्यात त्या बाई हसल्या तरी. वाघिणीस हसण्याचेच वावडे की काय?

जागीच बसकण मारत वाघोबा खाली बसले. बछड्यांना शिकार शिकवायला हवी. बाजूच्या वाघापासूनही जपायला हवे. पिलांचा चट्टामट्टा उडवायला मागे पुढे पाहात नाही तो. या वाघोबांनी कधीच दुसऱ्या वाघांच्या बछड्यांना नाही खाल्ले. जगात आलेत तर त्यांना पाहू दे चार दिवस सुखाचे. शिकारबिकार तर जन्मभराची आहे. वाघाच्या जातीस ते चुकलेय थोडीच. पण सारेच वाघ असे नसतात. काय तर म्हणे दुसरा नर बछडा मोठा झाला की त्या वाघास आव्हान देईल! त्याचा बंदोबस्त आताच करून टाकावा म्हणे! या जंगलच्या कायद्याच्या आठवणीने वाघोबांच्या मनात बछड्यांची काळजी दाटली आणि वाघोबास भरून आले. वाघीण दोन्ही बछड्यांवर पंजे टाकून झोपलेली. आपली निरागस पिल्ले पाहता पाहता वाघोबांना अचानक जाणीव झाली. राघूने आधीच गजर वाजवलाय. जीपच्या चाकांचा आवाज वाघोबांच्या कानी पडला. ही नवीन गाडी शिरतेय आज जंगलात.. कोण तो..? बंदूकधारी..? शिकारीस आला की काय? हल्ली शिकारीस येत नाही कोणी. अशा गाड्यांतून येतात नि तो काय तो काळा रंगाचा असतो तो दाबत फिरतात. त्याला फोटो म्हणतात म्हणे.. वाघोबांनी एकदा असेच कुणी सांगताना ऐकलेले. त्यामुळे आपल्या प्राण्यांना धोका काही नाही. आपले प्राणी फक्त पोटापुरता नाहीतर

जीव वाचवण्यापुरता करतात शिकार.. त्या माणूस नामक प्राण्यासारखे नाही. उगाच गंमत म्हणून मारत सुटतात पक्षी आणि प्राणी.

वाघोबांनी आजूबाजूला पाहिले. जीप संथ गतीने चालली होती. तो बंदूकधारी गाडीत शांतपणे बसून होता. ती बाई मोठ्या तोऱ्यात सगळीकडे पाहतेय. जणू सारे जंगल हिच्याच मालकीचे असावे. आता सकाळच्या डरकाळीची वेळ झालीय. फोडून टाकावी ती नि छातीसे ताणून द्यावे. थोडे उन्ह आले की हरणं येतात पाणी प्यायला तेव्हा करू टाकू शिकार. किंवा ही मागे लागलीय तर आज शोधू कुणी दुसरा प्राणी. हे धोकादायक पण. हातचे हरीण सोडून न दिसणाऱ्या कोल्ह्यामागे धावावे? मागे झाले होते एकदा असे नि मग दुसरी शिकार मिळणे दुरापास्त झालेले. असू देत.. म्हणत वाघोबांनी मोठ्याने डरकाळी फोडली. सारे जंगल त्या आवाजाने दुमदुमून गेले. हरणांच्या कळपात हलचल झाली. झाडांवरचे पक्षी आकाशात उडाले. शांत जंगलात त्या पक्ष्यांच्या गोंगाटाचा आवाज काही क्षण भरून राहिला. वाघोबांनी पाहिले, गाडीतल्या त्या माणसाच्या डोळ्यासमोर ते काळे काही होते. त्यातून उजेडाचे किरण बाहेर पडत होते. बहुधा फोटोच असणार हा.. म्हणत वाघोबा आडवे झाले.

जीपच्या जवळच्या त्या वाघाची डरकाळी ऐकून बाईंच्या अंगावर शहारे आले. अजयराजे सावरून बसले. प्राणी जवळ असला तरी बंद जीपमध्ये धोका नसल्याने शांतपणे आपला मूळ भेदरट स्वभाव अजूनही लपवू शकत होते ते. त्याचवेळी आपले नि ह्या अजस्त्र जनावराचे नाव एकच असावे याबद्दल त्यांना गंमत वाटून गेली त्याही स्थितीत. वाघोबांच्या डरकाळीने जंगलात पशुपक्ष्यांची गाळण उडाली. हरणे, काळवीटे, ससे आणि इतर प्राणी इतस्ततः धावू लागले. उंदीर आणि साप सुळकन आपल्या बिळात शिरून बसले. भीतीची लहर आसमंतात जणू पसरली.

आणि सगळे पक्षी आपापली घरटी आणि  झाडाझाडाच्या फांद्या सोडून कलकलाट करत आकाशात उडू लागले. मगाशी जे कूजन वाटत होते तोच आता कलकलाट वाटू लागला. वेगवेगळया रंगांच्या पंखांनी सगळया पक्ष्यांनी आकाशी झेप घेतली.

"शूट देम.."

बाई ओरडल्या. जीपच्या जवळच्या वाघोबाचा जणू विसर पडला त्यांना. अजयसिंगराजे हातातली बंदूक सोडून उठले. आपला कॅमेरा सरसावून त्यांनी आकाशातल्या त्या भेदरलेल्या पक्ष्यांना टिपणे सुरू केले. सुंदर रंगाचे नि सुंदर पंखांचे पक्षी त्यांच्या कॅमेरात कैद झाले. वाघोबांच्या डरकाळीचा परिणाम हळूहळू विरला असावा. कारण पक्षी परत खाली झेपावले. अजयसिंग हळूच वाकून बाईंना त्यांनी ते विहगगणांचे विहंगम फोटो दाखवू लागले. बाईंना नवऱ्याची एवढी एकच गोष्ट आवडे आणि तीस त्या चांगलेय असेही म्हणत. फोटोत ते पसरलेले अति रम्य पंख पाहून बाई खूश झाल्या. आता वाढदिवसाची सुरूवात तर दणक्यात झालेली. अजयसिंगराजे पण सुखावले आणि शीळ वाजवू लागले.. 'जंगल में मोर नाचा.. किसी ने ना देखा..!'

बाईंची शाही स्वारी पुढे निघाली.. जंगल में आज जणू मंगल होणार होते..

*सदा सर्वदा!*

समीरण दामोदर सरवदेला आम्ही सदा 'सदा' याच नावाने बोलावित असू. हा सदा तसा फार प्रसिद्ध होता असे नाही. अभ्यास, खेळ वा नाटक अशा कशात तरी पुढे असणारेच कॉलेजात फेमस होतात. सदा त्या कशातच नव्हता. तो प्रसिद्ध असेल आमच्या गँगमध्ये तर फक्त त्याच्या वेगवेगळ्या 'थियरीज' करता! म्हणजे आम्ही न्यूटनच्या लॉज सारखे 'सदाचे नियम'च बनवलेले. ते अर्थातच त्याच्याकडून मिळणाऱ्या 'इनपुट्'स मधून. इनपुट शब्दाची आमच्यात एक वेगळी गंमत होती. रोज रोज सदा नवीन दिवे लावावेत तशा थियरीज मांडत असे. त्या ऐकून आम्ही त्या इनपुट्चा 'आऊटपुट' काढत असू.

म्हणजे उदाहरणच द्यावे तर..

शंकरविलास गुप्ता भय्याच्या हिंदू हॉटेलातल्या भज्या! तो ढेरपोट्या भय्या उघडाबंब उघड्यावर मोठ्या कढईत भज्या तळून स्वत:सारख्याच उघड्यावर का टाकतो? त्यांच्यावर माशा का घोंघावतात आणि त्यामुळे त्या अधिक खाण्यायोग्य का समजल्या जाव्यात?

सदाची थियरी अशी की हॉटेलवाल्याला फुल कॉन्फिडन्स आहे.. सर्वांनाच आवडतील भज्या. मग त्यात माशादेखील आल्या! आणि जेवढ्या जास्त माशा तितके जास्त स्वादिष्ट पदार्थ!

"वो भजी ही क्या जिसपर मक्खी भी न बैठे?" मख्खपणे त्याने दिला हा त्याचा इनपुट! आमचा आऊटपुट अर्थातच.. डिसेंट्रीच्या गोळ्या! ही त्याची 'भमाडि' म्हणजे 'भजी-माशी-डिसेंट्री थिअरी'! ही एक उदाहरणार्थ थियरी! येता जाता त्याला अशा गोष्टी सुचतात कशा याचे आश्चर्य वाटे मला.

पाणी बनवण्याची त्याची रीत तर खासच होती. दोन पिंप हायड्रोजन नि एक पिंप ऑक्सिजन एकत्र मिसळून पाणी बनवता येईल अशी खात्री होती त्याला. फक्त हायड्रोजन आणायचा कुठून एवढाच प्रश्न बाकी होता त्याच्यासाठी. पाणीटंचाईवरचा हा जालिम उपाय कुणी ऐकत नाही याबद्दल त्याला तीव्र खेद ही होता. त्याची ही पाणी बनवण्याची कृती ऐकून कुणाच्या तोंडचे पाणी पळाले असते! पण त्याचे मत ठाम होते.. 'जस्ट बिकॉज ही इज नॉट अ सायंटिस्ट..' कुणी लक्ष देत नाही त्याच्याकडे! आमचा आऊटपुट एवढाच होता त्यावर.. सदा बसलाय दोन पिंपे घेऊन.. प्रत्येकातून एकेक ग्लासात घेतोय हायड्रोजन नि ऑक्सिजन.. रस्त्यावर सरबतवाले बसतात तसे ग्लास हलवून 'ये लो साब' म्हणून पाजतोय अस्सल 'हायड्रोजनेटेड' पाणी!

एकदा त्याला लेक्चरला यायला उशीर झाला. लेट मार्क लागला. वर प्रोफेसर उन्नींनी त्याला चांगलीच बत्ती दिलेली. अर्थात कॉलेजच्या दिवसांपर्यंत पोरांनी गेंड्याची कातडी बऱ्यापैकी कमवलेली असते. त्यामुळे त्या ओरड्याचा सदावर काही परिणाम झाला असता तरच नवल! त्यादिवशी दुपारी बोधिवृक्षाखाली दृष्टांत मिळाल्यासारखा कट्ट्यावर बसल्याबसल्या त्याचा सापेक्षतेचा सिद्धान्त त्याने सांगितला..

"बाबांनो, स्थळ, काळ, वेळ, काम, वेग सारे काही सापेक्ष असते. ही माझी थियरी आहे. उशीर झाला..कशाला? काळ अनंत आहे! उशीर हा सापेक्ष शब्द आहे! आजचा उशीर हा उद्यासाठी खूप लवकर होऊ शकतो!"

"वा! छान! आणि काम वगैरे?"

"अगदी काम न करणे हे ही एक कामच असते.

आणि वेग! हळू आणि जलद हे ही सापेक्ष शब्द आहेत! कासवाहून ससा जलद.. पण चित्त्याहून? आवाजाचा वेग खूप पण प्रकाशाहून जास्त नाही!"

या इनपुटाला आऊटपुट म्हणून आम्ही 'सदाची नातेवाईक थियरी' असले नाव दिले! नातेवाईक म्हणजे रिलेटीव्हिटी!

"अरे ओरिजिनल थियरी असेलही ॲरिस्टॉटलची. पण ही माझी देखील काही कमी नाही!"

"ॲरिस्टॉटल? की आईनस्टाईन?"

"बरे झाले विचारलेत तुम्ही! अरे ही माझी उप थियरी!"

"म्हणजे?"

"नावात काय आहे? यीट्स म्हणून गेला!"

"यीटस्? की शेक्सपियर?"

"कुणी असो.. मी काय म्हणतो.. शेवटी नावात काय आहे?"

"हे तूच म्हणतोस ना?"

"हुं.. शेक्सपियर काय, यीट्स काय नि हा समीरण सरवदे काय.. नावात काय आहे गड्यांनो!"

सदाचा असा मुक्त संचार सुरू होता कॉलेजात. त्याच्या एखाद्या तत्त्वज्ञासारख्या थियऱ्या मांडणे सुरू होते. तेव्हा मोबाईलचे फॅड नव्हते नाहीतर एखाद्या विचारवंताच्या पोझ मधले फोटो काढून घेतले असते त्याने! अगदी गालावर दोन बोटे ठेवून! त्याच्या थियऱ्यांचे इनपुट्स आणि आमचे त्यावरील आऊटपुट्स आमच्या कट्ट्यावर गाजत.. तेवढेच मनोरंजन म्हणून.

पुढे याच सदाचा 'सदा सर्वदा' झाला..

हे सदा सर्वदा नामकरण फार नंतर झाले त्याचे. ती गोष्ट कॉलेजच्या शेवटच्या वर्षीची. तोवर सदा म्हणूनच ओळख त्याची. आणि त्याच नावाने सदाचे नियम प्रसिद्ध होते कॉलेज कट्ट्यावर! सदा सर्वदा झाल्यावर मात्र तो भेटणे दुर्मिळ झाले. आणि त्याच्या थियरीजही दुर्मिळ झाल्या.

झाले काय की या स.दा.सरवदे ला फिशपाँड मिळाला, 'सदा सर्वदा योग तुझा घडावा.. तुझे कारणी जीव माझा जडावा!'

आधी कुणाच्या गणतीत नसणारा सदा आता एकदम उजेडात आला आणि त्याचे बारसे झालेच, 'सदा सर्वदा!' या आधीचा साधासुधा सदा आता सदा सर्वदा नावाने ओळखला जाऊ लागला. तशी कॉलेजची पोरं चाणाक्ष.. हुशार नि आजूबाजूला लक्ष ठेऊन असणारी. म्हणजे घडणाऱ्या भानगडींचा वास त्यांना लगेच येतो. तशी त्यांची नाके फारच तीक्ष्ण! तेव्हा 'धुआ है तो आग होगीही किधर' या हिशेबाने मिळाला असणार त्याला तो फिशपाँड. आणि तो मिळायला कारणही तसेच होते. आमच्या कॉलेजात नव्याने योगासन वर्ग सुरू झालेला. त्यासाठी शिकवायला येणारी कन्यका पाहून हा क्लासला जायला लागला! अजून तिची नि ह्याची जोडी जमली असे काही म्हणता येत नसले तरी घोड्यापुढे धावते सगळ्यांची अक्कल. त्यामुळे त्या भविष्यवेधी फिशपाँड नंतर दोन तीन महिन्यात दोघे एकत्र दिसूही लागले. बाकी काही असो नसो, आमच्या कॉलेजच्या पोरांनी हा चान्स सोडला नव्हता हे खरे!

ती योगासनवाली सुबक ठेंगणी नवतरूणी योगायोगाने आमच्या कॉलेजात आली काय नि रथी महारथी असणारे कॉलेजातले महाभाग सोडून याच्याबरोबर तिची जोडी जमली काय! त्यात

आम्हाला आनंदच होता. पण त्याच्या थियऱ्या मांडायला तो आम्हाला भेटेनासा झाला. कदाचित आपल्या नव्यानवेल्या मैत्रिणीला ऐकवत असावा! आणि तीही त्या मन लावून ऐकत असावी.. कदाचित! नव्या नव्हाळीत कोण काय काय करतात किंवा करू शकतात कुणी सांगावे!

सदा चा सदा सर्वदा झाल्यावर खूप दिवसांनी एकदा भेटला तो कट्ट्यावर. एकटाच. नवी काही थियरी ऐकायला उत्सुक होतो मी. ती ही त्याची सुधा भेटल्यानंतरची. साधासुधा सदा आणि त्याची योगासनवाली सुधा! कोणाला सुद्धा आश्चर्य वाटले असते! ह्याची थियरी याबद्दल काय असावी?

"मग कशी आहे आमची वहिनी?"

"ती? योगासनातच फ्लेक्सिबल आहे!"

"म्हणजे?"

"म्हणजे तेच.. लवचिक! योगाभ्यासातच फक्त!"

याचे काही बिनसले की काय? की डायरेक्ट तलाक तलाक तलाक? असा हा एकटा बसलाय कट्ट्यावर तो!

"म्हणजे काही नाही रे. सुधाला सुद्धा मी थियरीज सांगायला गेलो तर म्हणते, प्रूफ आण! उगाच खयाली पुलाव पकवू नकोस!"

"असे सांगते ती?"

"माझी थियरी अशी आहे ना.. गर्लफ्रेंड नवी असते ना तोवर आपण काहीही केले तरी आवडते तिला.. सुधाला ही आवडायचे ते.. जसजसे दिवस जातात ना तसे ती म्हणेल ती पूर्व दिशा!"

यात मी काय बोलणार.. अनुभव स्वतःचा इल्ले ..

"अरे आधी आधी तिला माझ्या थियरींचे अप्रूप.. आता म्हणते, अप्रूव्ह कसली करते.. म्हणते प्रूव्ह इट!"

"मग तू काय करतोस?"

"हे बघ, माय थियरी इज.. स्पीक ओन्ली व्हाॅट शी वाँटस्.. जो तुमको हो पसंद वोही बात कहेंगे! बाकी ह्या प्रूफबिफला अर्थ नाही रे! तुला याचा अर्थ कळतो का रे?"

"कशाचा?"

"अरे, ही स्टेज येते ना तर समजावे, युवर स्टोरी इज थ्रू.."

"म्हणजे?"

"म्हणजे इतकेच की मैत्रीण आता आपल्यावर हक्क गाजवायच्या स्टेजला पोहोचलीय! आणि ही स्टेज आली की तो डायलॉग.."

"डायलॉग?"

"तोच.. दुनिया की कोई भी ताकद हमें जुदा नहीं कर सकती! थोडक्यात प्रेमशास्त्रातली ही माझी थियरी आहे.. अशी स्टेज आली की समजावे गंगेत घोडे न्हाले!"

"तिला सांगितलीस ही थियरी तुझी?"

"वेडा आहेस? प्रूफ मागायची ती! आणि व्हाय प्रूफ फाॅर बँगल इन द हँड? उगाच हातच्या काकणाला.. खरेय की नाही?"

आता यांची जोडी किती अभेद्य हे मला कुठून ठाऊक असणारे? तरीही म्हणालो,

"खरंय तुझं रे बाबा."

थोडक्यात काय सदा सर्वदा अजूनही बदलला नव्हता.. फक्त त्याच्या थियऱ्या नि त्या थियऱ्यांचे विषय बदलले इतकेच. आणि त्याच्या सुधाबरोबर हा कितपत सुधारेल कोणास ठाऊक. फक्त त्याला थियऱ्यांची थेरं घरी नकोत इतकेच बहुधा सांगेल नंतर अशीच दिसत होती चिन्हे!

कॉलेज सुटले आमचे. पोरं चार दिशांना पांगली. आपापल्या कामाला लागली. कॉलेजातले फक्त जवळचे दोस्त शक्य तितक्या संपर्कात राहिले. बाकीचे कधीकधी दिसले कामनिमित्त की गप्पा होतात. त्या कोण कुठे नि काय करतो याच्या नि ते दिवस किती छान होते याच्या! सदा सर्वदा कुठे गेला हे कुणालाच ठाऊक नव्हते. अगदी योगासनांचे वर्ग पण लवकरच बंद झाले. सुधा नि सदाच्या जोडी जमवण्यापुरतेच योगासनांच्या क्लासेसचा योग होता की काय कुणास ठाऊक!

खूप दिवसांनी म्हणजे वर्षांनी सदा भेटला एकदा. तेही कॉलेजच्याच कट्ट्यावर. एकटाच होता. काही कामानिमित्त आलेला. सदा किती बदलला असावा? मला उत्सुकता होतीच.

"काय कसं काय.. सदा.."

"मी सदा सर्वदा.. मजेत.. काय आहे मजा आणि सजा या सापेक्ष गोष्टी आहेत.."

"म्हणजे सदाची नातेवाईक थियरी? इथे पण आणि अजूनही?"

"अर्थात! सदाच्या थियऱ्या कालसापेक्ष नाहीत .. तर कालातीत! तर सांगायचे हे की मी मजेत.. सुधा मजेत.."

"योगासने करतोस स्वतः की सोडलीस?"

"किती वर्षे होऊन गेली नाहीत? हल्ली नाही करत!"

"का? बायको बरी सोडते तुला अशीच? "

'मला सांग आपण एखादी गोष्ट का करतो?'

"का?"

"विथ स्पेसिफीक उद्दिष्ट्य इन माईंड!"

"तर योगासनांचे उद्दिष्ट.."

"देअर यू आर! लिमिटेड होते ते.. उद्दिष्ट पूर्ती झाल्यावर फार काळ तिथे रेंगाळू नये म्हणतात!"

"कोण?"

एखाद्या 'मौका ए वारदात'बद्दल म्हणाल्यासारखा म्हणाला तो.

"अरे, माझा उद्देश सफल झाला.."

"थोडं थोडं कळतंय .."

"अरे माझी थियरी आहे, माणसाला जे कळून घ्यायचेय ना ते तो कळून घेतोच काही झाले तरी.. तर तुला कळले ते खरे! लिमिटेड एम वाॅज सुधा प्राप्ती .. ते झाले.. आता पाठीला कशाला लावत बसू पाय? खरंय ना?"

"पण तुझ्या थियऱ्या प्रॉडक्शन सुरूच आहे.."

"अर्थात! फक्त ते आता स्थलसापेक्ष झालेय.. नि व्यक्ती सापेक्ष!"

"अजून ही थियरी ऑफ रिलेटिव्हिटी?"

"यस.. सापेक्षता ही माझीही सर्वात मोठी आणि महत्वाची थियरी बरं.. घरी आणि सुधासमोर.. आळीमिळी गुप्प चिळी! सुखी संसाराची सर्वमान्य थियरी आहे ही.. जो तुमको हो पसंद वही बात कहेंगे!"

"खूप वर्षांपूर्वी तू सांगितलेलेस ते.."

"असणारच! माय थियरीस आर कालातीत! मी सांगितलेय तुला!"

थोडक्यात सदा सर्वदा सदा तसाच होता! फक्त नव्या थियऱ्या कुठे नाही सांगायच्या याचीच नवी थियरी बनवलेली पठ्ठ्याने!

हल्ली भेटला नाही खूप दिवसांत पण मला खात्री आहे, जो कोणी भेटेल त्याला ऐकवत असणार तो आपले नवनवीन तत्त्वज्ञान! आणि आपल्या सुधासमोर कुठलीही थियरी न मांडण्यामागे ही त्याची एक थियरी तर आहेच ना!

# *लेखक राव*

रघुवीर राव.

रघुवीर राव ऊर्फ रघु म्हणजे पट्टीचा लेखक.

हाती लेखणी घेतली तेव्हापासून लिहित आलेला. अगदी भिंतीही मी 'कागद झाले आहे' म्हणाल्यासारख्या वाटून त्यांच्यांवरही लिहायचा तो. असे त्याचे पाय पाळण्यात दिसायचे. लहानपणापासून एकच इच्छा .. लेखक होण्याची. शाळेत मोठाले लिहायचा निबंध. अवजड शब्द वापरण्याची हौस भारी. त्या नादात पल्लेदार वाक्ये लिहावीत.. शाळेच्या वयाशी विसंगत असे लिखाण वाटे त्याचे. कॉलेजात आल्यावर भित्तीपत्रिका चालवायची हौस त्याची दांडगी. त्यात साऱ्या जगाची चिंता यालाच असावी असले गंभीर लिहायचा तो. तरीही सारा मामला हौशी. त्यामुळे बिघडायचे काही नाही. नि रघूची हौस ही भागायची त्यातून. वाचणारे असोत की नसोत. 'भिंतीवरी लटकावे लिहिलेले' एवढे तरी उद्दिष्ट सफल व्हायचे त्याचे.

कॉलेज सुटले. रघू नोकरीला लागला. खर्डेघाशीची नोकरी. पेन पेन्सिलीशी संबंध राहिल पुढेही एवढाच काय तो आनंद. बाकी लिहिण्याच्या बाबतीत आनंदी आनंद. त्यात तुटपुंज्या पगारात घर चालवता न आल्याने ओव्हर टाइम. आणि मुंबईतले पायाला चक्रे लावून जिणे. कसला काही लिहू शकणार होता तो. जगण्याच्या शहरी मारामारीत आपल्याला लिहायचे होते कधी काळी नि लेखक बनायचे होते याचाच पडला विसर त्याला, तर त्यात नवल तर काहीच नव्हते. रोजच्या कारकुनीतून वेळ मिळाल्यास कवितांचे चार शब्द तरी मेहरबानी करून पेनातून कागदावर येतील तर शपथ. कविता हा प्रकार त्याला कमी वेळखाऊ वाटे. एकदा सुचली की

झरझर ओळी होतात लिहून. त्यात कथा नि लेखांसारखी मांडणीची भानगड नाही की शब्दरचनेची. पण जगण्याच्या रहाटगाडग्यात ते शब्द कुठे दडून बसलेले कुणास ठाऊक. त्यात त्याची पत्नी. रमा. तिचा दोष नव्हता ही त्याच्या पगारात महिना मॅनेज करण्यात सारी शक्ती खर्ची पडली तर. बिचारी रघुच्या लिहिण्याला कसली देते प्रोत्साहन. अर्थात ते आधीचे म्हणजे लग्नानंतरच्या काही वर्षांतले दिवस. म्हणजे नव्या नवेलीस आपला नवरा गोष्टी लिहितो नि लिहू शकतो याचे कोण कौतुक. आणि चंद्र कलेकलेने कमी होत जावा तसा तिचा उत्साह कमी कमी होत अगदी मावळलाच काही वर्षांत. पुढे तर त्याच्या ह्या जगण्यावरचा राग काढायची ती दुसरीकडे. आणि कुठे त्या रागास आऊटलेट नाही मिळाला तर त्याच्या लिहिण्यावर काढत असे तो राग ती. हळूहळू तेही दिवस गेले. पुढे तो ही विसरला आणि रमाचा तर प्रश्नच नव्हता. त्यामुळे साहित्य सेवा ठप्प होत गेली त्याची.

रघुने हे स्वप्न थंड्या बस्त्यात ठेवले असेल पण तो विसरला नव्हता हे खरे. कारण तो रिटायर झाला नि त्याने आपले ते लेखक बनण्याचे स्वप्न, पावसाळा सुरू होताच छत्री किंवा दिवाळीत माळ्यावरून आधल्या वर्षीचा कंदील - खाली काढावा .. किंवा पांडवांनी शमीच्या झाडावरून शस्त्रे बाहेर काढावीत.. तसे बाहेर काढले. आता पोरे बाळे मार्गी लागलेली. आजवर धावधावून चपला झिजल्या तरी आता घरीच बसायचे तर त्या वहाणांची काय गरज? घरबसल्या कल्पनेच्या भराऱ्या मारायला काय जाते! त्यात परत वेळही हवा तेवढा. आणि आयुष्यभरच्या धावाधावीने गाठीशी जमलेली थोडीफार पुंजी. स्वप्न न साकारावे अशी कसलीच गोष्ट नव्हती दिसत त्याला. तेव्हा ते राहिलेले स्वप्न सत्यात आणावेच.. कंबर कसून तो तयार होणार होता.. पण कंबर कसून लिहिण्या काय फायदा? ते अंगमेहनतीचे काम नाही. नुसतीच मेंदूची घासाघीस आणि काय! आता एकच लक्ष्य .. लिखाण आणि लेखक बनून प्रसिद्ध होणे!

निवृत्ती नंतरचा हा प्लॅन रघूने आधीच बनवलेला. आता फक्त निवृत्ती मिळण्याची चोरी की घासली लेखणी आणि चरकातून आपली प्रतिभा पिळून त्यातून काढले साहित्य रसाचे प्याले! काहीच दिवसांचा अवधी आता ते स्वप्न सत्यात येण्यास. आता रघुवीर राव प्रथितयश लेखक होईल.. पुस्तके निघतील.. आवृत्त्या निघतील .. पेपरांतून रघुवीर राव.. आणि त्यांच्या लेखन शैलीवर लेख येतील.. अगदीच उच्चीचे ग्रह असतील तर एखादी रविवार पुरवणी देखील! कदाचित कुठल्या आडगावात साहित्य संमेलनात बोलावणे येईल .. पुढे मागे मुख्य संमेलन .. आणि सरतेशेवटी.. एखादा पुरस्कार.. उतरत्या वयात का होईना. आपण थरथरत्या हाताने तो घेऊ. शाल नि श्रीफळ. म्हातारपणी शाल हवीच.. नारळाचे काय करावे.. ते तेव्हा पाहून घेऊ.. अजून काय हवे एका लेखकास.. फक्त आता एक लेखणी परत हाती आली की झाले.. मुंगेरीलालचे एक बरे असते.. आपण मुंगेरीलाल आहोत नि आपले हसीन सपने साकार होणार नाहीत याची कल्पना असावी त्याला. बाकीच्यांना आपण मुंगेरीलाल आहोत हेच कळण्यात कित्येक वर्षे खर्ची पाडावी लागतात! पण स्वप्ने पाहण्यातही मजा असते .. तीच मजा अनुभवता अनुभवता आपला मुंगेरीलाल झालाय हे कळावयास काही वर्षे रघुला लागावीत यात आश्चर्य ते कोणते!

रघुने आपल्या रिटायरमेंटच्या आधीच घोषणा करून टाकली. 'यापुढे एकच लक्ष्य.. साहित्य सेवा आणि साहित्य सेवा!' त्यामुळे ऑफिसच्या लोकांची सोय झाली.. सेंड ऑफला त्याला मग कुणी पेनं दिली तर कुणी पेन्सिली.. एकाने तर खोडरबरांचे मोठे पाकिट. . "लिहायचे तर खोडावे लागणारच!" सुगंधी खोडरबर देताना कुणी भाषण ठोकले..

एका जवळच्या मित्राने त्याला दिले ते पोष्टाचे स्टॅम्पस.. भाषणात म्हणालाही तो, "रघु, तुझ्या कथा मासिकांस पाठवशील त्यासाठी, नि त्या मासिकाने साभार परत पाठवायच्या तर रिटर्न तिकीट अशी सहा महिन्यांची सोय होईल इतकी तिकीटे देतोय पोष्टाची." एकाने लांब पाकिटे दिली नि गोष्टी पोष्टाने पाठवण्याची सोय केली तर दुसऱ्याने रिफिल्सचा पॅक दिला.. तर

कुणी हजार कोऱ्या कागदांचे बंडल दिले अगदी गिफ्ट पॅक मधून! एकाने तर चष्म्याची फ्रेम दिली त्याला.. लिहून लिहून नंबर वाढला की काचा बसवून घ्या रावसाहेब म्हणत!

या सगळ्यांनी बायको कावली त्याची. रिटायर होताना कुणाला कसा मिक्सर मिळतो.. कुणाला अगदी ओव्हन. काही नाहीतर कुकर किंवा इस्तरी तर कुठे गेलीच नाही. आणि याला मिळावे काय.. तर लिखाणाची रद्दी? पण जे व्हायचे ते होऊन गेलेले. रमाने नव्या उत्साहात त्याचे डोके खाले पण रघुच्या हाती काय होते आता? आता हरी हरी करीत रिटायर्ड आयुष्य जगावे.. लिखाणाची सुरूवात करावी .. रघु स्वप्नात दंग झाला.

रिटायर माणसाचे एक बरे असते. वेळेचे बंधन नाही. केव्हा ही उठावे.. लोळत पडावे! बाकी दिवसभरात पेपरातल्या छोट्या जाहिरातींसकट सारे वाचून काढावे. चार दोन फेऱ्या मारून याव्यात. घरी कुणाला काही हवे असेल तर मी मोकळाच आहे म्हणत बाहेर उंडारायला कारणे शोधावीत. इतक्या वर्षांत धावाधाव केली त्याचे उट्टे घरी बसून काढावे. रघुला हे नवे सुखचित्र दिसले नाही असे नाही. पण तो ध्येयाने झपाटलेला. साहित्य निर्मिती.. आपल्या नसण्याने निर्माण झालेली मराठी सारस्वतातील पोकळी आता भरून काढलीच पाहिजे. त्या साहित्यास ऊर्जितावस्था येण्यासाठीच हा देह खर्ची पडावा! निवृत्तीनंतरच्या सुट्टीतही एका दिवसाची 'सुट्टी' घेतली त्याने मनाच्या आणि जनांच्या तयारी साठी. म्हणजे एक वेळापत्रक बनवले. आपल्या खोलीतल्या टेबलावरचा पसारा हलवून ते टेबल मुक्त करून घेतले. पूर्ण तीनशे पंधरा रूपये सत्तर पैसे खर्चून टेबल लँप आणला. सकाळी साडे आठ ते अकरा नि दुपारी साडेचार ते साडे सहा. संपूर्ण तल्लीनतेने लेखन. बाकी वेळ मनन आणि चिंतन! विचार करण्यात चार क्षण घालवले तर काय बिघडते! तेवढेच डोळे बंद ठेऊन काही क्षणांची झोप घेता येते. मनन आणि

चिंतन तर सर्वात सोपे. डोळे मिटले की झाले. कुणी झोपलात काय म्हटले तर मनन करतोय म्हटले की झाले! थोडक्यात नमनालाच अपशकुन झाला. इतक्या वर्षांत सुटलेली लिहायची सवय.. पुनर्जिवीत करावी तर वेळ लागणारच. साहित्य सेवेच्या नावाखाली रघु नुसता लोळतोय. सुचायला विषय हवेत. विषय मिळाले तर त्यात लिहायला 'सबस्टन्स' हवा. त्याला काही अर्थ हवा. आशयाचा ताळमेळ जुळायला हवा! प्रत्येक पायरीवर अडवणूक होतेय बिचाऱ्याची तर तो काय प्रसूत करणार.. श्रावणातल्या कुठल्या तरी कहाणीत कुणाच्या तरी पोटी येतो तसा.. वरवंटा?

काही असो एके दिवशी त्याच्या डोक्यात वीज चमकावी तशी कल्पना चमकली. आता तो कथासागरात डुबकी घेणार.. समोरील कोऱ्या कागदावर अक्षरे उमटली आणि तो लिहिता झाला. एखाद्या पाईपलायनीतला बोळा निघावा नि पाणी वाहू लागावे तसे झाले नि कथा कागदावर उमटू लागली. रिटायरमेंटच्या चौथ्याच दिवशी असा अकाउंट उघडला त्याने नि तो स्वतःवरच खूश झाला. कथा लिहिणार तो.. दोन पाने सकाळच्या सत्रात लिहून झाली आणि त्याला मानसिक थकवा जाणवायला लागला. अशी गंभीर कथा लिहिता लिहिता तोच गंभीर झाला. संध्याकाळी पुढे लिहू म्हणून उठला तो. कथा पुढे सरकली. दिवस संपेतोवर त्याने एक कथा संपवलेली लिहून. स्वतःवरच तो खूश झाला. काल सकाळी अस्तित्वात नसलेली पात्रे संध्याकाळी त्याच्या मनात येऊन बसलेली. खूश होत तो बाहेर पडला.

पहिल्या कथेची ही धुंदी त्याला आठवडाभर पुरली. आता पुढे लिहिणे सुरू करावे. एक झाली कथा. मे महिना होता तो. दिवाळी अंकांत कथा पाठवण्यासाठी सुगीचा हंगाम. वेगवेगळया

अंकांतून 'रघुवीर राव.. साहित्य क्षेत्रातील नवा उगवता तारा..' असली काही समीक्षा येईल का? त्याकरता नव्या जोमात अजून लिहावे लागेल.

तो लगोलग कामाला लागला. निवृत्तीच्या वेळी भरपूर कागद पेनं नि पाकिटे मिळालेली. गोष्टींच्या कॉप्या काढून रघुने एकेका अंकात पाठवण्याचा सपाटा लावला. मिळालेल्या पाकिटांतून नि मिळालेले स्टँप्स लावून. सारे आधीच तयार असल्याने नसता खर्च म्हणून रमा पण काही बोलू शकत नव्हती. आता फक्त दिवाळीत गोष्टी छापून येण्याचा अवकाश.. रघुवीर प्रथितयश म्हणवला जाईल. थोडाच वेळ बाकी आहे. अगदी काही महिने.. स्वप्न साकार होण्यास!

अर्ध्याहून ताव संपले. स्टॅम्प्सला अर्ध्याहून अधिक गोंद चिकटून संपला. पोष्टाचा धंदा वाढला म्हणावे तर ते मात्र नाही कारण पोष्टाचे सारे सामान आधीच खरेदी करून झालेले. पण पोष्टाचे काम मात्र वाढले! दिवाळीचा आनंद द्विगुणीत करण्याची भाषा वाचत आलेला तो आजवर.. या दिवाळीत स्वतःच्या गोष्टी वाचणार होता तो.. फराळासोबत. परत गोष्ट छापून आली की तो अंक मिळेल मोफत, हा बोनस! कुणी मानधन देईल अशी अपेक्षा नव्हती त्याची. अगदी लेखकाकडून मागवली गोष्ट तरी मासिकवाले त्या मानधनाबद्दल आळीमिळी गुपचिळी असतात .. तर 'बिन बुलाये मेहमान' सारख्या न मागवता आलेल्या गोष्टींना कोण देणारे काही? छापून आणणे हीच मेहरबानी!

दिवाळी आली नि रघुचा धीर संपला. अजून एकही अंक नव्हता पोहोचला घरी त्याच्या.. दादरच्या आयडियलच्या दिवाळी अंक प्रदर्शनात चक्कर मारली न राहवून त्याने. कुठल्याच अंकात

त्याच्या कुठल्याही गोष्टीचा मागमूस नव्हता. 'बडे मायूस होकर निकले आयडियल की गली से' म्हणत त्याने दिवाळीचा आनंद द्विगुणीत करण्याऐवजी द्विभाजित करून घेतला!

ह्या दिवाळीच्या अंकांनी केलेल्या त्याच्या साहित्य चंपीचा परिणाम खूप दिवस टिकला. पूर्ण चंपीनंतर केस कधी उगवतात तरी ..पण त्याच्या प्रतिभेस अंकुर फुटतोय कसला? छापून येत नसेल नि कुणी वाचणार नसेल तर लिहावेच कशाला? स्वान्त सुखाय लिहायला हिंमत लागते.. पण ती चैन परवडते कुणाला.. तर ज्यांचे कुठे छापून येते त्यांना. बाकीच्यांनी तसे म्हणणे म्हणजे आबंट द्राक्षांची गोष्ट!

एकूण काय, गडी नाउमेद झाला हे खरे. पुढच्या दिवाळीस अजून एक वर्ष बाकी. आणि त्यावेळेस हाच इतिहास रिपीट न होण्याची गॅरंटी कोण देणार? तरीही हिंमत न हरण्याची प्रतिज्ञा करून दोन तीन महिन्यात रघु परत कामाला लागला. कल्पना सुचे, त्यावर अंमलबजावणी करीत कथा घडवून आणे तो. कुठे कथास्पर्धेची वाचली बातमी की पाठवलीच याने गोष्ट. पुढे त्या कथांची काय कथा घडेल त्याला पत्ता लागत नसे. हळूहळू दिवस आले परत दिवाळी अंकांसाठी साहित्य पाठवायचे. रघुच्या सुप्त इच्छेने उचल खाल्ली परत. अजून काही पोष्टाचे स्टँप्स नि पाकिटे उरलेली. एक एक करून दिल्या धाडून त्याने गोष्टी. नि परत सुरू झाले ते वाट पाहणे!

दुसऱ्या वर्षीच्या दिवाळीनेही तोच इतिहास घडवला नि आता रघु कोलमडला. आपल्या अभिजात साहित्यास कोण उजेडात आणेल नि आपल्यासारख्या लेखन हिऱ्यास कोण कसे कोंदणात बसवेल.. कधी बसवेल हा प्रश्न तर राहिला दूर.

हे झाले नि रघुने स्वतःचेच इंग्रजीत म्हणतात तसे 'सोल सर्चिंग' केले .. कुणी त्याला अंतर्मुख होणे म्हणतात.. हार मानणे त्याच्या रक्तात नाही.. त्याचे पूर्वज एकेकाळी पोर्तुगीज सैन्यात पराक्रम गाजवलेले. ते सैनिकी रक्त त्याला गप्प बसू देईना. थोडक्यात अशातशाने हार मानणाऱ्यातला नव्हता रघु.

रघुने मुळापासून विचार करण्यास सुरूवात केली.. साहित्य साहित्य म्हणजे काय? जे लिहिले जाते ते लिखाण.. नि लिहिलेले वाचले जाते ते.. आणि ते ते.. साहित्यच. आणि लिहिणारा तो लेखक. म्हणजे काही ही लिहा.. नि काही ही वाचा. सारे साहित्यच. फारतर कुणी त्यास ललित साहित्य म्हणणार नाही. न म्हणोत.. अन् कथा नि कादंबऱ्याच का वाचतात कुणी? मागे कुणी एक टेलिफोनची डिरेक्टरी वाचायचा.. तो ही आवडीने.. तर ते ही साहित्यच गणले जायला हवे! थोडक्यात छापून येण्यास उच्च पातळीची साहित्यिक मूल्ये जरूरी असतात वगैरे सारे झूठ.. किंबहुना त्या दोन वर्षात दिवाळी अंकांतून छापून आलेल्या गोष्टींहून त्याच्या गोष्टी बऱ्याच बऱ्या म्हणाव्यात अशा होत्या. हे त्याचे एक स्वमूल्यांकन!

आता काय? गनिमी कावा!

त्याच पोर्तुगीज पूर्वज सैनिकाच्या रक्तातील गनिमी कावा ही रघुच्या रक्तात उतरला होता! आठवडाभरात रघु कामाला लागला. रघुची लेखणी आता रंगात आली..

.. आणि सहा महिन्यात रघुचे पहिले पुस्तक आले प्रसिद्ध होऊन! त्यावर नाव छापलेले..

लेखक: रघुवीर राव!

रघुचे स्वप्न साकार झाले. याचि देही याचि डोळा.. आणि पुढील सहा महिन्यांत..

म्हणजे ऐन दिवाळीत त्या दिवाळी अंकाना टिच्चून दुसरे पुस्तक झाले प्रसिद्ध त्याचे.. अर्थात ..

ले: रघुवीर राव!

वा! लेखकु जाहला रघु. काय असावीत रघुची पुस्तके? रघुच्या अथक विचार मंथनातून निघाले ते पहिले पुस्तक .. 'नवजात बालकांची १००१नावे!' त्यात मग नवनवीन नावांची कसर सोडली नव्हती त्याने. आपली कल्पनाशक्ती वापरून हजारावर नवीन नावे. त्याच परत वर्गीकरण .. देवावरून.. निसर्गावरून.. वर्णनात्मक.. गुणात्मक .. हाक मारण्यास सोपी.. नाविन्यपूर्ण वगैरे. त्याच त्याच नावांना टाळून नवीन नावे बनवलेली त्याने.. सर्वांग, सर्वाधीन, चांगला, चांगली, छान, बरा, गलती, टांग, हस्त, कर्णिका, हड्डी, मज्जा, रज्जू, तंतू, पाकळी, पोकळी, निर्वात, निष्कलंक, मिष्कील, मुश्किल असली! जुळयांसाठी नावांच्या खास जोड्या ..उदा. भलती, सलती.. आला, गेला.. अंधार, उजेड! पुस्तकाच्या शेवटी काही इंग्रजी नावे.. अपेंडिक्स पासून सुरू होऊन झिगझॅग पर्यंत.. अगदी ए टू झेड! साहित्य निर्मितीची हौस अशी पुरवून घेतलेली त्याने. आणि प्रकाशकांच्या डोक्यात प्रकाश पडून तडक छापून प्रसिद्ध ही झाला तो ग्रंथ.

आणि रघु ऑफिशियली लेखक बनला!

रघुचे स्वप्न पुरे झाले तर खरे. त्याची नामावलीची जंत्री दुकानातून खपली देखील. आपल्यासारख्या प्रचंड जन्मदराच्या देशात अशा पुस्तकाची गरज ओळखणे हाच द्रष्टेपणा त्याचा. आणि हेच ते 'जीवनाभिमुख' साहित्य!

हे सारे घडतानाच रघु 'लेखक' म्हणून घडत गेला.. आपल्या कठीण काळात कुणी सल्ला द्यायला मिळाले नाही त्याला.. तेव्हा हीच सल्लागारी पुस्तक रुपात दुसऱ्या पुस्तकात छापली त्याने.

'आयुष्यातील सामान्य समस्या आणि त्यावर उपाय' .. हे त्याचे दुसरे पुस्तक! त्या साठी आधी समस्या गोळा केल्या त्याने. मग एकेकासाठी आपले उत्तर! समस्या जन्मापासून ते अंतापर्यंतच्या! पाळणाखरेदी केव्हा नि कुठे कराल.. रात्री बाळ झोपत नाही.. काय कराल.. ते (स्वतःच स्वतःचे) आत्मचरित्र कसे लिहावे .. अंतिम कार्यासाठी तजवीज कशी कराल पर्यंत!

त्याच्या या डायरेक्ट आयुष्यास स्पर्श करणाऱ्या समस्या नि त्यांची लालित्यपूर्ण उत्तरे .. दुसरे पुस्तक ही तडाखेबंद विकले गेले.

आणि रघु प्रथितयश लेखक झाला..

लेखक रावांचे लिखाण म्हणजे जीवनाभिमुख, जीवनाच्या विविधांगांना स्पर्श करणारे, जीवनसहाय्यक, जीवन रक्षक असे वर्णन केले गेले त्याच्याच पुस्तकामागच्या ब्लर्बस् मध्ये!

पण एकूण काय.. आपले ध्येय पूर्ण होण्याचे भाग्य फार थोड्यांना मिळते. त्यात रघु ही सामील झाला. अगदी लेखक राव म्हणून ओळखीचा झाला. अजून काय हवे? पुलंच्या जनार्दन

नारो शिंगणापूरकर ऊर्फ बोलटाचा जिता जागता भाऊ! तो नट होता, हा लेखक एवढाच फरक. पण कुठेतरी नाव छापून यायची दोघांची इच्छा तशीच.

पण रघुवीर शेवटी त्यात यशस्वी झालाच..

दोन पुस्तकांवर नाव छापून आलेच त्याचे!

लेखक रघुवीर राव!

## ***बय माझी!***

बय माझी!

माझी म्हटली की कशी माझीच वाटते ती. म्हणजे आम्ही भावंडं पाच. आम्ही दोन भाऊ नि तीन बहिणी. आमचे आबा गेले. तेव्हा कळले मला की आमच्यापैकी प्रत्येकालाच वाटायचे की आपण सोडून दुसराच कुणी म्हणजे भाऊ किंवा बहीण आबांचे विशेष लाडके आहेत. म्हणजे आमच्यापैकी प्रत्येकालाच वाटायचे तसे. मला वाटायचे माझा भाऊ मन्या तोच लाडका त्यांचा तर मन्याला वाटायचे शेंडेफळ असलेली सुली त्यांची लाडकी. सुलू स्वतःला त्यांची नावडती समजे आणि कमू त्यांची लाडकी असे वाटे तिला. थोडक्यात आबांचे लाडके कोण हे आम्हाला कधी कळलेच नाही हे खरे. पण माझी बय गेली तेव्हा? खरेतर ती आमची होती. पण आमच्यापैकी सगळयांनाच ती स्वत:चीच वाटायची! आमच्यापैकी प्रत्येकाची खात्री होती.. आपणच तिचे लाडके. अशी माझी बय. कुणाचेही लाड करायला चुकायची नाही. आणि तिला आम्ही पाची भावंडं सारखीच.

आमचे सारे मित्र आईला आई हाक मारीत. त्यात आम्ही तिला बय कसे म्हणायला लागलो? आमची सर्वात मोठी बहिण.. कौसल्या. ती लहानपणी आईला बय म्हणायची.. बयनेच सांगितलेली ती गंमत. म्हणजे आई तिचे लाड करायची .. बाई माझी ती.. सोनुली. त्यातला बाई शब्द उचलला तिने नि ती आईलाच बय बय म्हणायला लागली म्हणे! पुढे आम्ही तिचेच ऐकून तिला बय म्हणायला लागलो. आई शब्दात माधुर्य आहेच पण बय मध्ये एक नाद जाणवतो आम्हाला. कदाचित तो शब्दाचा नाद नसेलही, माझ्या बय मुळेच जाणवत असणार तो.

आमच्या गावात आमचे घर त्यातल्या त्यात मोठं. घरात नळ आणि गॅस असणारे काही थोडेच त्यातलं. श्रीमंती नव्हती पण ती काय असते हे ठाऊक नसल्याने ती नसल्याची खंत ही नव्हती. खाऊन पिऊन समाधानी असण्याचे साधे दिवस होते ते.

बय आमच्याकडून रोज प्रार्थना म्हणून घ्यायची. पाठोपाठ परवचा. तिला स्वतःला काही पाढे यायचे नाहीत पण जो बरोबर पाढे म्हणेल त्यालाच रात्री जेवणात एक चमचा साखर मिळे. आणि सारे बरोबर म्हणतात ना सर्व हे आम्हीच एकमेकांच्या पाढ्यांना ऐकत ठरवत असू. कुणी चुकला की पकडलाच गेला पाहिजे! ती कमाईची एक चमचा साखर मग जास्तच गोड लागत असे. ज्याला मिळणार नाही त्याला चिडवण्याने गोडी वाढे की काय कोण जाणे. पण चौथीत पोहोचेतोवर आम्हा सगळ्यांना पाढे तोंडपाठ होते. आजही एकोणतीसाचा पाढा मी न अडखळता म्हणतो त्याचे कारण ती एक चमचा साखर! बय आम्हाला सगळ्यांना अशी एकमेकांत गुंतवून अभ्यासाला बसवायची. कधी बक्षीस म्हणून गुळाचा खडा तर कधी नागलीचा पापड तर कधी एक चमचा तूप जास्त! आणि त्यावर कहर म्हणजे कधी कोणाची खास आवडीची भाजी. हे म्हणजे खास बक्षीस! आम्ही सारे त्यातच खूश आणि याहून जास्त मागणीही नसायची आमची. बयची हीच गंमत होती. अगदी ज्याला बक्षीस न मिळेल तो उद्या तरी मिळेल म्हणून वाट पाही, जास्त खट्टू न होता. स्वतः ती शिक्षणाने बेतासबात. पण आमच्या शिकण्याबद्दल सदा जागृत असायची ती. माझ्या लहान बहिणीस म्हणजे कमलीस शिकायचा कंटाळा. उगीच इकडेतिकडे टंगळमंगळ करत बसायची आणि बयला ते कळू नये म्हणून थापा ठोकायची. मग आम्ही चुगली केली की बय तिला शिक्षा करायची. कमली कसली सुधरतेय! मग बय ने काय विचार केला कुणास ठाऊक. स्वतःला जास्त वाचता येत नसतानाही तिची पुस्तके घेऊन मांडीवर बसून शिकवायची. कमली फक्त बयच्या उबदार मांडीवर बसायला मिळेल म्हणून अभ्यासाला लागली! इतकी की चौथीत

ती पहिली आली! आज बाल मानसशास्त्राचा गवगवा होताना बय चा तो प्रयोग आठवतो! आणि स्वतः कमलीच आज मानसशास्त्र शिकवते कॉलेजात!

आमच्या सगळयांच्याच शाळेकडे तिचे लक्ष असे बारीक. रोज घोटवून घोटवून शुद्धलेखन घेई ती. त्यामुळे आमच्यापैकी सगळयांचेच अक्षर चांगले होते. म्हणजे अजूनही आहे. आणि आज आम्ही पाचही जणं आपल्या आपल्या जागी स्थिरस्थावर झालोत. त्यात बयचा वाटा खूप मोठा. आबा आमचे होते मेहनती. पण आम्हाला भावनिक म्हणतात तसा आधार जास्त बयचा. पुढे कॉलेजात गेलो आम्ही. त्यातले तिला गम्य काही नसले तरी पण परीक्षेच्या वेळी तिचा हात पाठीवरून फिरावासा वाटे. माझ्या कायद्याच्या शेवटच्या वर्षात तर मी तिच्या मांडीवर डोके ठेऊनच अभ्यास करायचा. बय तोवर तशी थकलेली खरी पण माझ्या डोक्यावर हात फिरवत बसून राहायची.

तशी बय म्हणा की तिची ती पिढी म्हणा.. मुली फारशा शिकायच्या नाहीत. म्हणजे देवादिकांच्या पोथ्या वाचण्याइतपत शिकल्या की बस. बय पण कशी अपवाद असणार. पण शिकण्याचे महत्त्व बहुधा ती न शिकल्यानेच कळले असावे तिला. त्यामुळे आमच्या तिन्ही बहिणींना ती शाळेत जायला भाग पाडायची. परक्याच्या धनास शिकवणे अशी समजूत असताना ती मात्र कुणाचे न ऐकता आमच्या बहिणींच्या शिक्षणाच्या मागे लागली. आम्हाला शाळेत दांडी मारायला सक्त मनाई असे तिची. मग शाळेतून घरी आलो की बय वाटच पाहात असायची. रोज मग आम्ही तव्यावरच्या गरमागरम पोळया नि भाजी खायचो. आवडत्या भाज्या असायच्याच पण नावडत्याही खाव्या लागायच्या. ज्यादिवशी अशी अगदीच नावडती भाजी बनेल त्यादिवशी त्याबरोबरच आवडीचीही भाजी बनवे ती. आणि आधी ती नावडती संपवली की आवडीची वाढे. अशाने झाले इतकेच की आमचे खाण्यापिण्याचे नखरे हळूहळू कमी झाले. आज ते कुठे कुठे कामानिमित्त फिरताना उपयोगी पडतात. जेवण झाले की अभ्यासाला बसावेच लागे. अभ्यासच

नाही तर खेळण्याबद्दलही बय मागे लागायची. रोज एक दीड तास खेळून आलो की मगच पाढे, परवचा नि मग खाऊ देई ती. तिने न बोलता लावलेली शिस्त होती ती.

अजून आठवतात ते दिवस. पाच एक वर्षांचा असेन. खेळून आलो की तडक हातपाय धुवायचे. आणि हात पुसायचे ते फक्त बयच्या पदराला. बय पण ते ओले हात पुसू द्यायची. मग काहीतरी खायला द्यायची. आमच्या आवडीचे काही न काही सतत बनवून ठेवायची. लाडू नाहीतर चिवडा. खोबऱ्याच्या वड्या.. असे काहीबाही. आम्हा पाचीजणांमध्ये ती पहिल्यांदा कुणाला देते याचीपण चढाओढ लागे. त्यावरूनही भांडण! मग मला आठवतेय तिने आम्हाला एकेक वार ठरवून दिला नि त्या त्या वारी ठरलेल्या जणास पहिल्यांदा खाऊ मिळे! असा तो तंटा बखेडा सोडवलेला आठवतो तिने! ह्याच नाही तर आम्हा पाच जणांच्या सगळ्याच भांडणांत ती अंपायर म्हणून असायची. आणि आम्हा कुणालाच त्यावेळच्या आमच्या शब्दात सांगायचे तर तिने 'पार्श्यालिटी' केल्याचे वाटायचे नाही. आज क्वालिटी टाईम नि बॉंडिंग असले काही शब्द वापरले जातात त्या बालमानसशास्त्रात. मोठमोठया शब्दांमागे असेलही काही अर्थ पण बय सारख्या आयांकडे उपजतच आपल्या बाळांसाठी काय करावे याची समज असावी. आम्ही पाच. सगळयांचे नखरे वेगळे. कुणी न कुणी कुठे न कुठे चुकणारच. सर्वांना बय वेगवेगळया पद्धतीने सांभाळून घ्यायची. अशी की एकाला जवळ घेतले तिने तरी त्याचवेळी बाकीच्यांनाही ती आपलीच वाटायची.

बय अन्नपूर्णा होती. आबा देखील तिला अशीच हाक मारत कधी कधी. जुन्या जमान्यातली ती. कोंड्याचा मांडा करणे रक्तात भिनलेले. त्यात परत आम्हा पोरांना खाऊ घालण्याची तळमळ. काय काय करून खाऊ घाले ती. आणि आम्ही चाटूनपुसून सारे फस्त केले की कृतार्थ होई ती. पुढे थोडे मोठे झालो आम्ही तर आमच्यापैकी कुणी तिलाच घास भरवत असे तिच्याच खास पदार्थाचा. ती देखील आढेवेढे घेत खाई. बय चे बनवणे.. त्यात तो पदार्थ तिची सारी माया घेऊन ताटात

येई. आणि त्यात आम्ही सारे खात असू वाटून.. एका कोंडाळयात बसून. बयच्या हाताची चव हा विषयच वेगळा वाटे मला. बहुधा ती सारे प्रेम नि माया ओतत असावी जेवण बनवताना. आज तिच्या हातच्या भाज्यांची चव अजून रेंगाळते जिभेवर. आजही तिच्या हातची पोळी खाविशी वाटते नि पापुद्रा मोडत खाल्लेली भाकरी आठवते. पोळीही मिळेल.. भाकरीही. पण त्यामागचा बय चा हात कुठून येणार?

बय माझी देवभक्त होती. दररोजची पूजा तिने कधी चुकवली नाही. पण त्याहून जास्त व्रत वैकल्ये ती नसे करत. उपासतापास पण जास्त करत नसे ती. सणावारी पूजा होत घरात त्या करे ती. पण या सगळ्याचे स्तोम मात्र कधी माजवले नाही तिने.

अजून आठवते तिने एकदा प्रार्थनेआधी आम्हा सगळयांना बसवलेले समोर. झाले एवढे होते की त्या न कळत्या वयात मी खोटे मार्क सांगितलेले घरी. म्हणजे पन्नासात वीस असताना पंचेचाळीस. बयला कुठूनतरी खरे कळले. त्या मार्कांपेक्षा खोटेपणाचाच राग आला असावा बयला. तिने त्यादिवशी माझ्याकडे न बघता सगळयांनाच उपदेश केला. म्हणाली, प्रार्थना आपल्या समजुतीकरता असते फक्त. खरेपणाने वागा .. कुठल्याही परिस्थितीत. उगाच देवपूजा करून खोटे वागायचे त्यापेक्षा देवाचे नाव घेऊच नका. चांगले वागणे, बोलणे आणि कधीही चांगुलपणा न सोडणे हीच देवपूजा. तसे वागणार नसाल तर नावाला प्रार्थना कशाला .. बय अजूनही काही बोलली, पण त्यापेक्षा माझ्याकडे न पाहता बोलली हेच टोचले मला. त्यानंतर रात्री तिने माझ्याकडे न पाहताच वाढले. रात्रीपर्यंत तिचा अबोला सहन न होऊन मी कुशीत शिरलो तिच्या. काही न बोलता तिने डोक्यावर हात फिरवला.. आजही तो प्रसंग लख्ख डोळयांसमोर येतो. एकदाही न ओरडता नि अंगावर हात न उचलता अशी शिक्षा देई ती की त्याचीच भीती वाटे. त्यापेक्षा ती ओरडली तर बरे असे वाटे. त्यामुळे असल्या काही चुका करण्याआधी आम्ही सारेच शंभरदा विचार करीत असू. अर्थात तिची असली शिक्षा खऱ्याखुऱ्या चुकांसाठी असे. बाकी खोड्या

नि व्रात्यपणापायी झालेल्या चुकांसाठी असले उपाय ती करीत नसे. त्यामुळे कुठल्या गोष्टी अजिबात करायच्या नाहीत याचेच शिक्षण मिळून जाई आम्हाला. बालशिक्षणाचा हा धडा शाळेत न जाता कुठे शिकलेली ती कुणास ठाऊक.

बय तशी वयाच्या पन्नाशीतच गेली. थोड्या दिवसांच्या आजारपणानंतर. अजून ते दिवस आठवतात. अंथरूणात खिळलेली माझी बय. उगाच तशी ती झोपलेली कुणीच पाहिली नव्हती. ती तशी न हलता, न बोलता पडून राहिलेली. वेदनेने कण्हत पडलेली. तिच्या आजारावर उपचार नसल्याचे आम्हाला कळले तसा आम्हा सर्वांचाच जीव वरखाली होत होता. आणि एके दिवशी तिने राम म्हटला. आम्ही सगळयांनीच तिच्या नावे टाहो फोडला. न परतीच्या प्रवासास निघून गेली ती. तसे आम्ही खूप लहान नव्हतो ती गेली तेव्हा तरी एक पोरकेपण जाणवले. बय आजारी होती. बहुधा ह्या दुखण्यातून उठणे नाही हे जाणवले असणार तिला. अगदीच न बोलण्याची स्थिती नव्हती तेव्हा. वेदना असणारच पण तरीही तिचे आमच्याशी हसून बोलणे सोडले नव्हते. भले भले मरणास घाबरतात. स्वतः बय घरातल्या पालींस नि झुरळास घाबरणारी.. पण समोर मृत्यू दिसत असताना मात्र शांत होती.. न घाबरता. धीरोदात्तपणे सगळयास सामोरी जात होती. काही महिन्यांतच ती देवाघरी गेली.

बय जाऊन झाली काही वर्षे. उगाच पेपरात द्यावे तसे.. तुझी आठवण होत नाही असा एकही दिवस गेला नाही असले काही नाही म्हणणार मी. पण आज इतक्या वर्षांनी तिच्या आठवणींनी डोळे टचकन् भरून आल्यावाचून नाही राहात. अगदी हे लिहिता लिहितादेखील. कितीही वर्षे झाली तरी तिचे मायेचे शब्द नि स्पर्श विसरत नाही आम्ही. आजही आम्ही सगळे भेटलो की तिच्या आठवणी निघतात. आबांच्याही निघतात. पण दोन्ही आठवणींची जातकुळी वेगळी. आबांची माया होती पण त्याहून जास्त दरारा नि त्याच्या जोरावर शिस्त होती. ती शिस्त

उपयोगी पडते आयुष्यभर. तरी बयच्या आठवणींनी जसे कातर व्हायला होते तितके आबांच्या आठवणींनी नाही होत. बहुधा आईच्या उदरात वाढल्याने असेल.. आईला आपले बाळ आपलाच एक हिस्सा वाटते तसे बाळांनाही आयुष्यभर ती मातृ-नाळ जोडलेली राहात असावी. आईपासून आपण वेगळे आहोत असे वाटतच नसावे कुठल्याही वयात. नाहीतर आज आयुष्याच्या साठीच्या घरातही ते लहानपण आठवत नि बयचा मायेचा हात आठवत खोल काळजात काही हलल्यासारखे का व्हावे? छोट्या छोट्या गोष्टींनी तिची आठवण येत रहावी नि कितीही वर्षे लोटली तिला देवाघरी जाऊन, तरी नुसता विचार करत डोळे भरून यावेत.. आणि आज जाणवते आम्ही पाचही भावंडांना हेच वाटते तिच्याबद्दल. अगदी प्रत्येक जण हेच म्हणतो.. बय माझी आणि प्रत्येकास ही वाटते हेच.. बय माझीच!

देवाचे घर असते की नाही कुणास ठाऊक. गेल्यानंतर आत्मा वगैरे असतो पाठी की नाही हे ही कुणास ठाऊक. पण हे सारे खरे असायला हवे असे वाटते. स्वर्गातून कुणी आपल्यावर लक्ष ठेवतेय नि अजूनही आपली चिंता करतेय नि ती आपली आई म्हणजे माझी बय असावी.. तिकडून आपली काळजी वाहणारी ती असावी आणि खुशाल आपण कल्पनेत का होईना, तिच्या उबदार मांडीवर डोके ठेवून निर्धास्त झोपावे.. तिचे ते मायाळू हात डोक्यावर फिरत रहावेत..

शाम आणि शामची आई म्हणजे आपल्याकडचे आदर्श. स्वतः सानेगुरूजींना देखील अशी आई प्रातिनिधिक वाटली असावी. कुणी म्हटले आहे ना, शामची आई ती माझी आई.. तसेच माझी आई ती शामची आईच. सारी मुले काही शामसारखी निपजत नाहीत हे खरे. पण आई म्हणून सगळ्या आया शामच्या आईसारख्याच असाव्यात बहुतेक! त्याला माझी बय कशी असणार अपवाद?

**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे १२ वे वर्ष. डॉ. नितीन मोरे यांचे हे एकोणिसावे पुस्तक.**

डॉ. नितीन मोरे हे ज्येष्ठ लेखक, आपली यशस्वी श्वसनरोगतज्ञ म्हणून लोकसेवा पार पाडत असतानाच कथा, नाटके, लघुनिबंधही लिहीतात. त्यांच्या खुसखुशीत विनोदी साहित्याचे व नाटकांचे चाहते आता जगभर पसरले आहेत. मात्र यावेळचे त्यांचे पुस्तक विनोदाच्या पलिकडचे आहे. खुसखुशीत असले तरी त्याला गांभिर्याची खोली आहे. अनेक व्यावसायिक प्रकाशक त्यांना मानधन देऊन त्यांची पुस्तके प्रकाशित करायला तयार अहेत. पण डॉ. नितीनजी आपली सर्व पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर शंभू गणपुले (नऊ पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९ पुस्तके), डॉ. वसंत बागुल (१५ पुस्तके), शुभांगी पासेबंद (सात पुस्तके), अविनाश नगरकर ( चार पुस्तके), डॉ. स्मिता दामले (सात पुस्तके), डॉ. नितीन मोरे (१७ पुस्तके), अनील वाकणकर (६ पुस्तके), रत्नाकर महाजन (४ पुस्तके), अनंत पावसकर(चार पुस्तके), मधू शिरगांवकर (दोन), अशोक कोठारे (८ हजार पानांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी ( आद्य गझलकारा, १० पुस्तके), विनीता देशपांडे (४ पुस्तके), उल्हास हरी जोशी(५), नंदिनी देशमुख (५), सुजाता चव्हाण (४), डॉ. वृषाली जोशी(९) असे अनेक ज्येष्ठ, अनुभवी लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत पोहोचवतात. एकही पैशाची अपेक्षा न ठेवता.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपले नाव नेऊन ठेवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं 'इ'यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।